भाऊसाहेबांची कैफियत

संपादक

भीमराव कुलकर्णी

अनमोल प्रकाशन, पुणे २

प्रकाशक: मो. द. नांदुरकर
अनमोल प्रकाशन, ६८३, बुधवार पेठ,
पुणे २.

●

मुद्रक : रवि बेहरे
रविराज प्रिंटरी, ६८३, बुधवार पेठ,
पुणे २.

●

प्रकाशन : जानेवारी, १९८२.

●

●

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

●

मूल्य : दहा रुपये

● या पुस्तकासाठी महाराष्ट्र शासनाने सवलतीच्या दरात कागद पुरविला आहे.

★

'आम्हांसारिखे पुत्र आहेत व पुढेंही होतील
परंतु भाऊंसारखा बंधु मिळणार नाहीं.'

विश्वासरावांनी रणांगणावरून वडिलांना
लिहिलेले पत्र (कैफियतीतून)

'चिरंजीव भाऊ या लोकीं
नसल्यावर मजला लढणे नाहीं.
एक भाऊवांचून दुनिया दौलत व्यर्थ आहे.
लेक अल्पायुषी होता. सूर्यमंडळ भेदून गेला.
तें दुःख परमार्थशास्त्रपुराणें करून टाकलें.
परंतु चिरंजीव भाऊवांचून दुनिया व्यर्थ.
नाना, भाऊवांचून दौलत करणें नाहीं.'

पानिपतच्या पराभवाने खचलेल्या
नानासाहेब पेशव्यांचे नाना पुरंदऱ्यास
पत्र (पुरंदरे दप्तर १. ४०२.४१५)

★

रावबहादूर का. ना. साने यांनी ही कैफियत काव्येतिहाससंग्रह या मासिकपुस्तकात इ. स. १८८७ मध्ये प्रसिद्ध केली आहे. केशवराव सुंगठणकर मु. पुणे यांजकडून त्यांना या कैफियतीचे हस्तलिखित मिळाले होते. तिच्यावर काहीं संपादकीय संस्कार करून ही आवृत्ती प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अनमोल प्रकाशनचे श्री. पद्माकर नांदुरकर यांनी निकड लावून माझ्याकडून हे काम पुरे करून घेतले व रविराज मुद्रणालयाचे श्री. रवि बेहरे व कर्वे यांनी आत्मीयतेने व तातडीने त्याचे मुद्रण करून दिले.

त्यांचे आभार.

भीमराव कुलकर्णी

प्रस्तावना

पानिपतविषयक महत्त्वाच्या बखरी

इ. स. १७६१ साली पानिपतावर मराठ्यांचा जो दारुण पराभव झाला, त्याची हकीकत सांगणाऱ्या तीन बखरी मराठीत उपलब्ध आहेत. त्यांपैकी ' भाऊसाहेबांची बखर ' वाङ्मयीन दृष्ट्या अनन्यसाधारण स्वरूपाची आहे. ' पाणिपतची बखर ' या नावाची एक बखर रघुनाथ यादवाच्या नावावर प्रसिध्द आहे. या दोन्ही बखरींहून वेगळी आणि कदाचित या दोहोंच्या पूर्वी लिहिली गेलेली आणखी एक महत्त्वाची बखर उपलब्ध आहे. तीच ही ' भाऊसाहेबांची कैफियत ' होय. ' मराठ्यांचे पराक्रम ' या ग्रंथात रावबहादूर द. ब. पारसनीस यांनी पानिपतविषयक आणखी एक बखर प्रसिध्द केली आहे.[२] भाऊसाहेबांबरोबर पानिपतवर गेलेल्या रामचंद्र शिवाजी नावाच्या सरदाराच्या पदरी असलेल्या कोण्या बाजीराव गोपाळ नावाच्या इसमाने ती लिहिलेली आहे. बखरकारान आपण पानिपतवर जातीने हजर असल्याचा उल्लेख केला आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनी म्हटल्याप्रमाणे तिच्यातला पानिपतच्या लढाईचा वृत्तांत संपूर्ण बनावट आहे यात कसलीही शंका नाही.[३] रणांगणावर आपण प्रत्यक्ष हजर असल्याचे प्रतिज्ञेवर सांगणाऱ्या लेखकाची माहिती पूर्णपणे बनावट ठरावी आणि ' भाऊसाहेबांची कैफियत ' लिहिणाऱ्या कुणा अज्ञात बखरकारांची माहिती विश्वसनीयतेच्या दृष्टीने अव्वल दर्जाची ठरावी, यावरून इतिहासाच्या किंवा वाङ्मयाच्या क्षेत्रात काही निर्णायक अनुमान काढणे कसे धोक्याचे ठरते, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

बखरकार अज्ञातच

' भाऊसाहेबांची कैफियत ' कोणी लिहिली, त्याचा शोध घेता येत नाही; कारण कर्त्याने आपल्या कृतीवर आपल्या नावाचा कुठेच उल्लेख केला नाही.

मराठी बखरकारांमध्य आपल्या कृतीवर आपल्या नावाचा उल्लेख करण्याची प्रवृत्ती एकंदरीत कमीच आढळते. मुसलमानी किंवा उत्तरेकडील बखरकारांमध्ये आपल्या आश्रयदात्यांच्या समर्थनपर लिहिण्याची वृत्ती मोठ्या प्रमाणात असल्याने आत्यंतिक कृत्रिमता आणि अतिशयोक्त वर्णने यांमुळे त्यांचे लेखन् कमालीचे एकांगी होते. मराठी बखरकारांमध्ये त्याचा अभाव आढळतो. आश्रित असणारे आपले बखरकारदेखील निःस्पृहपणे आणि बऱ्याचवेळा स्वतंत्र वृत्तीने लिहिताना आढळतात. ऐतिहासिक कागदपत्रांचा एकतर्फी हवाला देऊन निर्जीव हकीकती लिहिण्यापेक्षा माफक पध्दतीने खुलवून नाट्यमय वर्णने करण्याकडे त्यांचा कल असतो. अशा बखरींचा संग्रह करण्याची एक परंपरा तत्कालीन महाराष्ट्रामध्ये रूढ होती. या परंपरेमुळे बखरी, तवारिखा, पोथ्या-पुराणे, ऐतिहासिक कागदपत्र यांच्या नकला करून घेऊन त्यांचे जतन केले जात असे. त्यामुळे तर ही साधनसामग्री नकलांच्या रूपात आजतागायत उपलब्ध होत आहे. मराठी माणसाच्या ऐतिहासिक दृष्टिकोनाचे हे एक प्रत्यंतरच होय.

या रुढीमुळे मूळ कृतीपेक्षा नकलांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो. त्यातूनच पाठभेद, पाठांतरे आणि नव्या मजकुराची भर पडते. नक्कलकरांच्या आणि त्यांच्या आश्रयदात्यांच्या नावांचाच कित्येकवेळा हस्तलिखितांतून निर्देश होतो. त्यामुळे एखाद्या हस्तलिखितावर कर्त्याचे म्हणून लिहिलेले नाव विश्वसनीय असेलच असे ठामपणे सांगता येत नाही! उदाहरणार्थ 'भाऊसाहेबांची बखर' या कृतीच्या निरनिराळ्या हस्तलिखितांवर कर्त्यांची व त्यांच्या आश्रितांची नावे वेगवेगळी आहेत. रघुनाथ यादवाची म्हणून प्रसिध्द असलेली 'पाणिपतची बखर' ही कोणत्या रघुनाथाची असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती या बखरीच्या सुरुवातीस दिलेल्या वेगवेगळ्या प्रतींवरील माहितीमुळे निर्माण झाली आहे.[५] सातारच्या छत्रपतींच्या पदरी असलेला रघुनाथ चित्रे नावाचा चिटणीस घराण्याशी संबंधित असा लेखक हा या बखरीचे कर्ता अशी त्यामुळे चुकीची समजूत होऊन गेलेली दिसते. या रघुनाथ चित्र्याचे छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र उपलब्ध आहे. 'चित्रगुप्ताची बखर' या नावाने ते प्रसिध्द आहे. तो अत्यंत अलंकारिक, कृत्रिम आणि विस्ताराने लिहिणारा लेखक आहे. त्याच्या या विशिष्ट शैलीचा पाणिपतच्या बखरीत मागमूसही नाही. त्यामुळे रघुनाथराव नावाच्या घोरपड्यांच्या चित्रगुप्त म्हणजे चिटणिसाने ती लिहिली असावी, त्याचा आणि छत्रपतींचे चरित्र लिहिणाऱ्या रघुनाथ चित्रे याचा काही संबंध नसावा, हे उघडपणाने दिसून येते. 'रघुनाथराव चित्रगुप्त' या नावामुळे घोटाळा होऊन त्याचे सातारच्या चित्र्यांशी साम्य कल्पिले गेले आहे. हे रघुनाथ यादव म्हणजे 'चित्रगुप्ताची बखर' लिहिणारा चित्रे नव्हे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

म्हणजे पाणिपतवर लिहिणाऱ्या तिन्ही महत्त्वाच्या बखरकारांच्या संबंधाने अद्याप निर्णायक माहिती उपलब्ध नाही! कैफियतीसंबंधाने तर अगदी नाही!!

दोन तर्क : एक संभवनीय, एक बिनबुडाचा

कैफियतीच्या लेखक शोधण्याच्या दोन प्रयत्नांचा येथे उल्लेख केला पाहिज. त्यांतील पहिला प्रयत्न अतिशय लक्षणीय आहे.

पंतप्रधानांची एक शकावली उपलब्ध आहे. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीचे वर्णन करताना तिच्यामध्ये शेवटी शेवटी खालील प्रकारची नोंद आहे.

' शके १६८१ ते ११६९ भाऊसाहेब कारभारी असतां दादासाहेब यांणीं लाहोरपर्यंत मुलुक काबीज केला. परंतु खजिना कांहीं आणला नाहीं यामुळें दादांची स्वारी घरीं राहून भाऊसाहेब हिंदुस्थानांत जावयास डेरेदाखल जाले. तेथें मुजाफरजंग, गारदी यांचा सरदार, याणें भाऊसाहेबांस मारावयाची कृति व पुढें हिंदुस्थानांत पाणिपतवर भाऊसाहेब बुडाले याचे तपशिलाची कारकीर्द अलाहिदा आहे.[६] '

या उल्लेखावरून रावबहादुर का. ना. साने यांनी शकावली लिहिणाऱ्यानेच कैफियत लिहिली असेल काय, असा तर्क व्यक्त केला आहे[७] आणि तो महत्त्वाचा आहे. लेखनशैलीच्या दृष्टीने तशी शक्यता नाकारता येत नाही.

दुसरा एक तर्क रियासतकार सरदेसाई यांचा आहे. त्यांच्या मते भाऊबरोबर पानिपतावर गेलेला आणि तेथून पळून आलेला भाऊचा निकटचा स्नेही त्रिंबक सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे याने ही कैफियत लिहिली असावी[८]. हा तर्क अगदी बिनबुडाचा आणि निराधार होय.

बखरींची नामकरणे

भाऊ. बखर, भाऊ. कैफियत आणि पाणिपतची बखर ही नावे त्या त्या बखरींच्या कर्त्यांनी दिलेली नसून ती संपादित करून प्रसिध्द करणाऱ्या का. ना. साने यांनी त्यांतल्या आशयानुरूप दिली आहेत. वास्तविक भाऊसाहेबांच्या बखरीत भाऊसाहेबांना प्राधान्य नसून बखरीच्या शेवटच्या १।३ भागातच काय तो भाऊसाहेबांचा संबंध येतो. त्यामुळे त्याला ' भाऊसाहेबांची बखर ' हे नाव अन्वर्थक ठरत नाही, याची सान्यांनाही जाणीव होती. ' शालिवाहन शके १६७६।७७ पासून शके १६८३ पर्यंत हिंदुस्थानात मराठयांनी ज्या स्वाऱ्या केल्या, त्या स्वाऱ्यांची बखर ' असे काहीतरी नाव देणे योग्य दिसते.' असे त्यांनी बखरीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे.[९] ' पाणिपतची बखर' ही देखील पाणिपतच्या पराभवाची बखर होय. त्या दृष्टीने साने यांनी या बखरीस दिलेले ' भाऊसाहेबांची कैफियत ' हे नाव सार्थ होय, (कैफियतकाराने मात्र ती भाऊसाहेब व रावसाहेब या दोघांची कैफियत असल्याचा सुरुवातीसच निर्देष केला आहे!) कारण भाऊसाहेबांच्या आयुष्यातील सुमारे वर्षभराच्या काळातील त्यांच्याशी संबंधित अशा घटनांवरच आपले सारे लक्ष केन्द्रित करून त्याने ही बखर लिहिली आहे. या काळातील भाऊसाहेबांव्यतिरिक्त घडलेल्या इतर घटनांची तो क्वचितच नोंद घेतो.

आणि त्यांचा लेखनकाल

कैफियत, भाऊ. बखर या केव्हा लिहिल्या गेल्या असाव्यात हे सांगणेही कठीण आहे. ' पाणिपतच्या ' च्या मराठवाडा साहित्य परिषदेने प्रसिध्द केलेल्या आवृत्तीत जो कालोल्लेख आहे. (सन ११७० फसली) यावरून ती पाणिपतच्या युध्दानंतर लगेच लिहिली असा अर्थ होतो. तथाकथित रघुनाथ यादवाच्या नावे उपलब्ध झालेल्या बहुसंख्य हस्तलिखितांत युध्दानंतर ती दोन वर्षांनी लिहिल्याचा उल्लेख आहे.[१०] दुसऱ्यातील मितीवर विश्वास ठेवता येत नाही, असे राजवाडयांनी म्हटले आहे.[११] भाऊसाहेबांच्या बखरीत लेखनकालनिर्देश नाही. तिच्यातील काही उल्लेखांवरून लढाई झाल्यावर ती लौकरच लिहिली असावी, असे साने यांना वाटते.[१२] या बाबतीत शेजवलकरांचा तर्क अधिक पटणारा आहे. ते म्हणतात, ' कैफियत, बखर यांची छाननी करता असे दिसते की कैफियत ही युध्दानंतर थोडयाच महिन्यांनी व निश्चित रणांगणावर हजर असलेल्या माणसाने लिहिलेली आहे. व बखर मागाहून काही वर्षांनी लिहिली गेली असावी. भाऊ. बखरकार रणांगणावर हजर नसावा असे वाटते[१३]. '

कैफियतीचे आद्यत्व गृहीत धरावयास हरकत नाही असे वाटते.

एक दुसरीचे अपत्य

भाऊसाहेबांची बखर लिहिणाऱ्यासमोर ही कैफियत होती यात कसलीच शंका नाही. कैफियतीतील कित्येक शब्द, वाक्ये आणि काही भाग भाऊ. बखरीमधे वेळोवेळी सापडतात. विशेषतः पानिपत्तोतर पळापळीची वर्णने, आणि पराभवाची मीमांसा ही तर बखरकाराने कैफियतीतून जशीच्या तशी, ठिकठिकाणी नाटयपूर्ण करून, अधिक फुलवून फगवून लिहिली आहे. बखर ही कैफियतीची वाढीव आवृत्ती आहे, या बाबतीत इतिहासकार सरदेसाई व शेजवलकर यांचे एकमत आहे.[१४]

या बखरीतील कित्येक सूचक घटनांचा जो कलात्मक विस्तार भाऊसाहेबांच्या बखरीत आढळतो, त्यामुळे वाङ्मयीन दृष्टीने तिला कमालीची रंजकता प्राप्त होऊन तिचे महत्त्व शतगुणित होते. परंतु त्याचबरोबर ऐतिहासिक दृष्टीने तिचे महत्त्व काहीसे कमी होऊन तिला ऐतिहासिक कादंबरीचे रूप प्राप्त होते. निरनिराळया व्यक्तींच्या मनातील भाव वेळोवेळी व्यक्त करणे, त्यांच्या खाजगी संभाषणांची आणि वाटाघाटींची इत्यंभूत माहिती देणे, पौराणिक आणि वाङमयीन संदर्भांनी ती अधिकाधिक अर्थपूर्ण करणे, इ. वैशिष्टयांमुळे ' भाऊसाहेबांची बखर ' ही मराठीतल्या कोणत्याही ऐतिहासिक कादंबरीपेक्षा आकर्षक ठरते. कैफियतीबाबतीत तसे म्हणता येणार नाही. परंतु वरील वैशिष्टये बीजरूपाने कैफियतीतही आहेत, हे अभ्यासकांच्या लक्षात येण्यासारखे आहे.

ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व

' कफियत ' ही तुलनेने पानिपतविषयक इतर महत्त्वाच्या बखरींपेक्षा आकाराने छोटी आहे. साने यांनी तर त्याला ' प्रकरण ' च म्हटले आहे.[१५] परंतु त्यामुळे तिचे महत्त्व गौण ठरत नाही. उलट ऐतिहासिक दृष्टीने ती इतर कोणत्याही बखरीपेक्षा अधिक महत्त्वाची आहे, याचा निर्वाळा इतिहाससंशोधकांनी एकमुखाने दिला आहे. ऐतिहासिक महत्त्वाच्या दृष्टीने बखरींना टाकाऊ ठरविणाऱ्या इतिहासाचार्य राजवाडे यांनीदेखील ' काही लहानसहान चुका गाळल्या असता ' भाऊसाहेबांची कैफियत ' पूर्णपणे विश्वसनीय ' असल्याचे म्हटले आहे.[१६] ' भाऊसाहेबांची बखर ' मात्र बऱ्याच चुका गाळल्या असता बहुतेक विश्वसनीय आहे, हे त्यांनीच सांगितले आहे.[१७] कल्पनाशक्तीच्या प्रभावामुळे लहानसहान किरकोळ चुकांचे मोठ्या चुकांत आणि इतरत्रही बऱ्याच विसंगती निर्माण होऊन त्याला साहित्यिक रूप कसे प्राप्त होते, ही प्रक्रिया तौलनिक दृष्टीने तपासणे उद्‌बोधक ठरेल.

' कैफियतीतील विश्वासार्हता अस्सल पत्रांवरून सिध्द होते व तिच्यातील माहितीही अचूक दिसते ' असा निर्वाळा निःसंदिग्ध शब्दांत इतिहासकार शेजवलकर यांनी दिला आहे.[१८]

या दोहोंच्या तुलनेने ' पाणिपतची बखर ' विश्वसनीयतेच्या दृष्टीने अगदी गौण ठरते. या बखरीतील कित्येक मित्या चुकल्या आहेत, विश्वासरावांच्या निधनाची वार्ता ऐकून नानासाहेब पेशवा पुण्याहून निघाला, अशांसारख्या चुकीच्या हकीकती तर असंख्य आहेत. पानिपतच्या अखेरच्या संग्रामाची त्याची हकीकत तर फार्शी बखरीच्या जातीची आहे. आपली बखर सजविताना एक ' बारनीस शत्रूकडील व श्रीमंताकडील या उभयत्यांच्या दिनचर्येचे वर्तमान टाचणरूपाने चिटणिसांनी बार केली होती. त्यावरून ती लिहिल्याचे' बखरकाराने स्पष्ट केले आहे.[१९] त्यामुळे तिचे मराठमोळेपण हरवले आहे.

वर्णनातील समतोलपणा आणि सच्चेपणा यांमुळे ऐतिहासिक दृष्ट्या संदिग्ध आणि वादग्रस्त ठरलेल्या कित्येक बाबींवर कैफियतीने चांगला प्रकाश टाकला आहे. उदगीरच्या लढाईत भाऊबरोबर रघुनाथरावदादाही होते, ही कैफियतीतील हकीकत आता अस्सल साधनांवरूनही खरी ठरली आहे. भाऊ व अब्दाली यांचे सैन्यबळ समतोल असले तरी, अब्दालीचे सैन्य किंचित अधिक होते आणि पानिपतपूर्व चकमकींमध्ये शिंदे, होळकर आणि मेहेंदळे या तिघांनीही आपल्या पराक्रमाची शर्थ केली होती, हा तपशील लक्षात घेण्यासारखा आहे. भाऊ. बखरकाराने यासंबंधी जो पूर्वग्रह आपल्या मनात निर्माण केला आहे, तो कैफियतीच्या अवलोकनाने दूर होतो. मुजाफरखानाचे कारस्थान, त्याचा भाऊने शांतपणाने केलेला उलगडा, त्यामुळे अका जणांना दिलेली मृत्युदंडाची शिक्षा, उदगीरच्या लढाईचे डावपेच, तहनामा, शिंदे–होळकरांच्या पत्रामुळे हिंदुस्थानात कोणी जावे यासंबंधीच्या वाटाघाटीचे अत्यंत वास्तव चित्रण, इथपासून पानिपतच्या मोहिमेची

तयारी, मोहिमेची पार्श्वभूमी, मोहिमेतील दारुण अपयश आणि परिणामी मराठ्यांच्या फौजेची झालेली केविलवाणी वाताहत इथपर्यंत कैफियतकाराने ऐतिहासिक दृष्ट्या विश्वसनीय ठरेल अशी बहुमोल हकीकत कथन केली आहे.

भाऊसाहेबांच्या बखरकाराप्रमाणे यातल्या कोणत्याही घटनेला कफियतकाराने कल्पनाशक्तीच्या रंगात बुचकळून ग्रहपूर्वग्रहांच्या खोड्यात टाकले नाही पक्षपाती व्यक्ति-चित्रणापासून कैफियत पूर्णपणे अलिप्त आहे. बखरकाराचे भाष्यही नेमक्या ठिकाणी आणि सूचकतेने एखाददुसऱ्या अर्थपूर्ण वाक्यातून व्यक्त होते. शिंदे-होळकरांच्या सूचनेचा अव्हेर करून भाऊने हिंदुस्थानात केलेली आगेकूच, दिल्ली आणि कुंजपुऱ्यातील घटना, कुरुक्षेत्रातील स्नानादानांच्या नादामुळे मराठ्यांची नाकेबंदी करण्यास अब्दालीला मिळालेली संधी, एकमेकांची रसद तोडण्यासाठी दोन्ही बाजूंनी झालेले प्रयत्न, तहाच्य वाटाघाटी, बळवंतराव मेहेंदळ्याचे दिल्ली आणि पानिपत येथील दुहेरी अपयश आणि पानिपतवर त्याला आलेले दुर्दैवी मरण, त्याच्या पत्नीने कोणत्याही समजावणीला दाद न देता केलेले सहगमन, इत्यादी घटनांची चित्रणे ऐतिहासिक दृष्टीने वास्तवपूर्ण आणि विश्वसनीय आहेत. अब्दालीच्या सैन्याची सुरुवातीला कोंडी करून भाऊने त्याची केलेली उपासमार आणि त्यामुळे अब्दालीने जागा बदलून आपल्या छावणीची वेळोवेळी केलेली मांडणी हा बारकावा तर फक्त कैफियतच आहे. तो अनेक बखरकारांना नोंदविता आला नाही. आणि अलीकडच्या नामांकित इतिहासकारांनीही ही घटना लक्षात न घेतल्याने त्यांच्या विवेचनांतही त्रुटी आणि विसंगती निर्माण झाल्या आहेत.

आपल्या सामर्थ्याबद्दल साशंक असल्याने अब्दाली आपण होऊन उठाव करू इच्छित नाही. त्यामुळे मराठे त्याने उठाव करावा यासाठी आव्हानात्मक भूमिका घेतात. आणि सुरुवातीच्या चकमकीत मराठ्यांचे पाणी दिसून आल्यामुळे अब्दाली बचावात्मक भूमिका घेऊन, मवाळ होऊन वाटाघाटी करायला तयार होतो. या तहाच्या अटी मान्य करणे भाऊच्या हातात नसल्यामुळे असहायपणे उपासमार होऊन शेवटी केलेल्या निर्वाणीच्या प्रयत्नामध्यें दैव त्याला प्रतिकूल होते. हे सारे चित्रण या कैफियतीतील सौम्य मांडणीमुळे विशेष लक्षणीय ठरते. भाऊसाहेबांच्या बखरकाराने नाट्यपूर्णतेसाठी या साऱ्या घटनांमध्ये मनःपूत उलटापालट करून आपली विश्वसनीयता कमी करून घेतली आहे. या घटनेचे पाणिपतच्या बखरीचे चित्रण तर फार्शी बखरकारांच्या जातीचे आहे.

दत्ताजी शिंद्यांच्या वधापूर्वीच्या शिंदे-होळकरांच्या हालचालींना कैफियतकार मुळीच प्राधान्य देत नाही. कारण त्याचा तसा उद्देशच नाही. परंतु दत्ताजीच्या बुराडी व शुक्रतालच्या युध्दांची भाऊसाहेबांच्या बखरीतील वर्णने आणि 'बचेंगे तो और भी लढेंगे' या प्रसंगचित्रणातून त्याला प्राप्त करून देण्यातले हौतात्म्य यांमध्ये भाऊ. बखरकारांच्या कल्पनाशक्तीचे कार्य बरेच दिसते. ऐतिहासिक दृष्टीने त्याचे समर्थन करता येत नाही, हे

आता कागदपत्रांवरून स्पष्ट झाले आहे. त्या दृष्टीने कैफियतीतील त्याच्या पराक्रमाची व मृत्यूची साधी हकीकत अधिक विश्वसनीय ठरते. नजीबखानाने पागोटे आपटून अब्दालीसमोर कांगावा केल्याची हकीकत शिंदे यांच्या मुखातून ऐकल्याची त्याची नोंद(पृ. २७) त्याच्या विश्वसनीयतेची आणि त्याच्या रणभूमीवरच्या अस्तित्वाची ग्वाही देणारी आहे.

मात्र कैफियतीच्या शेवटच्या भागातील संदिग्ध कालनिर्देशामुळे त्याची विश्वसनीयता काहीशी ढळली आहे. त्यामुळेच भाऊ व नानासाहेब पेशवे यांच्यातील पत्रव्यवहाराचे वर्णनही भावडे उतरले आहे. वास्तविक भाऊ दिल्लीस पोचला, त्यावेळेपासूनच सुजा-मार्फत अब्दालीने वाटाघाटींना सुरुवात केली होती. या वाटाघाटींना अनुलक्षून पानिपत पूर्वी काही महिने अगोदर भाऊ व नानासाहेब यांच्यामधील जो पत्रव्यवहार झाला असण्याची शक्यता होती तिची काहीशी स्थूल कल्पना कैफियतकारास असावी असे दिसते. या पत्रव्यवहाराची योजना अगदी शेवटच्या भागात केल्यामुळे त्यातील भाव महत्त्वाचा असूनही त्याची जागा चुकल्यामुळे काही घोटाळे झाले आहेत.

कैफियतकाराने पानिपत युध्दामागच्या साऱ्या घटनांचा बारकाईने उलगडा करण्याचे धोरण ठेविले नाही. त्याला त्याच्या मर्यादांची यथार्थ जाणीव दिसते. कैफियतीतील वर्णनांच्या अतिसंक्षिप्ततेमुळे पानिपतविषयक कित्येक घडामोडींची चित्रे स्पष्टपणे डोळयांसमोर उभी रहात नाहीत. इतर साधनांच्या साहाय्याने त्यातील तपशील सरते-परते करून घ्यावे लागतात. कैफियतकारांच्या वर्णनातील सूचक बारकावे लक्षात येण्यासारखे नसल्याने सामान्य वाचकांच्या दृष्टीने त्यातील कित्येक घटनांचे अर्थ संदिग्धते-मुळे पूर्णपणे उलगडीत नाहीत. उदाहरणार्थ, सुरजमल्ल जाटाच्या अटी न पाळण्यामागे कोणते राजकारण होते, ते ऐतिहासिक कागदपत्रांवरून लक्षात येते, परंतु कैफियत त्या॰ बाबतीत मुग्धता पाळते. सुजाउद्दौलाशी वाटाघाटी करून त्याला आपल्या बाजूने वळवि-ण्यात भाऊ या काळात दंग होता हे कैफियतकाराने सांगितले असते तर लगेच उल॰ गडा झाला असता. अब्दाली कालहरण करण्यासाठी वाटाघाटी करीत होता का खरो-खरच तह करण्याची त्याची इच्छा होती, याचा कैफियतीतील घटनांवरून नीट उल॰ गडा होत नाही. बुणग्यांच्यामुळे वेगाने मजला मारता येत नाहीत, असे कैफियतकार नोंदवितो. नाना फडणीसाच्या आत्मचरित्रावरून नानासारख्या आजारी माणसाला आणि बायकामुलांना बरोबर घेतल्याने भाऊच्या वाटचालीत खंड पडतो असे म्हटले आहे. बायकामुले व नाना फडणीस यांची गणना बुणग्यांतच कैफियतकार करीत असला पाहिजे. नाना फडणीसासारख्या भाऊबरोबर पानिपतावर गेलेल्या अनेक मातबरव्यक्तींचा उल्लेख कैफियतकार करीत नाही. त्याने निर्दिष्ट केलेले छोटयामोठया चकमकींतील काळाचे अंतर अचूक व काटेकोर नाही. साऱ्या घटनांचा कालनिर्देश त्याने नोंदविलेला नाही. त्यावरून ' सरकारी कागदांवरून या बखरी बनलेल्या आहेत. ' हा रियासतकारांचा

अभिप्राय[१९] चुकीचा ठरतो.

अस्सल कागदपत्रांवरून आपल्या बखरी लिहिण्याचा बाणा आपल्या बखरकारांमध्ये नसतो. ते स्मरणाने व स्वतंत्रपणे लिहितात हे लक्षात घेतले पाहिजे. समकालीनत्वामुळे व वस्तुनिष्ठ मांडणीमुळे कैफियतीतील बरीच वर्णने अस्सल कागदपत्रांइतकीच विश्वसनीय ठरतात हे मात्र खरे!

राजनीती व युद्धनीती

'भाऊसाहेबांची कैफियत' ही पानिपतच्या घनघोर संग्रामाचे चित्रण करण्यासाठी केवळ लिहिली नसून त्या पाठीमागच्या राजकीय हालचालींचा पट आपल्या डोळ्यांसमोर उभे करण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे मराठे आणि मुसलमान यांच्या स्वभावविशेषांचे, त्यांच्या राजनीतीचे आणि युध्दनीतीचे तिच्यामधे फार चांगल्या रीतीने प्रतिबिंब पडले आहे. राजकीय उलाढाली आणि खलबते, लढाया आणि तहनामे, युध्दप्रकार आणि युध्दनीती, विचारप्रणाली आणि आचारधर्म यांची एक सुसंगत स्वरूपाची साखळीच कैफियतीत उभी राहिलेली दिसते.

विजयादशमीच्या मुहूर्तावर सीमोल्लंघन करण, फौजेची जमवाजमव करीत गावाजवळच्या पहिल्या मुक्कामावर वाटाघाटी करीत राहणे आणि मोहिमेचा प्राथमिक भाग म्हणून फौजेची समजाविशी करण्यासाठी आर्थिक तरतुदी करणे, इथून मोहिमेची सुरुवात होते. भाऊसाहेबासारखा मातबर नेता मोहिमेसाठी बाहेर पडल्यानंतर त्याचा मोहरा कोणाकडे वळणार आहे, हे स्पष्टच असते. हैदराबादच्या निजामाने भावी संकट ओळखून कपटकारस्थानाची योजना करणे हे त्याच्या मोगलाई नीतीला साजेसेच आहे. शांत चित्ताने चौकशी करून मग खुन्यास व त्याच्या पाठीमागच्या सूत्रधारास मृत्युदंडाची शिक्षा केली जाते. मुजाफरखानासारखा कटाचा सूत्रधार अशाही प्रसंगी स्वतःचे निरपराधत्व सिध्द करण्यासाठी जो कांगावा करतो तो पाहण्यासारखा आहे. कटाच्या सूत्रधारांना मारून पायाला दोर लावून ओढून टाकण्यात येते आणि खुन्याला मात्र ढालेपाशी नेऊन ठार मारण्यात येते. गुन्हेगारांची मालमत्ता जप्त करून त्यांच्या बायकामुलांना किल्ल्यावर घालण्यात येते. राजकारणात कारस्थानी पुरुषांचे फळ निरपराध बायकामुलांना भोगावेच लागते. तेथे दयामाया नसते.

कोठलाही एखादा किल्ला हस्तगत करण्यासाठी त्याचे बळाबळ पाहून अगोदर हाताखालच्या अधिकाऱ्याची योजना केली जाते. नगरचा किल्ला घेण्यासाठी विसाजीपंत बिनीवाले आणि दिल्लीचा किल्ला घेण्यासाठी बळवंतरावांची योजना करण्यात आली आहे. त्यांच्या हातून ती कामगिरी पार पडली तर ठीकच, नाहीतर मागून फौजेच्या सेनापतीला तोंड द्यावे लागते. अशावेळी मुसलमानी अमलदार सामोपचाराने तह करून

स्वतःच्या स्वार्थ साधून घेताना दिसतात. मराठे अशा प्रसंगी निष्ठुर न होता त्यांना सन्मानाने वागवितात.

मुसलमान आणि मराठे यांच्या राजनीतीत आणि युध्दनीतीतच फार मोठा फरक आहे. गनिमी काव्यासाठी मराठे प्रसिध्द असले तरी पेशवाईच्या उत्तर काळात ते समोरासमोरच्या युद्धात शत्रूला धाक निर्माण करीत असलेले दिसतात. ' मारू किंवा मरू ' हा त्यांचा बाणा. मुसलमानांसारखे खुनी मारेकऱ्यांची योजना करण्याचे त्यांच्या स्वप्नातसुद्धा येणार नाही. तसेच धर्म, जात, अशा कोत्या विचारांचा त्यांच्या मनाला फारसा स्पर्श होत नाही. नव्या युध्दसामग्रीचे स्वागत करण्यास ते तत्पर दिसतात. इभ्रामखान गारद्याचे त्यामुळे भाऊसाहेब उत्फुल्ल मनाने स्वागत करतात.

उदगीरच्या लढाईत वेळेवर कुमक पोचली नाही, तरी ' यश अपेश ईश्वरसत्ता ' हे ध्यानात घेऊन मराठ निजामावर तुटून पडतात. याउलट ' लढोन मरावे, याउपर मराठे यास दबोन रहावे हे उत्तम नव्हे,' अशी सुरुवातीस फुशारकी मारणारा निजाम पराभवाचे सावट दिसताच 'आम्ही तुम्ही स्नेही' म्हणून दाती तृण धरून शरण येतो. युध्दपूर्व चकमकीत मार खाल्ल्यानंतर अबदाली सुजामार्फत वाटाघाटींना सुरुवात करतो. परंतु ' नजीबखानाला हवाली करण्याच्या ' अटीवर मराठे वाटाघाटी उधळून लावतात आणि सर्वनाशाचे धनी होतात.

पानिपतच्या मोहिमेसाठी रघुनाथरावांनी जावे म्हणताच, रघुनाथराव अगोदरच्या मोहिमेतील झालेल्या कर्जाचा उल्लेख करतो. वास्तविक तहान्वये निजाम एक करोड रुपये द्यावयास तयार असताना मराठे ती तात्काळ उपयोगी पडणारी आणि अत्यावश्यक अशी रक्कम न स्वीकारता निजामाच्या ताब्यातील मुलुखाची मागणी करतात. मराठ्यांच्या युध्दनीतीमागे नेहमीच दुबळे अर्थशास्त्र असते; त्यामुळे फौजेतील असमाधान, बेदिली, आर्थिक तंगी आणि त्यामुळे निर्माण झालेले ताणतणाव हे त्यांच्या पाचवीला पुजलेले दिसतात. दामदुष्काळ आणि अन्नदुष्काळ यांमुळे पराक्रमी मराठ्यांना दारुण पराभवाच्या खाईत पडावे लागते.

शिंदे–होळकरांकडून आलेल्या निर्वाणीच्या पत्रांमुळे पेशवे उत्तरेत जावयास निघतात, परंतु शिंदे–होळकरांना खुद्द पेशव्यांनी येणे नको असते. त्यांना फक्त पेशव्यांची कुमक हवी असते. परंतु इराण–अफगाणिस्थानातून अब्दालीला बोलावून त्याला कुमक करण्याची मुसलमानांची वृत्ती, त्यांच्यातील दुबळेपणा, असहाय्यता आणि एकजूट यांचे एकाच वेळी दर्शन घडविते.

दिल्लीचा किल्ला सर केल्यानंतर पैशासाठी मराठ्यांना जनानखान्याची लुटालूट करण्याचा आणि तख्ताचे रुपे काढण्याचा प्रसंग येतो. तातडी करून पैशासाठी त्यांना कुंजपुऱ्यावर जावे लागते. कुंजपुऱ्याचा विजय ही त्यांच्या पराजयाची एक नांदीच ठरते. कारण विजयामुळे गाफील राहून मराठे कुरुक्षेत्रावर स्नानेदाने करण्यात दंग राहतात

आणि त्या पराभवामुळे शत्रूचे सारे सैन्य तातडीने एकवटले जाते. अतिशय दुर्गम अशी दुथडी भरून वाहणारी यमुना नदी माहीतगारांकडून पार करून अब्दाली मराठ्यांचा परतीचा मार्ग रोखून बसतो. उत्तरेतील राजकारण आणि युध्दभूमी यांची पुरी जाण असणारा शत्रू आणि उत्तरेत पहिल्यांदाच जाणाऱ्या भाऊची या बाबतीतली अनभिज्ञता या ठिकाणी तीव्रतेने लक्षात येते.

समोरासमोर फौजांचे तळ पडले असता धर्मयुध्दाचे काही नियम माफक प्रमाणात दोन्ही बाजू पाळताना दिसतात. वाटाघाटीच्या प्रसंगी मोठी झुंज करावयाची नाही, अशी रीत दिसते. अशा वेळी आपापसांतील तणावामुळे मराठे एकमेकांचे बलाबल पारखून स्वतःची बाजू दुबळी करीत राहतात. दोन्ही बाजूंच्या पथकांतील लोक एकमेकांकडे जात येत राहतात. युध्दभूमीवरील झाडी तोडून रणखांब उभा करून शत्रूला युध्दाचे आव्हान मराठे देतात आणि हिंमत धरून झुंजास यावे म्हणून जासुदांकरवी निरोप पाठवितात. आब सोडून पुढे येऊन झुंज करावयास अब्दाली कचरत असतो. अशावेळी अब्दालीच्या तुकड्या ज्याच्यावर चालून येतील, त्यानेच त्यांच्याशी सामना करावा, कोणी कोणाचे मदतीस जाऊ नये; असा विलक्षण स्वरूपाचा आदेश भाऊला द्यावा लागतो. मोठ्या युध्दापूर्वीच्या अशा प्रकारच्या वातावरणाचे आणि हालचालींचे कैफियतीतील वर्णन तत्कालीन युध्दनीतीची उत्कृष्ट कल्पना देते.

दाणागोटा आणि रसद यांच्या अभावी मराठी फौजेची झालेली अवस्था, रसद मिळविण्यासाठी चारणादिकांचे घ्यावे लागणारे साहाय्य, बुणगे मागे राहिल्यामुळे वाढणारे मुक्काम, रात्र पडल्यामुळे युद्धोत्सुक सैन्याचा होणारा विरस आणि एकमेकांची कुमक न केल्यामुळे होणारी फौजेची हानी यांची चित्रणे तत्कालीन युद्धाच्या वातावरणाची यथार्थ कल्पना देतात.

बाजू अंगावर येते म्हणताच शत्रुसैन्य आपापल्या गोटात परत जाते, परंतु पळणाऱ्या सैन्याला हाका मारून मराठे सरदार पाय रोवून उभे राहतात. साऱ्या फौजेच्या बंदोबस्तात भाऊ आणि विश्वासराव रात्रंदिवस मग्न राहतात. त्यासाठी ते आळीपाळीने रणांगणावर हजर राहतात. अब्दाली मात्र सैन्याच्या मागे दूर राहून हालचाली करतो. पराभव स्वीकारून परत तोंड दाखवायचे नाही, या स्वाभिमानी बाण्यामुळेच भाऊ शेवटी थोड्या लोकांनिशी रणांगणावर हाराकिरी करतात. मराठी माणसाचे हे खरेखुरे वास्तव चित्र आहे. पानिपतवरून पळून येणाऱ्यांमध्ये उत्तर हिंदुस्थानात वावरणाऱ्या व्यक्तींचा आणि अनुभवी व्यक्तींचा अधिक भरणा होता. तरुण आणि दक्षिणेतून गेलेली माणसेच या युद्धात अधिक बळी पडली.

जरुरीपेक्षा जादा आत्मविश्वास आणि त्यापोटी येणारा गलथानपणा हे मराठी माणसाचे आणखी काही विशेष. बायकामुलींना बरोबर घेणे, स्नानेदाने करण्यात कालहरण

करणे इ. गोष्टी या फाजील आत्मविश्वासापोटी घडल्या आहेत. पानिपतसारख्या घनघोर संग्रामाकडे मराठ्यांनी जितक्या गंभीरपणे पाहावयास हवे होते, तितके पाहिले नाही. त्याचे फळ त्यांना भोगावे लागले !

शकुन, मुहूर्त, चमत्कार यांचे मराठी मनाला विशेष आकर्षण. त्यामळे कार्यहानी होते. रातोरात कूच करून प्रातःकाळी कुंजपुऱ्याच्या किल्ल्यास वेढा देणाऱ्या इभ्रामखानाला भाऊसाहेब कळवितात की, ' मुहूर्तास तीन घटका अवकाश आहे, तूर्त न उठावे.' इभ्रामखानाच्या मनावर मुहूर्तादिकांचा पगडा नसल्यामुळे तो उलट विचारतो कीं, ' महूर्त् कशास पाहिजे ?' त्यामुळे घाई करून किल्ल्यावर हल्ला केल्यामुळे विजय प्राप्त होतो.

कुरुक्षेत्रावर स्नानेदाने करण्यात दंग असता कुंजपुऱ्याजवळ गिलचा नदी पार करून आला, या घटनेची कारणीमीमांसा न करता आल्यामुळे, ' परंतु ईश्वरचरित्र ! नदीस उतार जाला, त्यामुळे फौज उतरून आली !' असे कैफियतकारास आणि पर्यायाने मराठ्यांसही वाटते. यमुना नदीच्या उताराच्या नेमक्या जागा आणि तिला येणारे पूर यांची माहिती असणाऱ्या माहितगाराच्या साहय्याने अब्दालीने जीवावर उदार होऊन आपली फौज नदीपार करण्यासाठी काय परिश्रम घेतले असतील हे मराठे लक्षात घेत नाहीत. चमत्कारावर हवाला ठेऊन ते मोकळे होतात !

अब्दालीच्या या आक्रमक आणि जलद हालचालींमुळे मराठ्यांची त्याला कोंडी करता आली. या एका हालचालीमुळे पानिपतच्या रणक्षेत्रावर मराठ्यांची कोंडी करता येऊन त्याचे पारडे जड झाले. युद्धशास्त्रातील डावपेचांमध्ये अब्दालीने या मोक्याच्या वेळी मराठ्यावर मात करून अंतिम विजयाची नांदीच करून ठेविली!

राजकारणामध्ये सामदाम, दंडभेद, कपटनीती इत्यादी अनेक भल्याबुऱ्या मार्गांचा उपयोग करावा लागतो. मुसलमान त्यासाठी कोणतीही गोष्ट करावयास मागेपुढे पाहात नाहीत. धर्माच्या नावावर त्यांची जशी एकजूट होते, तशी इतरांची होऊ शकत नाही. भारतीय मुसलमान आणि पठाण यांच्यामध्ये सख्य नसतानादेखील-मराठ्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी ते एकत्र येऊ शकतात. परंतु मराठे, जाट, राजपूत एकत्र येऊ शकत नाहीत. मराठ्यांच्या पदरी इभ्रामखानासारखा नेकीचा सरदार आहे, परंतु त्याची निष्ठा चाकरीपोटी, पैशापोटी आहे. त्यापाठीमागे भारतीयत्वाची भावना नाही. मराठे मोगलांच्या, भारतीय मुसलमानांच्या, मदतीसाठी उत्तरेत जातात, परंतु सारे मुसलमान मात्र परकीय शत्रूला जाऊन मिळतात, कारण त्यांचा धर्म एक असतो. शिंदे-होळकरांसारख्या आपल्या मातब्बर सरदारांच्या साहाय्याला धावून जाऊन अब्दाली-नजीबखानासारख्या परकीय शत्रूचे पूर्ण पारिपत्य करावे, अशी व्यापक स्वप्ने पेशवे पाहतात. परंतु ही व्यापक स्वप्ने पाहण्याची शक्ती उत्तर हिंदुस्थानात राजकारण करण्यास चटावलेल्या मराठी सरदारांमध्ये नसते. परिणामी भाऊबरोबरच्या सरदारांची मने त्यांच्या कार्यात एकरूप होऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांची मनेही एकमेकांबद्दल साफ राहत नाहीत.

मराठ्यांच्या युद्धनीतीमधील हा सर्वांत मोठा कच्चा दुवा होय. त्यामुळे स्वराज्याचे साम्राज्यात परिवर्तन होण्यासाठी अनुकूल संधी प्राप्त झाली असताही मराठ्यांच्या वाट्याला ते भाग्य येऊ शकत नाही.

भाऊसाहेबांच्या कैफियतीचे सम्यक अवलोकन करीत असता तिच्यातील तत्कालीन भारतीय राजकारणाच्या चित्रणावरून या अंतिम निष्कर्षाची तीव्रतेने जाणीव होते.

वाङ्मयीन दृष्ट्या महत्त्व

रावबहादूर सानें यांनी सूचित केल्याप्रमाणे ही कैफियत पेशव्यांच्या शकावलीकर्त्याने वेगळी काढून लिहिली असल्याची शक्यता नाकारता येण्यासारखी नसली, तरी तिच्यातील चित्रण शकावलीच्या जातीचे नसून बखरीच्या जातीचे आहे, हे लक्षात ठेविले पाहिजे. भाऊसाहेब पेशवे यांचे उभे राहिलेले एक अत्यंत संयत व सूचक असे व्यक्तिचित्र, सहजसुंदर अशा धावत्या निवेदनशैलीतून साकार झालेले, आत्मप्रत्ययाने युक्त असे पानिपतविषयक घडामोडींचे एक स्थूल परंतु व्यापक असे शब्दचित्र, वर्णनातील जिव्हाळ्यामुळे या चित्रणाला आलेली हृद्यता, संवादांच्या कौशल्यपूर्ण उपयोगामुळे निर्माण झालेली वातावरणनिर्मिती, अरबी, फार्शी, संस्कृत व हिंदुस्थानी भाषा पचविलेल्या मराठमोळ्या भाषेचे अलंकरणविरहित प्रासादिक रूप, नेटकी प्रसंगचित्रणे आणि युद्धवर्णने, मध्ययुगीन मराठीत अपवादानेच प्रकटणारी अशी मार्मिक भाष्यपरता इत्यादी वैशिष्ट्यांमुळे ही छोटीशी कृती वाङ्मयीन दृष्टीनेही महत्त्वाची ठरते.

भाऊसाहेबांचे व्यक्तिचित्र

भाऊसाहेबांवर आपले सारे लक्ष केंद्रित करून कैफियत लिहिल्यामुळे तिच्यामध्ये साहजिकच त्यांच्या व्यक्तिचित्रणाला प्राधान्य प्राप्त झाले आहे.

शके १६८२ च्या विक्रमनाम संवत्सरामध्ये सीमोल्लंघनाच्या निमित्ताने आपल्या पुतण्याला बरोबर घेऊन भाऊसाहेब पुण्याबाहेर पडतात. केवळ वर्षभराच्या अवधीत भारताच्या राजकीय रंगभूमीवर एक विलक्षण कर्तृत्व दाखवून रणांगणावर वीरमरण आल्याने दिगंतकीर्त होतात आणि भारताच्या इतिहासात त्यांच्यासाठी मानाचे पान राखून ठेविले जाते.

भाऊ मोहिमेसाठी बाहेर पडतात आणि तिकडे निजामाला कापरे भरते. त्यांच्यावर घातलल्या मारेकऱ्याच्याच शब्दांत सांगायचे म्हणजे, 'भाऊसाहेब मातबर कारभारी यास्तव कांहीं आपला उपाय चालत नाहीं, तरि त्यास हरप्रयत्नेंकरून जीवें मारावें' यासाठी निजामाने मोगलाई मसलतीचा अवलंब केला आहे. प्रत्यक्ष कट्यार चालवतान 'तुमचे प्रतापेंकरून माझा हात कांपों लागला. कटार पुरती चालवावयास सामर्थ्य आलें नाहीं' याची कबुली खुन्याने दिली आहे. भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील वेधकतेची त्यावरून सुरुवातीलाच कल्पना येते.

भाऊसाहेबांच्या शांत, स्थिर स्वभावाचे याप्रसंगी दर्शन घडते. ते खुन्याला अभय देऊन, 'दुसऱ्याचे बोलण्यावरून तुजला कशास मारावे, ' अशी त्याचीच उलट समजूत घालतात. कटाचा सूत्रधार मुजाफरखान परामर्षास आला असता, 'तुजपासून हें कर्म होणार नाहीं ' असे सांगून त्याला गाफील ठेवतात आणि पूर्ण शहानिशा झाल्यानंतर मात्र तडकाफडकी गुन्हेगारांना कठोर शासन करतात.

शासनकर्त्याची मुत्सद्देगिरी, शहाणपणा, समयसूचकता, न्यायदृष्टी आणि तात्काळ निर्णय घेऊन जरब बसविण्याची शक्ती यांची कल्पना एवढ्या एकाच उदाहरणावरून वाचकांस येते. या पहिल्यावहिल्या कलात्मक अशा काहीशा विस्तृत वर्णनाने कैफियतकाराने सुरुवातीलाच भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची बैठक वाचकांच्या मनात पक्की रोवली आहे आणि त्यांच्या पुढच्या हालचालीबद्दल वाचकांच्या मनात कुतूहल निर्माण केले आहे.

भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील मुत्सद्देगिरीच्या आणि शिपाईगिरीच्या सामर्थ्याचा प्रत्यय त्यानंतरच्या दोन मोहिमांमध्ये तात्काळ येतो. त्यातील पहिली मोहीम सौम्य स्वरूपाची तर दुसरी साऱ्या दक्षिणेमध्ये भाऊंचा दरारा प्रस्थापित करणारी आहे. दहा हजार सैन्यानिशी विसाजीपंत बिनिवाल्याने नगरच्या किल्ल्यावर चढाई केली असता ढिम्म काही घडत नाही, परंतु भाऊसाहेब पुण्याहून निघाले म्हटल्यानंतर त्यांच्या केवळ धाकाने किल्ला हस्तगत होतो. एकही गोळी न झाडता भाऊंना हा विजय प्राप्त होतो.

नगरच्या यशाने भाऊला हवे तेच घडते. निजाम साऱ्या सामर्थ्यानिशी मराठ्यांवर चालून येण्यास निघतो. क्षणाचाही विलंब न लावता 'आम्ही मोगलांचे तोंडावर जातों.' म्हणून पुण्यास पेशव्यांना निरोप पाठवून तो निजामावर निघतो. दक्षिणेमध्ये प्रबळ होऊन बसलेल्या निजामाला पूर्णपणे बुडवावा, बहुत दमाने आला आहे,त्याचे पारपत्य करावे, असा दूरदृष्टीचा विचार भाऊसारख्या धडाडीच्या सेनानीच्या मनातच येऊ शकतो. मनात आलेल्या विचाराबरोबर तातडीने आणि आत्मविश्वासपूर्ण कृती करण्याचा त्याचा बाणा कैफितकाराने वारंवार स्पष्ट केला आहे. पुण्याजवळच्या सिंहगडावर मोगलांचे फडफडणारे निशाण पाहून शिवाजी जसा अस्वस्थ झाला होता, तसा नगरच्या किल्ल्यावर फडफडणारे त्याच्यासारखे निजामाचे निशाण पाहून भाऊ अस्वस्थ झाला होता. तसे नानासाहेब किंवा रघुनाथरावदादा अस्वस्थ होत नाहीत. स्वतःच्या मनाप्रमाणे तडकाफडकी निर्णय घेणे आणि तरीही पेशवे राज्याचे अखत्यार असल्याने त्यांच्या संमतीने धडाडीने पुढची वाटचाल करणे हा भाऊसाहेबांचा विशेषच होय. एकनिष्ठ राजांकितत्व आणि सर्वांगीण फौजाधिपत्य या दोन गुणांनी सेनापतीचे कर्तृत्व उजळीत राहते. भाऊजवळ हे दोन्ही गुण उत्कट स्वरूपात वास करीत होते हे कैफियतीतून जाणवते.

नगरच्या किल्ल्यामधला निजामाचा दारुगोळा आणि दाणागोटा निजामावरच वापरण्याची संधी भाऊसाहेबाला सोडायची नसते. परंतु दक्षिणेतला निजाम हे सामान्य प्रस्थ

नव्हते. त्याच्या पूर्वीच्या पेशव्यांच्या कारकीर्दीत त्याला मोडण्याच्या प्रयत्नाला यश आले नव्हते. भाऊला त्यात मोठे यश मिळाले ते गतिमान काळाशी धावण्याच्या त्याच्या वेगळ्या दृष्टिकोणामुळे. फ्रेंच आणि पोर्तुगीज कवायती फौजांच्या जोडणीमुळे निजाम प्रबळ झाला होता. ती त्याची शक्ती दुबळी करणे आवश्यक होते. अशा कवायती सैन्याचा सरदार मुजाफरखानाला यापूर्वीच नानासाहेबांनी फोडिले होते. परंतु तो अस्तनीतला निखारा ठरला होता. भाऊने आपल्या तोफखान्यावरचा अधिकारी केशवराव पानसे याच्यामार्फत इभ्रामखानाला निजामापासून फोडून आपल्याकडे आणण्यात यश मिळवले. भाऊंनी या इभ्रामखानाला सन्मानपूर्वक आपल्या सेवेत ठेविले. नगरच्या किल्ल्यातील दारुगोळा इभ्रामखानाच्या तोफखान्याच्या साहाय्याने निजामावरच डागून भाऊने निजाम नामोहरम केला. भाऊने आणलेला हा इभ्रामखान मुसलमान असूनही भाऊंच्या अगत्यामुळे भाऊंशी कमालीचा एकनिष्ठ राहिला. भाऊला माणसाची पारख किती उत्तम होती, हे त्यावरून लक्षात येते. ' बरा मनुष्य मातबर कराराचा ' हे बरोबर ओळखून भाऊ त्याच्याबद्दल विशेष अगत्य दाखवितात. भाऊच्या पारखीचे त्याने चीज केलेले दिसते.

वाचकांचे मत काही प्रमाणात का होईना कलुषित होईल अशा प्रकारे 'भाऊसाहेबांच्या बखरी'त भाऊचे व्यक्तिचित्रण करण्यात आले आहे. नाना फडणिसांनीही आपल्या आत्मचरित्रात ' गर्व मात्र विशिष्ट ' या शब्दांत त्याच्यावर दोषारोप केला आहे.[२०] कैफियतकाराने तसा प्रकार कुठेही केला नाही. त्याने त्यांचे निष्कलंक चित्र रेखाटले आहे.

उदगीरच्या मोहिमेत विजय मिळाल्यानंतर झालेल्या तहाची कार्यवाही करण्यासाठी भाऊ गोपाळरावाची योजना करतात. उत्तरेतील शिंद्यांच्या वाताहतीची पत्रे वाचल्यानंतर, ' तिकडे रघुनाथरावदादांनीं जावं ' असाच आग्रह धरतात, परंतु कर्जाविषयी दाद हटून बसतात तेव्हा, मुलुखगिरीमागचे राजकर्त्यांचे उद्दिष्ट भाऊ नेमक्या शब्दांत व्यक्त करतात. मुलुखगिरीतून घरी पैसा आला पाहिजे, निदान बाहेरच्या बाहेर सैन्याची पोटे भरली पाहिजेत, असे ते म्हणतात.

या महत्त्वाच्या राजनीतीचा पेशवाईत मराठ्यांना विसर पडला होता. दिवाण म्हणून या धोरणाची अमलबजावणी करण्यासाठी स्वतःच्या अंगावर जबाबदाऱ्या घेऊन भाऊ जातीने मोहिमांवर निघतात. बाहेरच्या बाहेर परस्पर पैसा हडपणाऱ्या आणि त्यासाठी चटावलेल्या उत्तर हिंदुस्थानातील सरदारांमध्ये त्यामुळे चलबिचल सुरू होते.

नानासाहेब स्वतः उत्तरेत जाण्याची निदान तोंडदेखली का होईना भाषा उच्चारतात, तेव्हा आपल्या कर्तव्याची जाणीव ठेऊन भाऊ स्वतः जायला निघतात आणि तडकाफडकी प्रस्थान ठेवतात. निर्णयाची त्वरित कार्यवाही करणे हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष होय. भलत्या वेळी ऐषआराम करणे त्यांना माहीत नाही. कुंजपुऱ्यास पोचल्यावर केवळ पाणी पिऊन ते चढाईसाठी सिद्ध होतात.

आपल्या सहकाऱ्यांशी वाटाघाटी करून निर्णय घेणे, आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्याकडे सोपविलेल्या कामात अपयश आलें तर वाटाघाटीत किंवा विचारविनिमयात कालहरण न करता स्वतः जातीने मोहिमेचे नेतृत्व करणे आणि आपल्या सहकाऱ्यांच्या स्वार्थाची जाणीव मनात ठेवून कार्यसिद्धीसाठी प्रयत्नरत राहणे, या त्यांच्या विशेषाची अनेक चित्रणे कैफियतीत आहेत. पानिपतच्या रणात कोंडी झाली असता भाऊ विमनस्क होत नाहीत. गोविंदपंतांना खरमरीत पत्रे लिहून ते कामाला लावतात, चारणांची योजना करून फौजेचे साहाय्य देऊन दाणागोटा आणण्याची योजना करण्यात रात्रंदिवस दंग राहतात.

शत्रूच्या सामर्थ्याचा नीट अंदाज येण्यासाठी भाऊंनी अनेक क्लृप्त्या लढविलेल्या दिसतात. एकमेकांचे बलाबल अजमावण्यासाठी ते आपल्याकडच्या सरदारांना स्वतंत्रपणे उठावणी करण्यास प्रोत्साहन देतात. सगळ्यांनी एकदम उठावणी केल्यास वाटाघाटी फिसकटतील हे लक्षात येऊन अशा उठावांच्या वेळी 'कोणी कोणास कुमक करूं नये' असा आदेश देतात. त्यामुळे कोण कोणावर त्वेषाने उठतो, आपल्यातीलच कोण कोणाच्या मदतीसाठी उत्सुक होतो, कोणाचे शत्रू कोण आणि कोणाची जिद्द किती हे समजण्यास मदत होते. आपल्या टेहळणीपथकावर हल्ला करून गिलच्यांनी पहिल्यांदा कळ काढल्यानंतर मग भाऊ आपल्या पथकांना चढाईचे आदेश देतात. आपल्या बाजूच्या झाडीमुळे कदाचित मराठे गनिमी काव्याचा आश्रय घेतील.म्हणून शत्रू कचरतो आहे, हे लक्षांत घेऊन भाऊ आपल्या फौजेकडून झाडी तोडून मध्ये रणखांब रोवतात आणि 'हिंमत धरून जुंजास यावें 'असे उघड आव्हान शत्रूस देतात. ही त्यांची कृती त्यांच्या निधड्या छातीची आणि आव्हानात्मक वृत्तीची ग्वाही देणारी आहे.

'कोणाचे मदतीस कोणी जाऊ नये' असे म्हटले असले तरी बाजू अंगावर आल्यावर स्वतः भाऊ भक्कमपणे त्यांच्या पाठीमागे उभे राहतात. बळवंतरावाच्या मृत्यूनंतर भाऊ मागे होते म्हणून हुजुरातीचे लोक मुडदा शत्रूच्या ताब्यात जाऊ देत नाहीत. दहशत घाऊन माघारे पळणाऱ्या सैन्यास मागून छातीचा कोट करून भाऊंनी सावरले म्हणूनच नजीबखानाचा मोड होऊन त्याला माघारी जावे लागले आणि त्यामुळें 'पुढें लढाई करून गिलचा खामाखाय मोडून काढावा.' अशी हिंमत फौजत निर्माण झाली. परिणामी सुजामार्फत अब्दालीने बोलणी चालू केली 'परंतु रोहिला आमचे हाती द्यावा' हा महत्त्वाचा मुद्दा भाऊंनी सोडला नाही. दत्ताजी शिंद्यांच्या वधास आणि उत्तर हिंदुस्थानातील विपरीत राजकारणास कारण झालेल्या नजीबावर भाऊंचे सारे लक्ष होते. भाऊंच्या राजकारणाचे हे सूत्र भारतीय मुसलमानांना उमजू शकले नाही ! ते धर्माच्या नावाखाली एक झाले. भाऊंचे लक्ष धर्मापेक्षा राजकारणावर होते.

कुंजपुऱ्यावर विजय मिळाल्यानंतर तीर्थक्षेत्रामध्ये स्नानेदाने करण्यात भाऊने कालहरण करावे, हे त्याच्या सेनापतीपदाला शोभेसे नाही. त्यामुळें कोंडी होऊन रसद बंद

झाली. ती चालू करण्याचे भाऊचे प्रयत्न अब्दालीने हाणून पाडले. भाऊंच्या या प्रयत्नामुळ अब्दालीला दोनवेळा आपल्या लष्करच्या छावणीच्या जागा बदलाव्या लागल्या हे लक्षात घेण्यासारखे आहे.

मुत्सद्देगिरी आणि शिपाईबाणा यांचा भाऊमध्ये संगम झालेला दिसतो. परंतु उत्तर हिंदुस्थानच्या आपल्याच लोकांच्या स्वार्थी आणि करंट्या वृत्तीकडे त्यांना असहाय होऊन पहात बसावे लागते. त्यामुळे ते अंतर्यामी कमालीचे व्यथित झालेले दिसतात. भाऊंनी उत्तरेत येऊ नये म्हणून शिंदे–होळकरांनी केलेले प्रयत्न, सुरजमल्ल जाटाची प्रत्यक्ष मदतीपेक्षा स्वतःच्या स्वार्थपर अटी पुढे दामटण्याची वृत्ती, बळवंतराव मेहेंदळे यांनी दिल्लीचा किल्ला घेताना केलेली कृती इ. प्रसंगी भाऊ अस्वस्थ होतात, परंतु विनाकारण संतापून कटुता निर्माण करीत नाहीत. सारे जाणून, लक्षात घेऊनही सामोपचारी वृत्ती ठेवून, स्वतः सहन करीत, कार्याकडे लक्ष ठेवून ते वागताना दिसतात.

युध्दभूमीवर, युद्धातील बारीकसारीक हालचालींवर भाऊ सातत्याने लक्ष ठेऊन असत आणि त्याची वित्तंबातमी पुण्यास पेशव्याकडे पाठवीत. पावणेतीन महिने भाऊ सतत जातीने मोर्च्यांवर होते. स्नानभोजनासाठी ते स्वतःच्या राहुटीवर येत त्यावेळी आपल्या पुतण्याला–विश्वासरावाला–मोर्च्यावर लक्ष ठेवण्यास सांगून येत, या कैफियतकाराच्या वर्णनातून भाऊंच्या कर्तव्यदक्षतेची चांगली कल्पना येते.

गोविंदपंत बुंदेले यांच्या कामगिरीला आलेले अपयश आणि गरनाळयाहून चारण आणण्याच्या व्यवस्थेची शत्रूने केलेली दाणादाण यांमुळे भाऊंना झालेल्या यातनांचे वर्णन, ' श्रीमंतांस अपेशाचे श्रम जाले ' या शब्दांत चांगल्या प्रकारे केले आहे. य अपयशानंतर भाऊंना माघार घेणे आवश्यक वाटते म्हणून ते पुण्यास पेशव्यांना पत्रे पाठवून तह करण्याची संमती मागवतात. पेशव्यांना परिस्थितीची गंभीर जाणीव नसल्याने ते भाऊंचा काहीसा उपहासच करतात, ही गोष्ट मानी भाऊंच्या मनाला फारच लागली असली पाहिजे. सैन्याची व घोडयांची उपासमार त्यांना पाहवत नाही. त्यामुळे शत्रूला मार देत आपले सैन्य बाहेर काढण्याचा तडकाफडकी निर्णय घेतात. तेवढा एकच प्रयत्न शिल्लक राहतो. शिंदे–होळकरादी लोक नाखूष असतात. निभाव कसा लागेल, म्हणून आपला दुबळेपणा व्यक्त करतात. आणखी पाच–सहा दिवस थांबावे असे म्हणतात. आणखी उपासमार टाळण्यासाठी भाऊ लगेच दुसऱ्या दिवशी आपला निर्णय कार्यवाहीत आणावयाचे ठरवतात. 'लोक आबादान जालियावर पुडे गिलच्याचें पारिपत्य करू' या त्यांच्या सिद्धांतामध्ये कसल्याही आग्रहाला बळी न पडता वास्तव निर्णय घेण्याची त्यांची वृत्ती लक्षात येते.

पानिपतच्या अखेरच्या घनघोर संग्रामास सामोरे जाताना भाऊ सर्व प्रकारे पुढची निरवानिरव करतात. आपण लढाईत पडलो असे ऐकल्यावर आपल्या पत्नीचा वध करून पुढे जावे असे ते जोगदंडाला सांगतात.

या अखेरच्या संग्रामामध्ये पराभूत मनोवृत्तीने ग्रासलेल्या, धीर खचलेल्या सैन्याला थोपवून धरण्यात भाऊंना यश येत नाही. विश्वासरावच्या अपघाती निधनाने सारीच बाजू उलटते. अशावेळी ' गिलचा खाशानिशी मारीन ' म्हणून भाऊ आणखी त्वेषाने लढतात. ' हाणा ऽ हाणा ' करीत शेवटपर्यंत ते जातीनिशी लढत राहतात. इभ्रामखान, मुकुंदजी शिंदे आणि जनकोजी शिंदे यांखेरीज बरोबर कोणी रहात नाही. सोनजी भापकरला क्षात्रधर्माची जाणीव देण्याचा ते शेवटचा प्रयत्न करतात. त्यांच्या पराक्रमाने स्तिमित होऊन ' महाराज, क्षात्रधर्माची शर्त झाली. याज उपर निघावें हें उत्तम आहे.' असे मुकुंदजी शिंदे यांनी सुचविले असता, ' आतां कोणीकडे जावें, काय तोंड दाखवावें ?' या भावनेने लढता लढता नाहीसे होतात.

त्यांच्या जिद्दीचे, स्वाभिमानाचे आणि अंतिम पराक्रमाचे दर्शन पळपुटेपणामुळे ज्यांना घडले नव्हते अशा लोकांना, ' ते पळून गेले असतील किंवा थोडया वेळानें नेहमीप्रमाणे खंदकांत परत येतील ' असे वाटावे हा त्या महान पराक्रमी पुरुषाच्या वाट्याला आलेला दैव-दुर्विलास होय.

कफियतकार चुकूनही पौराणिक दृष्टान्त वापरीत नाही. मात्र त्याने भाऊसाहेबांच्या शेवटच्या पराक्रमाला उद्देशून ' पूर्वी भारथीं अतिरथी जुंज जाले. त्याप्रमाणें भाऊसाहेबांनीं लढाईची शर्थ केली. असा एकुलता एक पौराणिक दाखला दिला आहे. असा दाखला देण्यासारखे कर्तृत्व दाखविणारे इतिहासातील एक उज्ज्वल व्यक्तिमत्त्व म्हणून भाऊसाहेबांचे नाव मराठ्यांच्या इतिहासात अजरामर होऊन राहिले आहे.

गौण व्यक्तिचित्रे

कैफियतीतील भाऊसाहेबांखेरीच इतर व्यक्तिचित्रे अगदी गौण स्वरूपाची आहेत. पानिपतच्या मोहिमेशी संबंधित असणाऱ्या साऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींचा कैफियतकाराने उल्लेख केला असला तरी भाऊंखेरीज इतर व्यक्तिचित्रे त्याने जरुरीपुरतीच चित्रित केली आहेत. वर्णनाच्या भरात सहजगत्या एकाददुसऱ्या वाक्याच्या फटकाऱ्याने उभ्या राहिलेल्या या व्यक्तिचित्रांतून कैफियतकाराची त्यांच्याबद्दलची जाण किती सखोल होती हे लक्षात येते.

सुरुवातीला मुजाफरखान आणि त्याचा जावई याची व्यक्तिचित्रणे आहेत. जावयाने केलेल्या कृत्याबद्दल त्याच्या मनात एक प्रकारची पश्चात्तापबुद्धी निर्माण झाली आहे. परंतु आता आपण जगत नाही, हे पाहून तो कटाचे सारे धागेदोरे स्पष्टपणे उलगडतो. त्याच्या उलट मुजाफरखानाची वृत्ती आहे. आपल्या निरापराधीपणाचे नाटक करून तो स्वतःचा गुन्हा लपवायला जातो आणि त्यामुळे त्याची लबाडी त्याच्या कांगाव्यातून अधिक उघडी पडते. त्या दोहोंच्या पार्श्वभूमीवर इभ्रामखानाचे व्यक्तिचित्र विलोभनीय वाटते. भाऊसाहेबांशी त्याने केलेल्या बोलण्यावरून त्याचे महत्त्व लक्षात येते. 'भला मनुष्य. मातबर कराराचा ' असा त्याने लौकिक प्राप्त करून घेतला आहे. कुंजपुरावरच्या

मोहिमेच्या वेळी, 'पत्र पावतांच स्वार होऊन येणे' असा भाऊंकडून निरोप येताच रातोरात कूच करून प्रातःकाळीच तो दाखल होतो आणि परभारे किल्ल्यास येऊन झगटतो. भाऊंनी मुहूर्ताची सबब सांगून त्याला 'तूर्त न उठावे' असा सांगावा धाडला तेव्हा आता कालहरण करता कामा नये हे लक्षात घेऊन 'मुहुर्त कशास पाहिजे आम्ही किल्ला फत्ते करितों व हुजूर येतो. साहेबीं धीर धरून एक प्रहर बसावें' असा उलट निरोप धाडतो. त्यावरून त्याची धडाडी आणि आत्मविश्वास लक्षात येतो. उद्‌गीरच्या लढाईत त्याच्या तोफांनी किमया केली होती तशी दुसरी संधी मिळाल्यानंतर तो इर्ष्येने चाल करतो. त्याच्या निकडीमुळे सार्‍यांना तशीच तातडी करावी लागते. पानिपतच्या रणभूमीवर वाटाघाटी आणि किरकोळ चकमकी यांमुळे त्याची कुचंबणा होते. तेथेही बळवंतरावाच्या साहाय्यास तो धावून जातो आणि नजीबाचे प्रयत्न विफल करतो. अंतिम लढाईत भाऊसाहेबांशी शेवटपर्यंत साथ करणाऱ्या निष्ठावानांत तो होता. त्याच्यावर शत्रूची लूट पडल्यानंतर त्याने केलेल्या पराक्रमाचे उज्ज्वल चित्र कैफियतकाराने रंगविले आहे. 'त्याणें जिवाचा निधडा करून शिपाईगिरी म्हणावी तैशी केली, ज्याचें नांव शिपाईगिरी' असा गौरव कैफियतकाराने इभ्रामखान आणि जनकोजी शिंदे यांच्या बाबतीतच केला आहे.

जनकोजी शिंदे यांनी अगोदरच्या एका चकमकीत आणि पानिपतच्या अंतिम घनघोर संग्रामामध्ये निष्ठेने आणि शर्थीने साथ केली आणि भाऊबरोबर त्यालाही वीरमरण प्राप्त झाले. असाच गौरव आणखी एका फारशा ज्ञात नसलेल्या व्यक्तीला प्राप्त झाला आहे. तो म्हणजे मुकुंदजी शिंदे. भाऊसाहेबांनी शेवटी पराक्रमाची शर्थ केल्यानंतर रणांगणातून निघावे, अशी तो सूचना करतो. भाऊ तयार होत नाहीत. 'विश्वासरावांकडे पाहावे,' या भाऊंच्या सूचनेकडे दुर्लक्ष करून तो रणांगणात उडी घेतो. 'जातीनें हत्यार करवलें तेथवर केलें. मातबर मराठधर्माची शर्थ करून ठार जाले' या शब्दांत कैफियतकाराने त्याचा मोठा गौरव केला आहे.

या तिघांच्या तुलनेने मल्हाररावांचे व्यक्तिचित्र फिके आहे. त्याला कफियतकाराने फारसे प्राधान्य दिले नाही. पराक्रमापेक्षा मुत्सद्देगिरीवर त्याची असलेली भिस्त, भाऊने त्याचे न ऐकता उत्तरेत आगमन केल्यामुळे त्याची झालेली तगमग आणि वृद्धपणामुळे त्याच्या व्यक्तिमत्वात निर्माण झालेला दुबळेपणा कैफियतकाराने दाखविला आहेच.

जाट होळकराच्या विश्रमाने वाटाघाटी करतो तेव्हा 'होळकरांच्या आनुमतें' तो बोलतो हे लक्षात भाऊसाहेब श्रीमंताच्या आज्ञेची सबब सांगून त्याला सफाईने कटवतात. होळकरांचे मित्र म्हणवणाऱ्या जाटाची कदर भाऊसाहेब करीत नाहीत, ती त्याच्या कामापेक्षा स्वतःच्या स्वार्थाच्या डगरीवर हात ठऊन वावरण्याच्या वृत्तीमळे. दिल्लीचा किल्ला सर करण्यात बळवंतरावाबरोबर होळकरांची फौज होती. पठाणांचा बंदोबस्त

न करता बायकामुलांची लुटालूट करण्याचा प्रकार घडला तो होळकरांमुळेच. कारण अशा तऱ्हेच्या लुटालुटीत ते चटावले होते. भाऊंनी बळवंतरावांची सौम्य शब्दात जी निर्भत्सना केली, 'ती लेकी बोले सुने लागे' या तत्वाला अनुसरून होळकरांसाठीच असली पाहिजे. कार्तिक वद्य ३० च्या चकमकीत सुजात डवला याने होळकरांच्या बाजूवर नेमका हल्ला केला, त्यावरून त्यांचा होळकरांवरील राग स्पष्ट होतो. त्यावेळी आपले लोक पळू लागलेले पाहून, घोडयावरून उतरून गाशा टाकून होळकराने केलेला आरडाओरडा त्याच्या असहायतेची आणि त्याच्या वृध्दपणाचीही कल्पना देतो. या चित्रणामध्ये कैफियतकाराने सौम्य असे विडंबनाचे रंग वापरले आहेत. होळकरां-सारख्या मातब्बर सरदाराने अंतिम युद्धात त्यांच्यावर मारा झाल्यानंतर पळून जावे, यात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा कमकुवतपणा लक्षात येतो. त्यांचे दिवाण गंगाधरतात्या तर दिल्लीस पळून जाऊन नारो शंकरकडे अगोदर यथास्थित भोजन करतात आणि नंतर 'तुम्ही डोळे झाकून का बसलात ?' अशी चिथावणी देऊन अगोदर पळावयाचे बघतात, याही चित्रणातला उपरोध लक्षात राहतो. शिंद्यांनी लढाईत गारद व्हावे आणि होळकरांनी प्राण वाचविण्याची केविलवाणी धडपड करावी, यांतला विरोध तत्काल जाणवणारा आहे.

दोन शेजारच्या व्यक्तिचित्रणांमध्ये सौम्य स्वरूपाचे नाटय निर्माण करण्यात बखर-कार कुशल आहे. पार्वतीबाईसाठी योजिलेला होळकरांचा विसाजी कृष्ण जोगदंड पळून जाऊन जीव वाचवतो तर जानू भिंताडा जीव धोक्यात घालून तिचे रक्षण करतो.

नानासाहेब, दादासाहेब, गोपिकाबाई, पार्वतीबाई आणि विश्वासराव यांचे उल्लेख कैफियतकाराने जेवढयास तेवढे केले आहेत. विश्वासरावाने शेवटी आपल्या वडिलांना निर्वाणीचे पत्र लिहून भाऊसाहेबांचे महत्त्व स्पष्ट करावे, यातला उपरोधही चांगलाच बोचरा आहे. सर्व बाजूंनी कोंडी झाल्यावर भाऊसाहेबांनी लिहिलेल्या पत्राला नानासाहे-बांनी जे उत्तर पाठविले आहे, त्यावरून त्यांना शेवटपर्यंत पानिपतचे गांभीर्य जाणवले नव्हते, हेच लक्षात येते.

गोविंदपंत बुन्देले यांच्या व्यक्तिचित्रणात त्यांच्या नाकर्तेपणाचे नेटके सूचन आहे. 'सरंजाम आम्हाकडे हर एक विचारें करून पोंचता तुम्हीं करावा तें होत नाहीं' अशा कानपिचक्या दिल्यानंतर ते अंतरवेदीत हालचाल करू लागतात. गिलच्याकडच्या फौजेची गाठ पडल्यानंतर त्यांना काढावा लागणारा पळ त्यांना शोभेसा नाही. पळताना त्यांचे सारखे घोडयावरून पडणे, वारंवार त्यांना घोडयावर सावरून बसविणे आणि शेवटी त्यांचा झालेला शिरच्छेद यांतून त्याच्या कामचुकारपणाला दैवाने चांगली अद्दल घडविली, याची जाणीव होते.

बळवंतरावाने शिंद्यांना मदत करण्यात जी कुचराई केली, त्याचे फळ त्याला मिळाले असे वाटते.

होळकरांचा स्नेही जाट याची दुटप्पी वृत्ती कैफियतकाराने रंगविली आहे. सहाय्या-

पूर्वी त्याच्या अटीच फार आहेत आणि दिल्लीचा किल्ला बळकावण्यात त्याचा काहीच हात नसता, त्याचे आयते फळ मात्र त्याला हवे आहे ! अशा व्यक्तीची फारशी कदर भाऊने केली नाही हे बरोबरच झाले असे वाटते. जाटाच्या बायकोने पळणाऱ्या सैन्याला धीर देऊन, संरक्षण देऊन त्याला जी मदत केली, त्यामुळे त्या माऊलीचे दयार्द्र अंतःकरण आणि औदार्य लक्षात येते. त्यामुळे तिच्या नवऱ्यापेक्षा तिचे व्यक्तिचित्र लक्षात राहाते. तिच्या तुलनेने गोपिकाबाई आणि पार्वतीबाई यांची चित्रणे अगदी अस्पष्ट आहेत. त्या मानाने रणांगणावर निग्रहपूर्वक सती जाणाऱ्या बळवंतरावांच्या स्त्रीचे चित्र अधिक उठावदार झाले आहे.

शत्रूपक्षापैकी अब्दाली, नजीबखान आणि सुजा यांचे उल्लेख वारंवार येतात, परंतु त्यांच्या व्यक्तिचित्रणाचे सूक्ष्म बारकावे कैफियतकाराने वर्णिलेले नाहीत.

मराठ्यांनी कुंजपुरा घेतला म्हणून अब्दाली मनगटे चावीत बसतो, परंतु ते कुरुक्षेत्रावर गेलेले पाहून जाणकार लोकांच्या मदतीने दुथडी भरून चाललेली यमुना उतरून मराठ्यांची कोंडी करतो. त्या दृष्टीने सेनापती म्हणून त्याने भाऊसाहेबांपेक्षा अधिक पावसाळे पाहिलेले आहेत, हे लक्षात येते. उत्तर हिंदुस्थानातील साऱ्या मुसलमानांना एकत्रित आणण्याचे कौशल्य त्याच्यामध्ये निर्विवादपणे आहे. मराठ्यांची कोंडी केल्यानंतर आपल्या सैन्यामध्ये धान्याची महर्गता होते आहे, हे लक्षात घेऊन दोन वेळा तो आपल्या सैन्याची फिरून मांडणी करतो. सुरुवातीला आपण होऊन मराठ्यांवर चढाई करावयाची नाही, हे त्याचे धोरण योग्य असल्याचे नंतरच्या चकमकींवरून लक्षात येते. मराठ्यांना वाटाघाटीत गुंतवून त्यांची उपासमार करून त्यांना निष्प्रभ करण्याचे त्याचे धोरण त्याच्या वरचा दर्जाच्या मुत्सद्देगिरीची व सेनाकर्त्यांची कल्पना देते. युद्धाच्या दृष्टीने त्याची परिस्थिती त्याला अनुकूल असूनही यशाबद्दल तो शेवटपर्यंत साशंक दिसतो. भाऊसारखे आघाडीवर न राहता मागे राहून सूत्रे हलविण्याच्या त्याच्या वृत्तीमुळे त्याच्या तुलनेने भाऊचे चित्र अधिक परिणामकारक वाटते.

सुजाचे व्यक्तिचित्र फारसे परिणामकारक नाही. त्याच्या होळकरावरच्या रागामुळे तो चकमकीमध्ये त्याच्यावर उठतो आणि त्याची फजिती करतो. परंतु शिंदे आणि हुजरातीच्या सैन्याने नजीबखानाची केलेली दाणादाणा पाहून तो तहाच्या वाटाघाटीसाठी प्रयत्न करतो. पानिपतच्या अपयशानंतर मराठ्यांचे मागील उपकार लक्षात घेऊन तो कत्तलीला आळा घालतो. त्याच्या ताब्यात आलेल्या मातबर व्यक्तींना आपल्या पदरच्या हिंदू लोकांकडून मंत्राग्नी देण्याची व्यवस्था करतो. या त्याच्या पश्चात कृतीपेक्षा तो पहिल्यापासून मराठ्यांकडे आला असता तर दिल्लीची वजिरी मिळविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा सफल होऊन त्याला महत्त्व प्राप्त झाले असते !

सुजापेक्षा नजीबखानाचे व्यक्तिचित्र ठसठशीत आहे. मराठ्यांचा तो नंबर एकचा शत्रू आहे, त्यामुळे त्याला ताब्यात देण्यासाठी मराठे हटून बसतात. या एकाच घटनेने

त्याचे असाधारण महत्त्व लक्षात येते. अब्दालीला नजीबची जोड नसती तर पानिपतचा इतिहास वेगळा घडला असता! अब्दाली त्यामुळे नजीबची विशेष कदर करताना दिसतो.

कार्तिक वद्य ३०च्या चकमकीत त्याला दारुण पराभव स्वीकारावा लागतो तो सुजान त्याला सहाय्य करण्यात कुचराई केल्यामुळे. त्यावेळी चिडून अब्दालीकडे जाऊन समोर पागोटे आपटून तो त्रागा करतो. त्यावेळी अब्दाली त्याची समजूत ज्या प्रकारे घालतो त्यावरून ही गोष्ट लक्षात येते. सुजाने मराठ्यांशी वाटाघाटी कराव्या, हे तर त्याला मुळीच सहन होत नाही. 'एक वेळ मी जाऊन लढाई करीन. मग तुम्हीं सख्यत्व करावे' या त्याच्या निर्वाणीच्या सांगण्यामुळे तहाच्या वाटाघाटी बंद होतात. पानिपतच्या युद्धामध्ये जसा इकडून भाऊ नेता आहे; तसा तिकड नजीब आहे. अब्दालीचे आगमन, मुसलमानांचे संघटन, मराठ्यांशी मुकाबला, युद्धाचा आग्रह आणि शेवटी विजय या बाबी नजिबाच्या कर्तृत्वाच्या आहेत.

कैफियतीतील गौण व्यक्तिचित्रांतील ही विविधता आणि सूचकता लक्षणीय आहे.

सूचक, संयमित निवेदनशैली

अगदी थोडक्यात खूपसे काही स्पष्टपणे सांगून जाणाऱ्या कैफियतकाराच्या निवेदनशैलीचे रियासतकारांनी कौतुक केले आहे.[२१] केवळ तीस–चाळीस पृष्ठांत पानिपतच्या घटनांचे नेटके परंतु भव्य चित्र उभे करण्याचे कैफियतकाराचे वर्णन कौशल्य अजोड आहे. कैफियतकार केवळ साधे वर्णन करतो परंतु त्या वर्णनातून त्याला अभिप्रेत असलेली वातावरणनिर्मिती होते. त्यातूनच संबंधित व्यक्तींच्या स्वभावच्छटा लक्षात येतात आणि पानिपतविषयक घटनेचे शब्दचित्रही साकार होते. सुरुवातीच्या भाऊसाहेबांवर मुजाफरखानाने घातलेल्या मारेकऱ्याच्या प्रसंगचित्रणातून तत्कालीन राजकारण आणि त्याच्याशी संबंधित व्यक्तिचित्रांची मालिका उभी राहते. त्यातल्या संवादामुळे इतिहासकालीन वातावरण वाचकांच्या मनासमोर साक्षात उभे राहते. निजामावर स्वारी करण्यासाठी आपल्याजवळ आगीचे बळ हवे म्हणून भाऊंनी इभ्रामखानाला जवळ बाळगिला. परंतु निजामावरील स्वारीत, निजामाच्या तोफखान्याच्या प्रभुत्वामुळे इभ्रामखानाला माघार खावी लागली आणि तोफखान्याबरोबरच माणसांच्या ईर्ष्येमुळे मराठ्यांना विजय मिळाला, हे तो सांगतो. असहाय्य गाजुदीखानाचे वर्णन 'गाजूदीखान कुराण पढत होता,'या शब्दांत केले आहे. अब्दालीच्या मनातील मराठ्यांचा धाक, 'आब सोडून, पुढे यऊन जुंज करावयास खाशाचा हुकुम नाहीं,' याप्रकारे वर्णिले जाते.

अनेक प्रकारची युद्धे, चढाया, मुक्काम, वाटाघाटी आणि या सर्व प्रसंगी व्यक्त झालेले व्यक्तिमात्रांचे हर्षामर्ष यांची असंख्य चित्रे पाहत असता कैफियतकाराच्या वर्णनशैलीची पदोपदी प्रचीती येते. कैफियतकाराने निरनिराळ्या ठिकाणी योजलेले केवळ संवाद पाहिले तरीही त्यातल्या विविधतेची आणि नाट्यपूर्णतेची कल्पना येते.

या संवादाबरोबरच कफियतकार पत्रव्यवहाराचा उल्लेख करतो आणि प्रसंगचित्रेंही रंगवतो. त्यामध्ये वेगवेगळया पातळीवरच्या असंख्य सूचक आणि अर्थपूर्ण हालचाली आहेत. पेशव्यांना भेटावयास जाताना संशयितांना बाहेर देवडीवर शस्त्र ठेवावयास सांगणे, विटंबना ज्याची करावयाची त्याला मारून कुत्र्यामरांजाप्रमाणे पायाने ओढून टाकणे, (दैवगती अशी विलक्षण की, बळवंतरावाचे प्रेत रणांगणातून पायाने ओढूनच काढावे लागते!) अशा प्रकारचे बारकावे असंख्य आहेत. मराठे व गिलचे यांच्या सैन्यांची वर्णने करताना गिलच्यांचे सैन्य थोडे अधिक आहे, हे सुचविणारी निवेदनशैली नाट्यपूर्ण आहे. मराठे आणि गिलचे यांच्या समोरासमोरच्या छावण्यांची रचना, शिंदे, होळकर, बळवंतराव यांच्या चकमकी, नजीबखानाने केलेला त्रागा, मल्हाररावाने पराभव टाळण्यासाठी केलेली पराकाष्ठा, गोविंदपंतांचा मृत्यू, अंतिम युद्धातील वेधक घडामोडी, मराठयांच्या सैन्याची पळापळ, त्यांची वाताहत, त्यांची झालेली करुणाजनक अवस्था इ. वेगवेगळया प्रकारच्या प्रसंगचित्रांची मालिका कफियतीच्या अवलोकनामुळ मनात ठसून राहते.

त्यातील सूचकता लक्षात घेतली नाही, तर नवख्या वाचकाला ती अनाकर्षक आणि अनाकलनीय ठरण्याची शक्यता आहे. कैफियतीचे सौंदर्य नीट मनात ठसण्यासाठी वाचकांच्या पानिपतविषयक आकलनामध्ये पूर्वतयारीची नितांत आवश्यता आहे.

बखर नव्हे कैफियत

या कृतीला बखर न म्हणता कैफियत म्हणण्यात आले आहे. त्याची अर्थपूर्णता नीट लक्षात घेतली पाहिजे. बखरीमध्ये सजविण्याचा भाग विशेष असतो. त्यामुळे त्याचे लेखन ग्रांथिक पद्धतीचे होते. त्यातील वर्णनशैलीमध्ये त्यामुळे सर्व प्रकारच्या लेखनप्रकारची एक चमत्कारिक सरमिसळ होते. पौराणिक दृष्टान्त आणि कारकुनी पद्धतीचा तपशील लिहिण्याची धाटणी हे दोन विशेष बखरीत मोठया प्रमाणात आढळतात'

कैफियतीचे स्वरूप ग्रांथिक लेखनापेक्षा तोंडी केलेल्या निवेदनाच्या स्वरूपाचे आहे. त्यामुळे भाऊसाहेबांच्या पराक्रमाचे महत्त्व वर्णन करताना निवेदनाच्या ओघात सहजपणे आलेल्या भारती युद्धाची उपमा सोडली, तरी कैफियतीवर पौराणिकतेचा कसलाही संस्कार नाही. बखरवाङ्मयावरच्या विवेचनात बखरकारांवरील पुराणाच्या संस्कारांचे वर्णन नेहमी केले जाते. कैफियतीमुळे त्याचा पुनर्विचार करण्याची वेळ येते.

पानिपतच्या युद्धाची ही हकीकत भाऊसाहेबांना मध्यवर्ती ठेवून या युद्धामध्ये पहिल्यापासून शवटपर्यंत सहभागी झालेल्या कुणीतरी जाणकार व्यक्तीने, ती दुसऱ्या कोणास तरी सांगत आहोत अशा धर्तीवर लिहिली आहे; त्यामुळे तिच्या निवेदनशलीमध्ये एक प्रकारची अकृत्रिम सहजता आली आहे.

अशा प्रकारचे निवेदन केल्यामुळेच तिच्यामध्ये सहजगत्या सांगितल्या जातील अशा प्रमुख घटना आणि त्या घटनांशी संबंधित अशा प्रमुख व्यक्तींचाच निर्देश होतो. निवेदन करणाऱ्याने ते सारे प्रत्यक्ष पाहिल्यामुळे त्याच्या सांगण्यामध्ये आत्मप्रत्ययाची झाक

आहे, ऐतिहासिक कागदपत्रांतून व्यक्त झाले नाहीत, असे अनक बारकावे आहेत, संबंधित व्यक्तींच्या गुणदोषांचा त्याला चांगला परिचय आहे आणि या युद्धाच्या पराभवाची मर्मग्राही मीमांसा करण्याइतकी त्याची बुद्धी प्रगल्भ आहे. तत्कालीन राजकारणाचे सूक्ष्म ज्ञान असल्याखेरीज अशी सूचक सहजतेचा आणि ऐतिहासिक दृष्टीने पूर्णपणे विश्वसनीय ठरेल अशा साक्षात्कारी शैलीचा त्यामध्ये प्रादुर्भाव होणार नाही.

कैफियतकार या घटनेचा साक्षी आहे, याचे प्रत्यंतर देणारी सूचक वाक्ये ठिकठिकाणी आहेत. मुजाफरखानच्या प्रकरणाचे बारकावे, युद्धाच्या हालचालीतील त्याने वर्णिलेले विशेष यातून ते लक्षात येते. कुंजपुऱ्याच्या वर्णनात, 'आम्हीही कुंजपुऱ्यास येऊन पोचलों, असे स्पष्ट वाक्य आहे. गिलच्याने बाजी हरीचे पंचवीस स्वार हुरडा खात असताना धरून नेले, त्यांपैकी तीन मराठे व एक ब्राह्मण यांची डोकी मारल्याची माहिती ही जाणकारीची आहे. पानिपतच्या युद्धाच्या अंतिम क्षणाचा तपशील आणि पळापळीच्या वर्णनाचा तपशीलही असाच जाणकारीचा आहे. भाऊ. बखरकाराने कैफियतकाराच्या युद्धमीमांसेपर्यंतचा शेवटचा सगळा भाग जवळजवळ उतरूनच घेतला आहे.

निवेदनपद्धतीने लिहिल्यामुळे या कैफियतीची भाषाशैली इतर बखरींच्या तुलनेने खूपच मराठमोळी आहे. छोटी छोटी गतिमान वाक्ये वापरून निवेदन अर्थपूर्ण करावे इकडे कैफियतकाराचे लक्ष आहे. अर्थातच निवेदनामध्ये लेखनातील जागरूकता नसल्याने काही ठिकाणी कैफियत संदिग्ध बनते. परंतु निवेदनाच्या भरात पुढे सहजगत्या कुठे तरी त्याचा उलगडाही होऊन जातो.

कैफियतीतील कित्येक वाक्ये व वाक्प्रचार ज्या त्या ठिकाणी महत्त्वाचे कार्य करीत असताना दिसतात. 'आम्हांस तुम्ही ठेविता असा अर्थ नाहीं. मरण प्राप्त झालेंच आहे'. या मुजाफरखानाच्या जावयाच्या बोलण्यातील भाव मोठा व्यंजक असून अनेक परिच्छेदांनी होणार नाही, तसे कार्य त्याने सहजपणे होऊन जाते. 'हटानें मजवर तुफान घेतलें आहे.' हे वाक्यही असेच अर्थपूर्ण आहे. मुजारत करणे, समजाविशी करणे, सुरत घेणे, आड घालणे, सिद्धान्त करणे, हलके होणे, हायास येणे, आवई घालणे, खेतात येणे अशा प्रकारच्या अर्थपूर्ण शब्दप्रयोगांमुळे कैफियतची वर्णनक्षमता चांगलीच वाढली आहे. संस्कृत-प्राकृत, हिंदुस्थानी, फारशी आणि अरबी इत्यादी अनेक भाषांतले शब्द मध्ययुगीन महाराष्ट्रात आपल्या भाषेला समृद्धी आणि संपन्नता प्राप्त करून देण्याचे कार्य कशा प्रकारे करीत होते, याची त्यावरून कल्पना येऊ शकते. विशेष्यानंतर विशेषणे वापरण्याची फारशी भाषेची धाटणी (त्यामळे 'मैदान रान केलें' असे क्वचित गैरसमज करणारे वाक्यही निर्माण होते.) कर्मणि प्रयोगाच्या वाक्यातून कर्तरी क्रियापदाची योजना करणे, कर्म संदिग्ध ठेविल्यामुळे क्रियापद चुकीचे वापरले जाणे आणि काही ठिकाणी पल्लेदार वाक्य वापरण्याच्या भरात कर्ता, कर्म, क्रियापद या सर्वांचा घोटाळा होणे असे काही प्रकार दिसून येतात.

उत्तर पेशवाईतील अकृत्रिम अशा मराठमोळ्या भाषेचे दर्शन या कैफियतीतून चांगल्या प्रकारे घडते.

संदर्भ व टीपा

१. अयोध्येचा सुभेदार सुजाउद्दौला याच्या पदरी असलेल्या काशीराज शिवदेव नावाच्या बखरकाराने पानिपतच्या युद्धावर फारशीत लिहिलेली बखर उपलब्ध आहे. ' काशीराजाची बखर ' या नावाने ती ओळखली जाते. तिचे मराठी भाषांतर ' विविध-ज्ञानविस्तार ' या मासिकामध्ये १८७२ मध्ये प्रसिद्ध झाले आहे.

२ द. ब. पारसनीस, **मराठ्यांचे पराक्रम**, मुंबई, १८९५, पृ. ११५ ते १३९.

३. वि. का. राजवाडे, **ऐतिहासिक प्रस्तावना**, पुणे १९२८ (**ऐप्र**) पृ. १०७.

४. काही प्रतींवर :

' राजश्रिया विराजीत रा. रा. व्यंकप्पा नाईक दिंडोरे,कसबा वेळापूर स्वामींचे सेवेशीं· पोष्य कृष्णाजी-शामराव मुक्काम दिल्ली इंद्रप्रहस्थ.' असे आहे.

तर काही प्रतींवर.

' राजश्रिया विराजित रा. रा. गणेशपंत स्वामींचे सेवेशीं पोष्य चिंतामण गोविंद... मुक्काम दिल्ली इंद्रप्रहस्थ' असे आहे.

५. गोपिकाबाईसाठी लेखक दिमत चिटणीस रघुनाथ यादव याने ती लिहिल्याचा उल्लेख बहुसंख्य प्रतींवर आहे. तर १९५५ साली मराठवाडा साहित्यपरिषदेने प्रसिद्ध केलेल्या बखरीवर, ' दौलतराव हिंदुराव घोरपडे मलंकतमदार यांच्यासाठी रघुनाथराव चित्रगुप्त दिमत राजमंदिर याने ११७० फसली म्हणजे इ. स. १७६१ मध्ये' लिहिल्याचा उल्लेख आहे.

६. **श्रीमंत पंतप्रधान यांची शकावली**, संपा. का. ना. साने, पुणे. १८८३ पृ. १७.

७. **तत्रैव**

८. गो. स. सरदेसाई, **मराठी रियासत** ६, मुंबई, १९५३, (**मरि**) पृ. ३८७.

९. **भाऊसाहेबांची बखर**, आ. १, पुणे १८७९ (**भाब**) पृ. ३.

१०. **पाणिपतची बखर**,संपा. र. वा. हेरवाडकर, पुणे १९६६, पृ. ५४.

११. **ऐप्र**, पृ. १०८.

१२. **भाब**. पृ. १३६.

१३. त्र्यं. शं. शेजवलकर, **पानिपत** १७६१, पुणे.१९६१ (**पानि**) पृ. ११४.

१४. **मरि**, पृ. ४३७ व **पानि**, पृ. ११४.

१५. **श्रीमंत भाऊसाहेबांची कैफियत**, संपा. साने, पुण, १८८७ पृ १.

१६. **ऐप्र**, पृ. १०८.

१७. **तत्रैव**

१८. **पानि**. पृ. ११४.

१९. **पूर्वोक्त** (क्र. १०) पृ. ५३.

२०. **ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे**, १९३०, पुणे, पृ. १७७.

२१. **मरि**, पृ. ४३७.

★ ★

॥ श्री ॥

भाऊसाहेबांची कैफियत

१. सीमोल्लंघन

कैफत[1] श्रीमंत राजश्री सदाशिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब व विश्वासराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब. सुरूसन इहिदे शीतैन मया व अल्लफ.[2] शके १६८२. विक्रमनाम संवत्सरे. सन ११७० फसली. या सालीं विजया दशमीच्या मुहुर्तानें पुण्यानजीक वानवडीच्या रोखें मोर्चे, देऊन मुहुर्तानें उभयता डेऱ्यास दाखल झाले. मातबर[3] सरदारांस व शिलेदारांस[4] पत्रें पाठविलीं. वरचेवर लोक जमा करून फौजेंचे समजाविशीबद्दल[5] एक महिना त्याच मुक्कामीं राहिले.

२. भाऊसाहेबांवर मारेकरी !

कार्तिक शुध्द पक्षीं मुजाफरखानाच्या जांवयानें कांहीं राजकारण जाणवून एकांतीं[6] जावें असा राबता[7] घातला. रविवारी घात योजिला. कटार उजवे बाजूस चालविली. पुढें कलमदान[8] होतें. शाई घ्यावयास हात पुढें केला, तो पुढें संधान[9] चुकलें. किंचित् जखम श्रीमंतांस लागली. ते समयीं महिपतराव चिटणीस व शिदोजी कुंजीर व बळंवतराव बाबा व सटवाजी राऊत वगैरे प्रसंगीं होते, त्यांनीं यास धरून मुसक्या बांधल्या. आणि त्यास पुशिलें कीं,

---

१. **कैफत** : (अ० कैफियत) = हकीगत, वर्णन. २. **सुरू सन** इ० : = सुहूर सन ११६१ (शेवटी टीप पाहा). ३. **मातबर** (अ०) = विश्वसनीय, थोर. ४. **शिलेदार** (फा.) = स्वतःचा घोडा ठेऊन सरकारी नोकरी करणारा. ५. **समजाविशी** : शिलेदारांना पगारापोटी द्यावयाच्या रकमेपैकी एक प्रकारचा हप्ता. ६. **एकान्त** = निवान्त जागी केलेली मसलत. ७. **राबता** (अ.) = ये, जा. ८. **कलमदान** (फा.) = लेखण्या ठेवण्याची लांब, पोकळ डबी. ९. **संधान** (सं.) = लक्ष्य, नेम.

" तूं हें कर्म कोणाचे बोलण्यावर केलें हे सांगणें."

त्याजवरून त्याणें सांगितलें कीं,

" नबाब निजामअल्ली यांचें सूत्र मुजाफरखान याजकडेस बहुत दिवस आहे जे, ' भाऊसाहेब मातबर कारभारी यास्तव कांही आपला उपाय चालत नाहीं. तरि त्यास हरयत्नें करून जीवें मारावें, म्हणजे तुम्हांस एक लक्ष रुपयांची जागीर[१] देतों तुम्हीं याप्रमाणें हें काम आधीं करावें. सर्व प्रकारें ऊर्जित[२] करितों. ' त्याजवरून मुजाफरखान बहुत दिवस या यत्नामध्यें आहेत. आम्हांस त्यांनीं आपली लेक देऊं करून या उपायास लाविलें आहे. आम्हीं तुम्हांपाशीं एकांतीं यावयाचा राबता घालून लटकीं[३] राजकारणें सांगितली. अंतर्यामीं[४] समय साधून काम करावें, म्हणोन कटार चालविली. त्यासमयीं तुमचे प्रतापें-करून माझा हात कांपों लागला. कटार पुरती चालवावयास सामर्थ्य आलें नाहीं. आम्हांस तुम्ही ठेवितां असा अर्थ नाहीं. मरण प्राप्त झालेंच आहे. झाली हकीकत आपणांस निवेदन केली."

तेव्हां त्यास अभय देऊन, ' दुसऱ्याचे बोलण्यावर तुजला कशास मारावें, खरें असेल तें सांगणें ' (असें बोलिले)

३. मुजाफरखानाचा कांगावा

इतकें झालियावर बहुत लोक घाबरे होऊन सरदार वगैरे मंडळी थोर थोर पाहावयास आले. तों मातुश्री गोपिकाबाईही परामृषास[५] आली. मुजाफरखानही आले. तेव्हा मुजाफरखानाचें समाधान केलें कीं,

" तुजपासून हें कर्म होणार नाहीं."

तो म्हणूं लागला कीं,

" साहेबीं आपण पूर्तेपणीं चवकशी करोन आम्हांस शिक्षा करावी. मी आपली लेक देऊं केली खरीच. तीच सोयरीक दुसरियास देऊं केली म्हणून हटानें मजवर तुफान[६] घेतलें आहे. साहेबीं माझी मोट बांधोन

---

१. **जागीर** = जहागीर. २. **ऊर्जित करणे** =सन्मान करणे, उन्नती करणे. ३. **लटकी**= खोटी– ४. **अंतर्यामी** = मनात. ५. **परामृष** = (सं. परामर्श)= चौकशी, विचारपूस. ६. **तुफान** (अ.)= बालंट, कुभांड, आळ, खोटा आरोप.

हत्तीपुढें टाकावी. खरा नसलों तर मारला जाईन." अशा कित्येक गोष्टी सांगितल्या. तेव्हां त्याचें समाधान करून लावून दिल्हा. जर करितां तेव्हांच मारावा तरि पुरता चवकशी न करितां उगाच मारिला असा लौकिक जनांत होईल. यास्तव ते प्रसंगीं दम खाऊन लावून दिल्हा. घरास जावयास निरोप दिल्हा.

४. प्रत्यक्ष पुरावा आणि मृत्यूदंड

दुसरे दिवशीं (जाव) यासि आणोन पुसिलें. तेव्हा तो बोलिला कीं, " क्षणाक्षणां आपण कशास पुसतां ? नबाबाचीं पत्रें सांप्रत[1] आलीं तीं बजिन्नस[2] संदुकीमध्यें[3] आहेत." असें सांगितलें

तेव्हां मुद्दा खरा झाला. पारपत्य[4] करावें (असें ठरविलें).

बोभाट झाला तरि पळून जाईल, यास्तव अगोदर बिन हत्यारें शिंदे यांचे वाडियांत सर्वत्रांनीं यावें हा पंथ घातला होता. दररोज परामृषास येत होता, त्याप्रमाणें मुजाफरखान, हैदरखान उभयतां दरबारास आले (तेव्हां) देवडीवर[5] हत्यारें ठेवावीं म्हणोन आज्ञा जाली. त्याप्रमाणें हत्यारें पोरग्यापाशीं ठेवून दोघेही आंत आले. भाऊसाहेब पडद्या आंत होते. हे बाहेर येऊन बसले, तेव्हा खुणा[6] आणोन बोलाविला आणि जामदारांनीं[7] दोघांस मुसक्या बांधल्या. तेव्हां मुजाफरखान बोलिला कीं,

"चौकशी तुम्हीं केली नाहीं. आपण आम्हांस कढईमध्यें टाकावें, खरे असलों तरि जगून निघूं."

परंतु ऐकलें नाहीं. तेथेंच दोघांसही ठार केलें. पायास दोर लावून

---

१. **सांप्रत** : (सं.) सध्या, नुकतीच. २. **बजिन्नस** : (फा.) = जशीच्या तशी, खुद्द. ३. **सदूक** : (अ) = पेटी. ४. **पारपत्य** = दंड, शिक्षा. ५. **देवडी** (सं. देहलो) = मोठ्या वाड्याच्या दरवाजाच्या आतल्या दोन बाजूंस किंवा बाहेरच्या दोन बाजूंस उंच जोती करून बसावया जोग्या केलेल्या जागा. ६. **खुणा** = खुणेच्या वस्तू ७. **जामदार** (फा.) = सरकारी मूल्यवान वस्तू (जडजवाहीर, वस्त्र प्रावर्णे इ.) ज्याच्या ताब्यात असतात तो अधिकारी.

ओढून टाकिले. खुन्यासही ढाले[१]पाशी नेऊन मारिला. ते दिवशीं अक्काजणांची ते समयीं यांच्यासह[२] डोचकीं मारिलीं. आणि दोन हजार फौज घरकैद करावयास पाठविली. घर हस्तगत करून, माल सरकारांत दाखल करून, बायकामुलें सिंहगडावर घातलीं.

५. नगरचा किल्ला घेतला

त्या नंतर दों रोजांनी कूच[३] करून मजल[४] दरमजल नगराचे रोखें चालिलें. नगराचा किल्ला घेऊन नगरांत ठाणें आपलें बसवावें याजकरितां अगोदर पुणियाचें मुक्कामीहून राजश्री विसाजीपंत बिनीवाले याजबराबर दहा हजार फौज देऊन पाठविले होते. परंतु किल्ला हस्तगत झाला नाहीं. बाहेर शह देऊन बसले होते. खांशी स्वारी[५] येते असें पाहून किल्लेदार यांणीं सल्याचें बोलिणें लाविलें. कांहीं द्रव्य आपणांस द्यावें, पुढें सर्वस्वी चालवावें आणि आपल्याकडेस ठेवावें ऐंशी बोलणीं घातलीं. त्याप्रमाणें मशारनिल्हें[६] यांणी भाऊसाहेबांस लेहून पाठविलें. त्यांणीं श्रीमंतास लिहून पाठवून मान्य केलें, चाळीस हजार रुपये शिबंदी[७] खर्च ठराव[८] नक्त[९] देऊन किल्ला घेतला.

६. निजामअल्लीवर मोहीम

उभयतां खांसे नगरास आले, तेथें वर्तमान ऐकलें जे,

" नबाब निजामअल्ली यांणी चाळीस पन्नास हजार फौजबदी[१०]करून बेदराहून या प्रांतीं येतात. ' त्रिंबक किल्ला नगर वगैरे घेतले, हे आपले माघारे घ्यावे, नाहींतरी बिघाड करावा. लढोन मरावें, याउपर मराठे यांस दबोन रहावे हें उत्तम नव्हे.' हा निश्चय करून मजल दरमजल येत

---

१. **ढाल** = निशाण, झेंडा. २. मुळात ' यांचीही ' असा शब्द आहे. ३. **कूच** (फा.) = प्रयाण, एका ठिकाणचा तळ हालवून दुसरीकडे जाण्यास निघणे. ४. **मजल** (अ.) = न थांबता एका विशिष्ट काळात आक्रमिलेले अंतर, मजल दरमजल = मध्ये न थांबता चालणे. ५. **खांशी स्वारी** =(खांसा (अ.) = यजमान, प्रतिष्ठित.) खुद्द यजमान, (इथे खुद्द पेशवे) ६. **मशार निल्हे** (फा.) = उपरिनिर्दिष्ट, वर उल्लेखिलेले (इथे बिनीवाले). ७. **शिबदी** (फा.) = वसु लीच्या कामासाठी ठेवलेली फौज. ८. **ठराव**=वादग्रस्त प्रश्नाचा निर्णय. ९. **नक्त** (अ.)= रोकड १०. **फौजबंदी** (अ.) फौज एकत्रित करणे.

आहे." ऐशी वकिलाचीं पत्रें आलीं, त्यावरून श्रीमंतास विनंतिपत्रें पाठविलीं कीं, 'आम्ही मोंगलाचे तोंडावर जातों. साहेबीं कुल* फौजांस ताकिदी करून वरचेवर लोक आम्हाकडे पाठवावे. आपणही कूच करून नगरावर यावे.' ऐशीं पत्रें पुण्यास श्रीमंतांकडे पाठवून आपण दरकूच उदगिरीचे रोखें चालिले.

७. 'मोंगल परिछिन्न बुडवावा !'

नबाब निजामअल्ली हजार फौजेसुद्धां उदगिरीवर येऊन मुक्काम केला. राजश्री दादासाहेबीं ही येऊन आपले फौजेंत मिळोन त्रिवर्गांनी एकत्र होऊन मसलत[1] केली कीं, 'उदगिरीवर मोंगल[2] आला आहे. सालमजकुरी[3] मोंगल परिच्छिन्न[4] बुडवावा. बहुत दमानें आला आहे, याचें पारपत्य करावें' ऐसा मनसुबा[5] करून श्रीमंतांकडे पत्रें पाठविलीं. श्रीमंत खांसा स्वारी नगरास दाखल जहाली. वरचेवर त्यांजकडे सरंजाम[6] पाठवीत होते.

८. इभ्रामखान सवेत ठेविला

त्यानंतर इभ्राहीमखान गारदी हजार फिरंगी[7] ऐसे जमावा[8] निशीं येऊन सामील जाला. भाऊसाहेबीं बहुतांशी मुजारत[9] करून बोली उत्तम प्रकारें केली. सेवेंत ठेविलें. बरा मनुष्य मातबर कराराचा[10],

---

* **कुल** (अ.) = तमाम, सर्व.

१. **मसलत** (अ) = विचारविनिमय, सल्ला २. **मोंगल** (का.) – मध्य आशियातून हिंदुस्थानात आलेली एक मुसलमानांची जात. दिल्लीवर राज्य करणारा बाबरापासूनच्या बादशहांचा वंश या जातीचा होता. औरंगजेबाच्या कारकीर्दीत कमरुद्दीन नावाच्या सरदारास 'चिनकुलीजखान' नावाचा किताब मिळाला. पुढें महमदशहाच्या कारकीर्दीत त्याला 'असफशहा निजामउल्मुल्क' असा किताब मिळाला. त्यानेच १७२३ मध्ये दक्षिणेत येऊन हैदराबादेस स्वतंत्र राज्य स्थापिले. त्यामुळे त्याच्या वंशासही 'मोंगल' असेच म्हणतात. १७४८ मध्ये त्याला मृत्यू आल्यानंतर त्याचा मुलगा गादीवर बसला तोच हा निजामअल्ली. ३. **साल मजकुरी** (अ) = चालू वर्षी. ४. **परिछिन्न** (सं)= खात्रीपूर्वक, पूर्णपणे. ५. **मनसुबा** (अ) = विचार ६. **सरंजाम** (फा.) = साधन-सामुग्री ७. **फिरंगी** (फा.) = युरोपियन कवायती फौज. ८. **जमाव** (अ.) = समुदाय ९. **मुजारत** (अ.) = संभावना, गौरव १०. **करार** (अ.) = निश्चय.

यास्तव अगत्य धरून बक्षीस सीरपाव[१] देऊन पहिले दिवशीं दहा हजार नक्त खर्चास दिले; आणि समागमें घेऊन उदगिरीचे मुक्कामीं मोंगलाशीं गाठ घातली. पहिलें जुंज इभ्रामखान याणें तोंड लाविलें. तें दिवशी कांहीं जालें नाहीं. मोंगलापाशी आगेचें[२] वळ भारी. उधळून काढिलें. इभ्रामखान कस्त[३] करून मागे आला.

९. यश अपेश ईश्वरसत्ता

मोंगल वळ धरून मजल दरमजल धारूरचे रोंखें चालिला. यांणीं फौजेचा बंदोबस्त करून मध्ये मोंगल, उजवे बाजूस (भाऊ) साहेब, डावे बाजूस दादासाहेब ऐसे दररोज जुंजत होते. धारूरानजीक आटक[४] उभयंता फौजा पोचल्या. पुढे त्रिवर्ग मिळून मनसुबा केला कीं, 'मोंगल बळ धरून जबरदस्तीनें मारामार करून धारूरास पोहोचतो. मग हातास येत नाहीं. अशामध्यें कुमक[५] पोचली नाहीं तों हल्ला करून जुंज द्यावें. यश अपेश ईश्वरसत्ता, परंतु धारूरांत गेल्यावर मग तोलत[६] नाही.' अशी मसलत करून तमाम सरदारास बोलावून रात्रीस सांगितलें कीं, 'सर्वत्रांनी हिय्या करून उदईक मोंगलावर हल्ला करावी. वळकट जुंज द्यावे आणि आम्हांस यश द्यावें.

१०. मोंगल कचरला, हिंमत सोडली

प्रातःकाळीं कूच जालें तेव्हा रोजच्याप्रमाणें मध्ये मोंगल गोळा करून गोल किल्ला करून, भंवता तोफखाना देऊन चालत होता. सभोंवती आपली फौज नेमणुकेप्रमाणें चालत असें. तो पिच्छाडीचेच तोंडावर घोडे घातले. सर्वत्रांनीं हिंमत धरुन हल्ल्यास उठले. तोफेची रंजक[७] एक झडली. त्या खालीं इभ्रामखान याजकडील व हुजराती[८] च्या तोफखान्यांतील गाडदी[९] बहुत मारिले. त्यांहीमध्यें बळ धरून मारीतच

१. **सीरपाव**(फा.) = बहुमानाचा पोषाख. २. **आगेचें** (अ) = तोफखान्याचे. ३. **कस्त** (अ)= मेहनत. ४. **आटक** = अवघड, दुष्प्राप्य. ५. **कुमक** (तु.) = मदत, मदतीकरता पाठविलेले सैन्य. ६. **तोलणे**-आटोपणे, आवाक्यात असणें. ७. **रंजक** = फैर. ८. **हुजुरात** = पेशव्यांची राखीव फौज. ९. **गाडदी** = गारदी, कवायती फौज.

चालिले. उजवेकडून भाऊसाहेस व रावसाहेब व डावेकडून दादासाहेब ऐसे मारामार करीत उठले. तेव्हां मारीत खांशाचे हवद्या[1] पर्यंत जाऊन लोक पोंचले. मोंगलाकडील लोक बहुत पडले, युद्ध उत्तम प्रकारें जालें. एक प्रहर[2] पर्यन्त खणाखणी जहाली. मोंगल कचरला. हिंमत सोडली. ते दिवशीं आणीक चार घटका दम धरून जुंज दिल्हें असतें तरी मोंगल बुडवून गर्दीस मेळवून[3] दिल्हा असतां ! परंतु संध्याकाळ होत आला. बहुत लोक पडिले. बराणजी मोहिते व केशवराव पानसे व आणीक कितेक ते दिवशीं ठार जहाले. बहुत लोक जखमी जहाले.

११. श्रीमंतांना संतोष

जुंज जालें ते ठिकाणीं मोंगलाने जवळून मुक्काम केला. आपलाही मुक्काम जहाला. यश आलें. बहुत संतोष जहाला. श्रीमंतांस खुशालीचें वर्तमान पत्रांत लेहून सांडणीस्वार[4] पाठविले. श्रीमंत नगराहून आंबे-पडदुरावर अगोदरच आले होते. तेथें वर्तमान ऐकोन संतोष पावले. सांडणीस्वरास इनाम-बक्षीस[5] सोन्याचीं कडीं दिल्हीं व पोषाख दिल्हे.

१२. सलूखाची बोलणी : उत्तर-प्रत्युत्तरे

इकडेस वर्तमान. लढाई जाली ते दिवशीं संध्याकाळीं मोंगलानें आपल्यामध्यें विचार केला कीं,

' गनीमाची[6] फौज भारी आहे. आपल्यामध्यें अवसान राहिलें नाहीं. लोकांनी हिंमत सोडली, लष्करांत महागाई बहुत जहाली. धारूरास पोहोंचू देत नाहींत. याउपर सलूख[7] करितां उत्तम आहे. '

असा सर्व मसलतदार मिळोन मसलत करून वकील गनिमांकडेस पाठविले.

---

१. **हवदा** (अ.)= हत्तीवरील बसावयाची कठडा असलेली बैठक. २. **प्रहर** (सं.) साडेसात घटकांचा अवधि (घटका = २४ मिनिटे किंवा साठ पळे) ३. **गर्दीस मेळविणे** = नाश करणे. ४. **सांडणीस्वार** = उंटावरचा स्वार. ५. **इनाम-बक्षीस :** जोड शब्द. इनाम म्हणजेच बक्षीस. फरक इतकाच की इनाम अरबी शब्द आहे आणि बक्षीस फार्शी आहे. ६. **गनीम** (अ.)= शत्रू. मराठ्यांस मुसलमानांनी दिलेले नाव. त्यामुळे मराठे स्वतःही आपणांस गनीमच म्हणवून घेतात. ७. **सलूख** (अ.) = सख्य, मैत्री.

दुसरे दिवशीं वकिलानीं येऊन नबाबचें बोलणें सांगितलें कीं,

" तुमचे वडिलांचा आणि आमचे वडिलांचा स्नेह चालत आला. त्यास सांप्रत तुम्हांपासूनच अंतर पडिलें. व तुमचे रीतीप्रमाणें तुम्ही चालत नाहीं. पुरातन करार मोडून आमचे किल्ले दरसाल एक दुसरा तुम्ही घेतच आहां. बरें जें जालें तें उत्तम. याउपरि तुम्हीं किल्ले व मुलुख घेतला आहे तो तुम्हांस मुभा[1] आहे. पुढें तुम्ही व आम्ही एक मते चालावें. "

त्यास यांनीं उत्तर सांगितलें कीं,

" पूर्वीं तह खराच आहे. परंतु हल्ली आम्हांस पातशहांनीं सांगितलें कीं, 'तुम्ही गैरसनदी[2] मुलुख[3] खातां.' तुमचे मुलखापैकीं निम्मे प्रांत आम्हांस द्यावा. नाहींतर आम्ही युद्ध करूं. तुम्हांस आम्ही मोडिलें[4] तरि तुमचा मुलुख आम्ही घ्यावा. आणि तुम्हीं आम्हांस मोडिलें तरि आमचा मुलुख तुम्हीं घ्यावा. "

तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं,

" तुम्हांस फौजेस खर्च बसला आहें तरी एक क्रोड रुपये देतों. " अशी बोलणीं लाविलीं.

" आम्ही ऐवज घेत नाहीं. क्रोड रुपयांचा मुलुख द्यावा. यासि किल्ले दवलताबाद द्यावी " असें निखालस[5] वकिलांस सांगितलें.

१३. बाकी जहागीर करार करून घेतली

तेव्हां विठ्ठल सुंदर दिवाण यांजपाशीं शिक्केकटचार[6] देऊन यांचे डेऱ्यास पाठविला. 'किल्ले मुलुख मागितला तो कबूल करून पत्रें करून देणें.' (म्हणून त्यास सांगितलें.) त्याजवरून मशारनिल्हेनीं येऊन बहुत रतबदली[7] करून तह केला कीं, दवलताबाद, बऱ्हाणपूर, सालेर व

१. **मुभा** (अ.) = कायदेशीर परवानगी, माफ. २. **गैरसनदी** = बेकादेशीर, बेसनदशीर. ३. **मुलुख** (अ.) = राज्य, देश. ४. **मोडणे** = पराभव करणे. ५. **निखालस** (अ.) = स्पष्ट. ६. **शिक्केकटचार** (फा.) = अधिकार चिन्हे. ७. **रतबदली** (का.) = तह चर्चा, शिष्टाई, भीड-खर्ची.

मुल्हेर, अमदानगर एकूण किल्ले सहा. साठा लक्षांचा मुलुख. त्यामध्यें किल्ल्याखालीं जो मुलुख असेल तो वजा करून बाकी जहागीर करार करून घेतली.

१४. मोंगलास तंबी : बहुत संतोष

मोंगलांचीं पत्रें घेऊन राजश्री गोपाळराव गोविंद यासि मोहोगम[1] दहा हजार फौज देऊन दवलताबादेस रवाना केलें. दवलताबाद वगैरे किल्ले तहाप्रमाणें घेऊन आपलीं ठाणीं बसवून नबाबाच्या भेटी होऊन हैदराबादेस दरकूच दरमजल मोंगल गेला. भाऊसाहेब व दादासाहेब व रावसाहेब त्रिवर्ग कूच करून आंबेपडदुरावर आले. श्रीमंतही तेथें आले. भेटी जाल्या. मोंगलांस तंबी पोंचली. किल्ले मुलुख जहागीर मेळविली. बहुत संतोष जाहला.

१५. शिद्यांच्या वाताहतीची पत्रे

त्यानंतर हिंदुस्थानांतून राजश्री जनकोजी शिंदे यांची पत्रें आलीं कीं, 'आबदल्ली गिलचा[2] दुराणी एक लक्ष फौजेनशीं बळ धरून दिल्लीस आला. दिल्ली नजीक दोन कोशांवर चाळीस हजार फौजेनशीं दत्ताजी शिंदे होते. गिलल्यानें दिल्ली घेऊन आपल्या तर्फेनें बादशहा बसविला, म्हणजे आपला अमल बुडेल. अशामध्यें जाऊन तोंड टाकावें म्हणोन दोनशें स्वारांनशीं जाऊन गिलच्याचे फौजेंत मिसळले. तों गिलच्यांचा फौज भारी चहूंकडून वेढा घालून दत्ताजी शिंदे यांजला निघावयास जागा नाही असें जालें. जातीनिशी बहुत तरवार केली. इतकियांत छातीवर गोळी लागली. दत्ताजी शिंदे ठार जाले. तेथोन चढाई करून गिलच्याची फौज शिंदे यांचे फौजेवर आली. तेथें फौज शिंदे यांची व गिलच्यांची लढाई जाली. जनकोजी शिंदे यांच्या दंडावर गोळीचा जखम लागला. फौज कचरली. मोड जहाला. फौजेस पळ सुटला. कत्तल करू लागले चार हजार फौज लुटून दस्त[3] केली. बाकी राहिले ते व जनकोजी शिंदे खांसा ऐसे पळत जाटाचे मुलकांत राहिले.'

---

१. **मोहोगम** (अ.) = भक्कम, दृढ. २. **गिलचा** = इराण-अफगाणिस्थानचा बादशहा. ३ **दस्त करणे** = जिवंत धरणे.

१६. गिलचाचे आगमन : संस्थानिक सामील

ऐसे वर्तमानाचीं पत्रें बसून एके जागां वाचलीं.· विस्मय जाला. पुढें हिंदुस्थानांत खासे स्वारींनिशी जावें अथवा फौज रवाना करावी हा मजकूर पडला. (इतक्यांत) दुसरें वर्तमान आलें कीं :

' गिलचा यमुना नदीपार होऊन दिल्लीपाशीं आला. दिल्लीस दाखल होऊन हिंदुस्थानांतील सर्व संस्थानिक त्यास सामील जाले. दिल्लीचा किल्ला घेऊन, पूर्वील पादशहास काढून, आपल्या तर्फेनें पादशहा स्थापिला. आणि दक्षणेस चाल करावयाची उमेद आहे. या प्रांतींचे संस्थानिक कुल् त्यासि सामील जहाले आहेत. नबीजखान रोहिला बारा हजार फौज व सुजाद्दौला पंधरा हजार, आणिक कितेक संस्थानिक ऐसे त्यास सामील जहाले. आपणांकडील ठाणीं अंतरवेदीतील[१] व जयनगर वगैरे देखील माळवा, गडबडलीं आहेत. यासमयीं फौजा पाठवून यांस तंबी[२] पोंचली तरि उत्तम. नाहीं तरि परिछिन्न[३] ठाणीं या प्रांतीचीं उठतात. '

अशीं पत्रें मल्हारजी होळकर व शिंदे यांचीं आलीं.

१७. आपापसांतील ताणतणाव

तीं वाचून बहुत दिलगीर होऊन, राजश्री दादासाहेबांची रवानगी[४] हिंदुस्थानांत करावी हा सिद्धान्त करून श्रीमंत (व) राजश्री भाऊसाहेब एकत्र होऊन दादासाहेबांस बोलावून सांगितलें कीं,

" हिंदुस्थानांत जावें. तुम्हीं गेलें पाहिजे. "

तेव्हां दादासाहेब बोलिले कीं,

" पूर्वी आपण तह केलेत ते साठ लक्ष रुपये कर्ज जाहलें. ते वारल्याशिवाय आम्हांस जावयास अनुकूल पडत नाहीं. "

तेव्हां भाऊसाहेब बोलिले कीं,

---

१. **अंतरवेदी** = दिल्ली आणि त्याच्या आसपासचा मुलूख. २. **तंबी** (अ.) = धमकावणी, दटावणी, जरब. ३. **परिछिन्न** (सं.) = निश्चयपूर्वक, नक्की. ४. **रवानगी** (फा.) = पाठवणी.

मुलुखगिरीस[1] जावें तें कर्ज घेऊन घरास जावें कीं काय ? किंवा द्रव्य मेळवून घरास यावें ? तथापि तिकडील तिकडे लोकांची समजाविशी[2] करावी. "

तेव्हां श्रीमंत बोलले कीं,

" दादासाहेबांचे कर्ज वारून जाऊं तेव्हां त्यास मुलुखगिरी सांगू. सांप्रत आम्ही जाऊं अथवा तुम्हीं जावें. "

तेव्हां भाऊसाहेबांनीं सांगितलें,

" साहेबी हिंदूस्थानांत मुलुखगिरीस जावें. (मग) आम्ही जवळ असोन काय करावें ? आम्हांस आज्ञा द्यावी. आजच कूच करून जातों. "

ऐसें बोलोन, आज्ञा घेऊन, तेच दिवशी कूच करून, आंबेपडदुराहून स्वार होऊन बऱ्हाणपूरचे रोखें चालिले. तीन कोशांवर डेरे दिल्हें. मुक्काम जाला. राजश्री विश्वासरावही समागमें चालिले. चार दिवस मुक्काम होता. सौभाग्यवती गोपिकाबाई भाऊसाहेबांपाशी जाऊन बहुत प्रकारें सांगितलें कीं,

" तुम्हीं जावें ऐसें नाहीं. दादासाहेब म्हणतील तें कबूल करून त्यांची रवानगी करावी. आपण येंथोन त्यांस सरंजाम पोंहोंचता करावा. येणेंकरोन बहुत उपयोग आहे. " असें सांगितलें. परंतु विचारास आलें नाहीं.

गोपिकाबाई फिरोन आंबेपडदुऱ्यास आली.

१८. बऱ्हाणपूर, हांडिया, माळवा, ग्वाल्हेर

पुढें यांणीं कूच करून फौजेची समजाविशी करीत करीत आठवे दिवशीं बऱ्हाणपुरास दाखल जाले. तेथोन मजल दरमजल नर्मदेवर गेले. तेथें आठ मुक्काम जाले. हांडिया मुक्कामीं इभ्रामखान गारदी होता तो आपला सरंजाम करून दहा हजार गारदी व फिरंगी घेऊन आला. त्याचे इमान[3] घेऊन बराबर समागमें घेतला. पुढें कूच दरकूच[4]

१. **मुलुखगिरी** (फा.) = मोहीम. २. **समजाविशी** = फौजेच्या पगाराची बाकी देणे, कर्ज फेडणे. इ. ३. **इनाम** (अ.) = वचन. ४. **कूच दरकूच** = सारख्या मजला मारीत.

माळव्यांत दाखल जाले.

सुरंजेचे मुक्कामीहून फौजेची गणती घेतली. सत्तावीस हजार फौज व शंभर तोफा गणती जाली. अगोदर दादासाहेबीं पन्नास तोफा माळव्यांत ठेविल्या होत्या. त्याही घेतल्या. आणि मजल दरमजल ग्वालेरीस गेले. तेथें चार मुक्काम जाहले. तेथून कूच करून मजल दरमजल खळचापार होऊन चालिले. नदी उतरून ढवळपुरास पोहोंचले. पंधरा मुक्काम आषाढमासी तेथेंच जाहले.

१९. शिंदे–होळकरांचा सल्ला विचारास आला नाही

राजश्री मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे अंतरवेदीमध्यें होते. तेथोन त्यांनीं पत्रें पाठविलीं कीं,

' साहेबीं[1] पुढें न यावें.
आमच्या कुमकेस फौजा पाठवाव्या.
धन्यांचे नांवावर आम्ही यांचे पारपत्य
करून पराभव करूं.
खांसा स्वारी आलियानें आब[2] जातो. '

असे कित्येक प्रकारानें लिहिलें. परंतु यांचे विचारास आले नाहीं.

' या प्रांतीच भेद[3] सांपडेल म्हणून येऊं नका म्हणतात ' अशी कल्पना चित्तांत आणून उत्तर पाठविलें कीं,

' गिलच्याचें बळ भारी आहे.
तुम्ही व आम्ही एकत्र आल्याखेरीज तोलत नाहीं. '

त्याजवरून शिंदे–होळकर यमुना उतरून आलीकडे आले. पांच सहा दिवसांत गंभिरा नदीवर गेले. उभयतां येऊन भेटले.

२०. जाटाचेही म्हणणे मनास आले नाही

आठ मुक्काम तेंथें जालियावर सुरजमल्ल जाट पांच सहा हजार फौजेनिशी पलीकडे राहिला. त्यांच्या यांच्या भेटी झाल्या. होळकर यांचे विद्यमानें[4] जाटानें मनसुबा[5] सांगितला कीं,

१. **साहेब** (अ) = स्वामी, धनी, श्रीमंत. २. **आब** (फा.) = तेज, प्रतिष्ठा. ३. **भेद** (सं.) = अंतर्गत रहस्य. ४. **विद्यमाने** (स.) = साक्षीने, समक्ष. ५. **मनसुभा** (अ.) = विचार, युक्ती.

" दिल्लीचा शहरपना[१] आपणांस देयावा. गाजुद्दीखान यास वजिरी[२] द्यावी. आणि शिंदे होळकर आम्ही मिळून गिलच्यावर जातों. आमची कुमक आपण वरचेवर करावी. आणि आपले मुलकांत उत्छाह करून रहावें.[३] खांशानशीं गिलच्यावर जाऊं नये.'

परंतु तो विचार यांचे ध्यानांत आला नाहीं. (जाट) होळकर यांचे अनुमतें,[४] बोलतात ऐसे मनांत आणून त्यास सांगितलें कीं,

' येविशी श्रीमंत राजश्री नानासाहेब यांची आज्ञा पाहिजे. सांप्रत तुम्ही व आम्ही मिळोन हस्तनापुरास जाऊं.'

ऐसें सांगोन कूच करून वद्य त्रयोदशीचे दिवशीं स्वार जहाले. ते तिसरे दिवशीं आमावस्येस आगरियानजीक गोघाटास यमुनास्नानास मुक्कामास गेले.

२१. किल्ल्यावर निशाणे चढविली

तेथोन कूच करून मथुरेस गेले. तेथें मसलत करून शिंदे–होळकर व हुजुरात आठ हजार अशी सडी फौज बळवंतराव यास मोघम[५] देऊन पुढे रवाना केलें. पांचवे दिवशीं पोचले. तेच दिवशीं बळवंतराव जाऊन दरवाज्यावर उभे राहिले आणि पन्नास निशाणें शर्त[६] करून किल्ल्यावर चढविलीं. आणि श्रीमंतांकडे सांडणीस्वार रवाना केले कीं,

' किल्ला फत्ते जाला.'

श्रीमंत खुषी बहुत जाले. सांडणीस्वारांस इनाम दिल्हें.

२२. आत गेलेल्यांची कत्तल

इकडें निशाणें चढविलीं. कित्येक लोक किल्ल्यांत जाऊन पोंचले. पादशहाचे जनानखान्यांत[७] मराठे लोक जाऊन लुटालुट करूं लागले. तेव्हा पठाण किल्ल्यांत सात आठ हजार होते. त्यांणीं शिपाईगिरी करून मारतंबी दिल्ही. लोक, निशाणें माघारी फिरविलीं. लोक आंत गेले होते,

---

१. **शहरपना** (फा.) = शहराची तटबंदी. रखवालदारी. २. **वजीर** (अ.) = प्रधान, **वजिरी** = प्रधानकी, दिवाणगिरी. ३. **उत्साह करून राहणे** = आनंदात, मजेत राहणे. ४. **अनुमत** (सं.) = अनुकूल असलेले, पसंतीचे मत. ५. **मोघम** (अ.) = अंदाजाने, साधारणपणे, गणती न घेता. ६. **शर्त** (अ.) = कसोशी, पराकाष्ठा. ७. **जनानखाना** (फा.) = अंतःपुर, स्त्रीपरिवार.

ते कांपून काढिले. तेव्हां किल्ल्याभंवते मोर्चे बसवून दिल्लीआलीकडे दो कोशांवर[१] डेरियास आले.

२३. बळवंतरावांस बोल लाविला

फिरून माघारे आले याचे वर्तमान श्रीमंतांस लिहिलें. वर्तमान ऐकून बळवंतराव यांजवर रूष्ट[२] जहाले. 'निशाणें चढविलीं, कित्येक लोक आंत जाऊन पोहोंचले असतां, खांसे लोक लगट[३] करून उडचा घालून पठाण लोक कापून काढावे तें न केलें.' असे बोलून आपण कूच करून आठवे दिवसांत दिल्लीस दाखल जहाले. मोरचा एक होता. परंतु उपाय कांहीं चालत नाहीं. श्रीमंत आल्यावर एकदोन उठावण्या[४] करून पाहिल्या. परंतु दिल्लीचा किल्ला हातीं यावयास कांहीं यत्न चालत नाहीं. काय करावें हा विचार श्रीमंतास पडला.

२४. किल्ला हस्तगत झाला

आंतील पठाण यांसि विचार पडिला कीं,

अशा समयीं आम्हांस गिलच्याची कुमक येऊन पोंचली तरि उत्तम. नाहीं तरि यमुना नदी भरून चालली आहे. भाऊसाहेब किल्ला घेतल्याखेरीज उठत नाहीत. आम्ही मारले जातों.'

असा विचार करून किल्ल्याची सल्याचीं बोलणीं गाजुदीखान याचे विद्यमानें लाविलीं कीं,

'वस्तभाव[५] हत्यारे सुद्धां आम्हांस नदीपार करून द्यावें म्हणजे किल्ला तुमचे हवाली करू.'

यांणींही मान्य करून आठशे पठाण यमुनेमधें नाव घालून पार करून दिल्हे. पातशहा मात्र किल्ल्यांत राहिले. जुंजते माणूस गिलच्याकडील कोणी राहिले नाहीं. किल्ला हस्तगत झाला. ठाणें आपलें बसविलें. नारो शंकर यांचे स्वाधीन दिल्लीचा कारभार करून बाळोजी पगडे व मीरखान ठोके व लोक मिळोन सात आठशे स्वारांनिशी दिल्लींत ठेविले. दिल्ली फत्ते जालियावर सुरजमल जाट याणें पूर्वींप्रमाणें शहर आपले

---

१. **कोश** (सं. क्रोश)= आठ हजार हात लांब किंवा दोन मैलांचे अंतर. २. **रूष्ट** (सं.) = राग, नाखुषी. ३. **लगट** (सं. लग्) = पाठलाग, जोराचा नेट. ४. **उठावण्या**= हल्ला करण्याचे, धाडी घालण्याचे प्रयत्न. ५. **वस्तभाव** = सामानसुमान.

स्वाधीन करावें म्हणून आड[1] घातली. यांणीं मान्य न केलें. यास्तव जाट आपले देशास गेला.

२५. तख्ताखालचे रुपे काढले

गाजुदीखान कुराण पढत होता. श्रावणमास संपूर्ण जाला. कोटचाचे अलीकडे यमुनातीरीं हस्तनापूरचे अलीकडेच मुक्काम होता. पुढें खर्चाची निकड लागली. यामुळें पादशहाचें तख्त होतें. त्याजखाली रुप्याच्या कांबीवर त्याच्या पेटचाकिल्या[2] बसविल्या होत्या. त्या काढून सात लक्षांचा ऐवज[3] काढून लोकांस रोजमुन्हे[4] दिले. आणि भाद्रपदमासीं हा मुक्काम सोडून दिल्लीनजिक दोन कोशांवर पश्चिमेकडे सीतारामाचे शहरांत राहिले.

२६. दिल्लीस मुक्काम

उत्तेरेकडे दिल्लीचे बाजूस चवकीस दमाजी गायकवाड. दक्षिणेकडे समशेर बहादूर, पूर्वेस गिलचाचे तोंडावर हुजरात व खांसा पागा, डेरा व हुजुरातीचे पतके व जनकोजी शिंदे फौजसुद्धां. त्यांचे जवळ हिंदुस्थानी लोक सभोंवते नेमून, बंदोबस्तीनें लष्कर आवळोन अशा जागां जागां चवक्या नेमून भाद्रपद मास पावेतो मुक्काम जाला.

२७. कुंजपुऱ्यावर मोर्चे लावले

गिलच्या यमुना नदीपलीकडे एक कोशावर होता. मध्यें नदीमुळें उभयतां फौजेचीं हत्यारें न होतां, भाऊंसाहेबीं जनकोजी शिंदे यांचे अनुमतें मनसुबा केला कीं,

' कुंजपुऱ्यामधें कुतुबशहा पठाण व शहामतखान बारा हजार पठाणानिशी ठाणें बळकावून आहेत. पूर्वीं दादासाहेबांस खांसे गेले होते, परंतु ठाणें हस्तगत जालें नव्हतें. गिलच्यानें घेऊन यांसि तेथें ठेविलें आहे. आधी ठाणें घ्यावें. पुढें नदीचें पाणी उतरल्यावर गिलच्याची सुरत[5] घ्यावी. '

---

१. **आड** = अट, गळ. २. **पेटाकिल्या** = नक्षी केलेली महिरप. ३. **ऐवज** (फा.) = मत्ता, द्रव्य. ४. **रोजमुन्हे** (फा.) = मजुरी, पगार, मुशाहिरा. ५. **सुरत** (अ.) = गाठ.

अशी मसलत करून अश्विन शुद्ध प्रतिपदेचे दिवशीं कूच करून कुंजपुऱ्याचे रोखें एक मजल जाऊन, फौजेची निवड करून, शिंदे, होळकर व विठ्ठल शिवदेव असे पुढे रवाना केले. मागें एका मजलेचे अंतरें खासा स्वारी व इभ्रामखान गारदी असे दरकूच दरमजल चालले. पुढे फौज गेली, हे तेथें जाऊन पोहोचले. परंतु नजीक मोरचे देऊन राहिले, इलाज चालेना. आंतून गोळागोळी होत होती. दशमीचे दिवशीं खासा स्वारीनिशीं कुंजपुऱ्यानजीक दिढा कोशावर मुक्काम करून भाऊसाहेब व रावसाहेब घोड्यावरून उतरोन, डेरियास जाऊन, पाणी मात्र प्राशन करून स्वार जाले. आणि निशाण फौजेपुढें घालून, किल्ल्यानजिक जाऊन राहिले.

२८. कुंजपुरा असा सर झाला.

तों बातमींचें वर्तमान ऐकिलें कीं, गिलच्या पत्रें किल्लेदारास आलीं. तीं धरून आणली आहेत. पत्रांत मजकूर पहातां कुतुबशहा यास लिहिलें होतें कीं.

' एक दिवस तुम्ही धीर धरून बसणें.
कुमक इतकियांत हर इलाज करून पाठवितों. '

हें वाचून यांनीं निकड[१] करून इभ्रामखान गाडदी मागे सहा कोशांवर होता, त्याजला जलदीनें स्वार पागेचे पाठविले कीं,

' पत्र पावतांच स्वार होऊन येणें.
आम्हीही कुंजपुऱ्यास पोहचतों.'

ते दिवशीं रात्र जाली. दुसरे दिवशी सर्वत्रास ताकीद करून किल्ल्यावर हल्ला केला.

इभ्रामखान रातोरात कूच करून प्रातःकाळींच दाखल जहाले. परभारें येऊन किल्ल्यास झगटला.

श्रीमंतांनी इभ्रामखान यांस सांगून पाठविले कीं,

' मुहूर्तास तीन घटका अवकाश आहे.
तूर्त न उठावें. '

त्यानें सांगून पाठविलें कीं,

१. **निकड** = घाई, त्वरा.

'मुहूर्त कशास पाहिजे ? आम्ही किल्ला फत्ते करितों.
आणि हुजूर येतों. साहेबीं धीर धरून
एक प्रहर बसावें.'

परंतु यांणीं ऐकिलें नाहीं. सर्वत्रांस ताकीद करून हल्ल्यास उठले. आंतील पठाणांनीं मार कुबल[1] दिला, परंतु मारामार करीत लोकांनीं मरदुमी करून खंदक उडून किल्ल्याचे भिताडावर जाऊन पोहोंचले. ते दिवशीं शिंदे यांणीं तरवार सीमापरती केली. कुतुबशहा व शाहामतखान खंदकाचा आश्रय करून होते, तेथें जाऊन लोक पोहोंचले. पठाण कापून काढिले.

२९. पठाणांचे पारिपत्य

शाहामतखान याचें डोचकें मारून आणलें. ते भाल्यास लावून लष्करांत फिरविलें. कुतुबशहास जिवंत धरून आणिलें. त्यास नेऊन ढालेपाशी त्याचें डोचकें मारिलें.

वरकड[2] बारा हजार पठाण कत्तल करून कापून काढिले. किल्ला फत्ते जाला. कांहीं गल्ला व कांहीं ऐवज बिच्छायदी[3] दहा पंधरा लक्षांचा सांपडला.'

किल्ल्यामध्यें बळवंतराव यांस ठेवून आपण मुक्कामास आले. तेथें बातमी आली कीं,

'नदीपार कुंजपुरानजीक पांचसात हजार फौज गिलचाची आली होती. (परंतु) किल्ला घेतला हें वर्तमान त्यांणीं ऐकून निघून गेली.'

३०. गिलच्याचा माग

या नंतर पौर्णिमेपर्यंत तेथेंच मुक्काम होता.

कुंजपुरास खणत्या लाविल्या. भिंतांडें किल्ल्याचीं फोडिलीं. साफ करावयास लागले. आणि 'कुरुक्षेत्रास जावें, तेथें दर्शन करून माघारें यावें.' हा मनसुबा करून आश्विन वद्य प्रतिपदेस कूच करून कुरुक्षेत्राचे रोखें चालिले. तेथें वर्तमान आलें कीं,

---

१. **कुबल** = निःसीम, निकराचा, सीमेपरता. २. **वरकड** = इतर, बाकीचे. ३. **बिच्छायदी** = मालमत्ता.

' गिलच्यास यमुनेनें वाट दिल्ही. गळाभर पाणी जालें. नदी उतरून सडी फौज उतरली. तोफखाना मात्र उतरावयाचा राहिला होता. तोंही उतरावयास लागला. '

असें वर्तमान ऐकतांच कुल सरदारांस रात्रीं बोलावून मसलत केली कीं,

' आधीं जाऊन गिलचाच मुक्काम घ्यावा.

तोफखाना वगैरे फौज नदीपार झाली नाहीं तों गाठ घालावी.

सरंजाम[1] जमल्यावर तोलणार नाहीं. '

म्हणोन कूच करोन पाणिपताचे रोखें द्वितीयेचे दिवशीं बारा कोशांवर पुलावर मुक्काम केला. दुसरे दिवशीं सहा कोसांवर मुक्काम केला. बुणगें[2] मागें राहिले होते याजमुळें केला. तेथें बातमी आली कीं,

' पानपतावर पुढें तीन कोशांवर गिलचा आला. '

तिसरे दिवशीं कुल बुणगे झाडून आले. आल्यानंतर कूच करून पाणिपतावर दाखल जाले. तेथें वर्तमान आलें कीं,

' गिलचा सोनपतावर आला.

ठाणें सरकारचें होतें तें दहशतीनें उठोन आलें.

पानपतावर (त्यामुळें) मुक्काम जाला. '

३१. हुरडा भोवला

दुसरे दिवशीं सडी फौज बाजी हरी समागमें देऊन पुढें त्यांचे लष्करानजीक बातमीस पाठविला होता. झाडी मोठी. गिलच्याचे लष्कर दिसत नाहीं, (असें पाहून) आपणांकडील स्वार लष्करानजीक जाऊन घोड्यावरून उतरून हुरडा खात बसले होते. तों तिकडील पन्नास पाऊणशें स्वार आले. त्यांणीं मध्यें गवसून[3] पंचवीस स्वार धरून नेले. त्यांपैकीं तीन मराठे व एक ब्राह्मण ऐसे चवघांची डोचकीं मारलीं. वरकडाचीं घोडीं हत्यारें घेऊन जिवानशी सोडले. उघडेबोडके लष्करांत आले.

---

१. **सरंजाम** (फा.) साधनसामग्री. २. **बुणगे** (फा.) = सैन्याच्या सामग्रीचा तळ, सैन्याबरोबरचे बिन लढाऊ लोक. ३. **गवसून** = घुसून, मागं काढून.

३२. ईश्वरचरित्र अगाध !

त्यानंतर 'गिलचाकडील स्वार, तोफखाना झाडून नदी उतरून लष्करांत मिळाले, कुल् स्वार एकत्र होऊन राहिले.' म्हणोन वर्तमान आलें.

पूर्वीं गिलच्या नदी उतरेल म्हणून कुंजपुऱ्याकडे जातेसमयी दीडशें नाव शिलमगडाजवळ अटकावून ठेविली होती. परंतु ईश्वरचरित्र! नदीस उतार आला, त्याजमुळें फौज उतरून आली. लष्करानजीक तीन कोशांचे अंतरानें राहिली.

आपले लष्कर, पाणिपताचा जुना खंदक[१] मातबर होता. तेथें पश्चमेकडे मार्गें बुणगें, पुढें सड्या फौजा निवड[२] करून राहिल्या.

३३. शिंद्यांची शर्त, बळवंतरावांची कुचराई

प्रथम जुंज शिंदे–होळकर यांनीं स्वतां केले. आपला तळ सोडून त्यांच्या लष्करावर चालून गेले. तेही वाढून[३] पुढें आले. जुंज मातबर होऊं लागले. त्यांचे कुमकेस सोनजी भापकर वगैरे पतके बळवंतराव यांच्या समागमें देऊन पाठविलें. ते आपला तळ सोडून एका कोसावर फौजसुद्धां शिंदे होळकर ऐसें झुंज होत आहे (तेथे पहात उभे राहिले.)

शिंदे यांजकडील लोकांनीं ते दिवशी शर्त केली. गिलच्या मोड[४] होऊन माघारे गोटांत[५] नेऊन घातले. पांचसहाशें घोडे आणलें.

शिंद्याकडील शेटिबा खराडे व सटवाजी फाळके पडले. गिलचाकडील साहेब लोक मातबर दोनचार पडले. वगैरे[६] बहुत ठार जाले. कांहीं एक जखमीही जाले. ते दिवशी सुजाहित डवला, नजीबखान रोहिला पुढें आला होता. कस्त[७] खाऊन माघारी गेला.

ते दिवशी बळवंतराव गणपत यांनीं कमी केलें.[८] शिंदे यांची कुमक केली असती तर गिलचा पांच सात हजार हलका जाला असतां. तो न जाला. परंतु यश मराठे यांस आले.

---

१. **खंदक** (अ.) = चर. २. **निवड करून राहणे** = निवडक लढाऊ फौजेनिशी सज्ज राहणे. ३. **वाढून येणे** = चाल करून येणे. ४. **मोड** = पराभव. ५. **गोट** = तळ, छावणी. ६. **वगैरे** (अ.) = इतर, किरकोळ. ७. **कस्त खाणे** (सं.) = कच खाणे. ८. **कमी करणे** = कुचराई करणे, माघार घेणे.

३४. त्यांचे साठ पन्नास हजार

गिलचाकडील फौज : अबदाली खांसा, वीस हजार देखील मातबर[१], नजीबखान रोहिला बारा हजार पायदळ व सुजात डवला पंधरा हजार. यां शिवाय किरकोळ पंचवीस हजार, एकूण साठ पन्नास हजार, सुजा डौला यांजकडील व नजीबखान याजकडील तोफखाना लहान-थोर शंभर सव्वाशें जमला.

३५. आपले पन्नास साठ हजार !

लहान फौज आपणांकडील फौज हुजुरात पागा देखील पतके सुमारी तीस हजार व जनकोजी शिंदे कुल् बारा हजार व मल्हारजी होळकर आठ हजार व हिंदुस्तानांतील पतकें तीन हजार, एकूण जुंजती फौज पन्नास साठ हजार, व इभ्राहमखान गारदी पायदळ तोफखाना. शिवाय इभ्रामखान लहानथोर होते.

आंब्याचे बागेंत खांसे पागासुध्दां[२] उजवे बाजूस जांबळीचे बागा-नजिक जनकोजी शिंदे, त्यांचे उजवे हातीं मल्हारजी होळकर व त्यांचे उजवेकडे पेंढारी,[३] होळकरांचे पिच्छाडीस रेणको अप्पाजी व यशवंतराव पवार, डावे बाजूस इभ्रामखान गारदी व समस्त सरदार, त्यांचे डावेकडे दमाजी गायकवाड, व मानाजी पायगुडे व बाजी हरी व विठ्ठल शिव-देव व नारायणराव बापूजी व कृष्णाजी अनंत व तांबे व कितेक पतके अशा बाजू वांटून देऊन, फौजेची बंदोबस्ती करून, बुणग्याचे भंवता बाहेरून तोफखाना, कुल् सभंवता खंदक.

आपले मसलतीनें सर्वांकडून खंदक खचविला. पहिला कांहीं जुना होता तो सरसावून नीट केला.

३६. लढाईस प्रारंभ : व्यूहरचना

कार्तिक शुध्द प्रतिपदेपासून लढाईस प्रारंभ केला. तोफेचे गोळे चालूं लागले. गिलचाकडील फौजेचा बंदोबस्त :

१. **देखील मातबर** = मातबरांसुद्धा मोठमोठ्या सरदारासह, २. **खांसे पागासुद्धा** = पेशवे आपल्या घोडदळासह. ३. **पेंढारी** = जमावाने हल्ला करून, लुटालूट करण्यासाठी जवळ बाळगलेले लोक.

पिछाडीस खांसा अबदाली, पुढें त्याजकडील पठाण, डावे बाजूस सुजात डवला व उजवे बाजूस नजीबखान रोहिला. याप्रमाणें एकामागें एक राहिले होते. त्यांचे पुढें कांहीं अर्ध कोशावर फौज कांहीं समागमें देऊन पुढें ढाला देऊन मोरचे दिल्हे. तोफखाना उभा करीत होते.

आपले लष्करा पासोन त्यांजकडील तोफखाना एका कोशावर होता. तेथोन गोळे येऊन आपले लष्करांतील कितेक घोडे व माणसें मरत होतीं.

आपला बंदोबस्तः ज्या ठिकाणी पतकें राहिलीं तेच मोरचे कायम केले.

पुढें मोरचा चालू येता (?) आपणाकडील तोफेचे गोळे त्यांचे लष्करांत दिढा कोशावर जाऊन पडत होते.[१] आपुले लष्करावर अर्ध कोशावर धमामा[२] रचून वरत्या तोफा लागूं करून तेथोन मार करूं लागले.

आपले गोळे दररोज शें दोनशे त्यांचे लष्करांत पडतात, त्यांजकडील चाळीस पन्नास दररोज येतात.

३७. दाणा–वैरण लाकूड–फाटा

आपले छबिने[३] चार–पाच हजारांच्या टोळ्या पुढें जात होत्या, त्यांजकडीलही फौजेच्या टोळ्या पुढें येतात. त्यांचा मुकाबला होत होता, कांहीं झडपड होऊन हे इकडे येतात व ते तिकडे जातात. आपल्याकडील कहीकाबाड[४] जाई त्याजवर दंगा करूं लागले. तट्टू-

१. या वर्णनातील बारकावा लक्षात घेण्यासारखा आहे. शत्रूने आपल्या सैन्या-समोर अर्ध कोसावर तोफा उभ्या केल्या. मोर्चे पद्धतशीर बांधले. आपल्या लोकांनी आहे तेथे मोर्चे ठेविल्यामुळे लष्करावर (लष्कराच्या मागे) धमामा बांधून तोफा उभ्या कराव्या लागल्या. त्यामुळे. आपल्या तोफांचे गोळे त्यांच्या सैन्याच्या पलीकडे पडू लागले. उलट त्यांचे आपल्या लष्करात पडून घोडे व माणसे मरू लागली. परंतु आपल्या लोकांनी मोर्च्यांच्या जागा बदलल्या नाहीत! २. **धमामा** (फा.) = तोफा ठेवण्यासाठी बांधलेला उंचवटा. ३. **छबिना** (फा.) = रातपहारा, पहारेकरी. ४. **कहीकाबाड** (फा.) = दाणावैरण, लाकूडफाटा इत्यादी मिळवून आणणारी लष्करी तुकडी.

माणसें धरून नेऊं लागले. तेव्हा बंदोबस्त करणें प्राप्त जाला.

दररोज चार हजार फौज कहीचे समागमें देऊन गवत मात्र आणीत होते ! सरपणाचे साहित्य कोठें आंब्याचे वृक्ष होते ते तोडून गंज[1] घातले. पांचा स्वारांचा लोक पतकी. त्याणें एक दुसरा वृक्ष आटोपिला.[2] मातबर सरदारांनीं तर बहूत आटोपिले. आपले आपले ठिकाणीं गंज घातले.

३८. लोक बहुत गडबडले

त्यानंतर आपले पेंढारी त्यांचे लष्करांत जाऊन दंगा करूं लागले. तेव्हां त्यांणीं फौज पाठवून कहीस उपद्रव केला. पांच हजार कही धरून नेली. पन्नास असामींचीं डोचकीं मारिली. तट्टें हिरावून घेऊन वरकडास सोडिलें. त्यापासोन कलह मातबर होऊं लागला. आपले लष्करांत प्रथम धारण कमकसर[3] बारा शेर धान्य होतें, त्यांच्या लष्करांत महर्गता. चार शेरांची धारण. तेव्हां गिलचानें पहिला मुक्काम सोडून यमुनातीरीं जाऊन राहिला, त्याचे लष्करांत अतरवेदीकडील रसद[4] चालूं लागली. बारा शेर धान्य जालें. आपणाकडील रहदारी बंद केली, त्याजमुळें महर्गता चार सहा शेरांची जाली. त्याजमुळें लोक बहुत गडबडले.[5]

३९. मुलखातील चारणांचे साह्य घेतले.

कुरुक्षेत्राकडून रसद चालवावयाचा प्रकार करावा असा विचार करून 'मुलकांतील चारण[6] बोलावून त्यांस बहुत मानवस्त्रें देऊन कौल[7] द्यावा. तमाम संस्थानिकांस पत्रें देऊन मार्ग चालतां केला.

तेणेंकरून दहा शेरांची धारण जाली. चारणांसमागमें पांच हजार स्वार देऊन दहाबारा कोशांवर घालवावे, येते समयीं पुढें स्वार पाठवून आणावे असें केलें. चारण पंचवीस तीस हजार बैल भरून दाणा

---

१. **गंज** (फा.) = रास, ढीग. २. **आटोपिला** = तोडला. ३. **कमकसर** (अ.) = कमीत कमी. ४. **रसद** (फा.) = दारुगोळा, धान्य वगैरे युद्धोपयोगी सामग्री. ५. **गडबडणे** = घाबरून जाणे, हताश होणे, व्यवस्था कोलमडणे. ६. **चारण** (सं.) = बैलांच्या पाठीवरील धान्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेऊन यावर उपजीविका करणारे लोक. ७. **कौल** (अ.) = अभय वचन, आश्वासन.

वगैरे जिन्नस घेऊन येऊं लागले. तेणें करून कांहीं एक दिवस धारण राहिली

४०. खांसा शहा बाहेर येत नाही.

दररोज धांडोरा पिटीत गिलचावर चालोन जावें लागतें. त्या समयीं त्यांणीं तयार होऊन यावें, तेव्हां फौजा पुढें जात, परंतु तो जागा सोडून चालो (न) नये. तेव्हां जुंजास अनुकुल पडलें नाहीं. गिलचाकडील बातमीचे लोक येत. त्यांणीं सांगितलें कीं,

" आपणांकडील फौजाचा बंदोबस्त आब[१] सोडून पुढें येऊन जुंज करावयास खांशांचा हुकुम नाहीं. तुम्ही दररोज चालून गेलां तरी खांसा शहा बाहेर येत नाहीं. लष्कराचा अवघा घोळ आटोपून[२] पुढें तोफखाना देऊन राहिला आहे. जुंज द्यावयास खांसा बाहेर निघत नाहीं."

४१. शत्रूला झुंजण्याचे आव्हान !

(तेव्हां) यांणीं दोन्ही लष्कराचे मध्यें रणखांब उभा केला. आणि भंवताली पळसाची झाडी कितेक होती ती पतक्यांस वाटून देऊन रात्रींच्या मशाला लावून दर पतक्यास दोनशेंचारशें झाडें तोडावयास नेमून देऊन झाडी तोडली, मैदान रान केलें, आणि जासुदा[३] बरोबर सांगून पाठविलें कीं,

' हिंमत धरून जुंजास यावें,' म्हणोन.

४२. ' कोणाचे मदतीस कोणी जाऊ नये.'

त्याजवरून रणखांबाचे इशारतीनें कार्तिक वद्य ३० चे दिवशीं तयार होऊन झाडून फौजा घेऊन खांसा निघून गांवाबाहेर आला, हें वर्तमान यांस कळलें. यावर हेही दररोज तयार होऊन येत होते, त्याप्रमाणें तयार होऊन दहा घटका दिवसास थोडक्या लहान गोळ्याच्या तोफा समागमें घेऊन, तमाम सरदारांस ताकीद करून तयार जाले,

---

१. **आब** (फा.) = मर्यादा. २. **अवघा घोळ आटोपून** = बंदोबस्तीने लष्कराची सर्व रचना करून. ३. **जासूद** (अ.) = हर्कारा, निरोप, पत्रे पोचविणारा.

आणि तमाम धमाम्यापाशीं जाऊन उभे राहिले. सर्वत्र सरदारांस सांडणी स्वारांबरोबर सांगून पाठविलें कीं,

ज्याजवर येईल त्याणें जुंज द्यावें. जेथील तेथें कायम असावें. कोणाचे मदतीस कोणी जाऊं नये,[1] म्हणोन ताकीद करून पुढें अर्धकोश फौजा पुढें गेल्या.

४३. होळकरांची कसोटी : यश

तेही तिकडून चालून आले. त्याणें हल्ल्यास पुढें चाल केली. शिंदे-होळकर यांजकडे. उजवे बाजूस सुजात डवला, हुजुरात. डावे बाजूस नजीबखान रोहिला वगैरे पठाण. खांसा शहा पाठीमागेंच राहिला. प्रथम जुंजाचें तोंड सुजात डवला याणें हल्ला होळकरांकडे लावला. तो होळकराकडील लोक कुल् पळो लागले. जुंजास ठरत नाहींत. होळकरास संकट पडलें. तेव्हां आपण घोडयावरून उतरून गाशा[2] टाकोन बसला, आणि लोकांस म्हणों लागला कीं,

'तुम्हीं सर्वत्र पळोन जावें आणि आपले जीव वांचवावे. आम्ही (मात्र) येथें मरतों. आमचे डोचकें त्याजला कापून नेऊं द्या. तुम्ही पळतां त्याप्रमाणें वाट धरावी' म्हणून बसला.

त्याजवरून लोकांनीं माघारी तोंडें केलीं आणि शिपाईगिरी म्हणावी तशी केली. ते दिवशी होंळकरांनें डवला यास माघारे फिरवून दिल्हे. जुंज उत्तम प्रकारें जालें

४४. बळवंतराव पडले

(सुजात डवला) तिकडून दम खाऊन नजीबखान रोहिला याजकडे येऊन मिळाला. दोघे एकत्र येऊन हुजरतीवर आले. डावे बाजूची पतकें हललीं नाहींत. तीं जेथील तेथें कायम होतीं. इभ्रामखान गारदी हुजुरातीस सामील होता. हुजरातीकडे खांशावर उभयतां चालून आले.

---

१. **कोणाचे मदतीस कोणी जाऊ नये** – सुरुवातीच्या छोट्या मोठ्या चकमकी प्रसंगी हा दिलेला आदेश आहे. एकीकडे वाटाघाटी चालू असल्याने सर्वांनी उठून हल्ला केल्याने मोठ्या युद्धाचा भडका पेटू नये, यासाठी घेतलेली ही दक्षता आहे.

२. **गाशा** (अ.) = खोगीरावरचे आच्छादन, पातळ गादी.

युद्धास तोंड लागलें, ते समयीं बळवंतराव पंचवीस स्वारांनिशी पुढें सरकला. बळवंतराव याजकडील लोक भलें सरदारासमागमें उठले नाहींत. लोकांनीं कमी केलें.[1] आणि खांसा दहाविसांनिशी जाऊन हत्यार फार केलें.

बळवंतराव यांचे कुमकेस हुज़ुरातीचे लोक कुल् जाऊन मिळाले. जुंज बळकट होऊं लागले. दिवस थोडा राहिला. बळवंतराव यांस छातीवर गोळी लागली. ठार झाला. घोडियाखालीं पडला. तो तिकडील लोकांची दाटी[2] करून, घोड्याखालीं उड्या टाकून, डोसकें कापून न्यावयास आले. ते समयीं हुजुरातीच्या दहापांच लोकांनीं हिंमत बळकट धरून पुढें होऊन, मोठ्या जबरदस्तीनें दहापांच त्यांजकडील असाम्या[3] ठार करून पायाशीं धरून मुर्दा[4] ओढून आणला.

४५. भाऊसाहेबी लोक माघारे फिरविले

बळवंतराव पडला हें वर्तमान फौजेंत कळतांच लोकांनीं दहशत खाऊन माघारें कचरले. जरिपटका पन्नास ५० स्वारांनशीं राहिला. तो रोहिला लढाई करीत करीत धमाम्यापाशीं चालून आला. अगोदर लोकांस ताकीद होती त्यामुळें कुमक केली नाहीं. रात्रही फार झाली. धमाम्यापासून कचरून हुजुरातीचे लोक कितीक गोटापर्यंत जाऊन दाखल जहाले, त्या समयी भाऊसाहेबीं छातीचा कोट करून तेथें उभे राहून माघारे फिरते त्यांजवर काठ्या घालून तोंडावर लावीत. आपण जाग्यावरून हालले नाहीत.

४६. यश आले, संतोष झाला

त्या समयी जनकोजी शिंदे 'हाणा हाणा' करीत रोहिल्याचे फौजेंत

---

१. **लोकांनी कमी केले** – २२ नोव्हेम्बर रोजी झालेल्या शिंदे–नजीबखान चकमकीत बळवंतरावच्या लोकांनी शिंद्यांची कुमक केली नव्हती त्यामुळे यावेळी हुजुरातीखेरीज दुसरे कोणी मदतीला आले नाहीत. भले सरदारासमागमे म्हणजे शिंदे–होळकरांबरोबर. २. **दाटी** = गर्दी, खेचाखेच, लगट. ३. **असामी** (अ.) = व्यक्ती, माणसे. ४. **मुर्दा** (फा.) = प्रेत, शव.

मिसळले आणि कुबल[१] मार दिल्हा. डावे बाजूस इभ्रामखान याणें शर्त[२] करून तोंड लावले. मध्यें पहिलें तोंडींच तिहींकडून गारदी याणें खणाखणी केला. रोहिल्याचे लोक कापून काढले. खांसा रोहिला माघारें तोंड करून पळूं लागला. त्या समयीं सुजात डवला याणें कमती करून हत्यारें केलीं नाहींत. खांसा शाहा तो मागेंच होता. पुढें आला नाहीं. रोहिल्यास कुमुक पोहोंचली नाही. खराबी[३] बहुत जाली. चार घटका रात्र परियंत जुंज झालें. ते दिवशीं दिवसाचे जुंज असतें तरी गिलचा परियंत मारीत जाते. शेंपन्नास गिशाणें आणिलीं व हत्यारेंही आणिलीं. हत्यारें तळावरही बहुत पडलीं. त्याचे पाठी लागून त्याचे मोरच्यापर्यंत घालविलें. रात्रीं दिसेनासें जालें. यामुळें फिरून माघारे आले. ते दिवशी जनकोजी शिंदे यांणी बहुत मर्दुमकी केली. जुँज उत्तम प्रकारें जालें. जर करितां ते समयीं भाऊसाहेब माघारें तोंड करते म्हणजे काही बाकी न रहाती! मोठे धीरानें लोक फिरवून जुंज केलें. त्यामुळें लोकांनीं डोया देऊन शिपाईगिरी म्हणावी तैशीं केली. रोहिल्याचा मोड होऊन माघारा आपले लष्करांत जाऊ मिळाला. श्रीमंतांस यश आलें. संतोष जाला.

४७. उज्ज्वल पातिव्रत्य

परंतु बळवंतराव पडिले यामुळें श्रम जाले. प्रहर रातीस भाऊसाहेब व रावसाहेब चांदणीस[४] दाखल जहाले. जे कित्येक लोक जखमी व ठार जाले त्यांचा समाचार आणोन सर्वत्रांचा परामृष केला आणि बळवंतराव यांचे डेऱ्यास जाऊन त्यांची बायको सहगमनास[५] तयार झाली होती तिजला बहुत प्रकारे समाधान[६] करीत होते. परंतु तिने निश्चय केला, तेव्हां साहित्य करून रवानगी[७] केली. रात्रीचेंच दहन केलें आणि आपण चांदणीस आले.

दुसरे दिवशी तमाम सरदारांचे डेरियास जाऊन बहुतां प्रकारें समाधान

१. **कुबल** = जबर. २. **शर्त** (अ.) = कसोसी, पराकाष्ठा, कमाल ३. **खराबी** (फा.) = दुर्दशा, नुकसान. ४. **चांदणी** = तंबू.रहटीचा एक प्रकार. ५. **सहगमन** (सं)= मृत पतीबरोबर त्याच्या पत्नीने स्वतःस जाळून घेणे, सती जाणे. ६. **समाधान करणे** = समजूत घालणे, सांत्वन करणे ७. **रवानगी** (फा.) = पाठविणे, (सती जाऊ देणे.)

केलें. लोक संतोष जाले. त्यामुळे, 'पुढें लढाई करून खामाखाय.[१] गिलचा मोडून काढावा ' याप्रमाणे सर्वत्रांनी बळ दिल्हे आणि स्वारी तयार केली.

४८. रोहिल्याचे रूदन

तो गिलच्यांचे लष्करांतील बातमी आली कीं,

' कालचे जुंजांत रोहिल्याकडील वगैरे पांच हजार लोक पडले, गिलच्यापाशीं जाऊन रोहिला याणें पागोटें आपटिलें कीं,

' माझें सर्वस्वी घर बुडविलें. नामी नामी सरदार पडिले. खराबी बहुत जाली. तुम्हीं कुमक केली नाहीं. या उपर आपण आम्हांस तोंडीं देतां. आपण निघून जातां ! ' (ऐशा) कितेक रागाच्या गोष्टी बोलून रूदन करीत बसला. तेव्हां शहानें बहुत समाधान केलें. शिरपाव दिल्हा व कितेक सरंजाम देऊन डेऱ्यास घालविला ' असें वर्तमान शिंदे यांचे मुखें ऐकिलें.

४९. तहाची बोलणी

ते दिवशी सुजात डवला याजकडील पठाण मातबार आला. सुलुखाची[२] बोली लाविली. परंतु रोहिला या बोलींत नाहीं. डवला याणें कांहीं अबदालीचें अनुमत घेऊन वकील पाठविला. करारांत निश्चय 'अटकेपर्यंत मुलुख घ्यावा व शिंदे यांची मालत[३] नेली ती घ्यावी आणि एक क्रोड[४] रुपये नक्त[५] घ्यावे व दिल्लीचा बंदोबस्त तुमचा तुम्हीं करावा ' अशी बोली पाचसहा रोजपर्यंत होत होती. यांणीं बोलणें केलें. ' परंतु रोहिला आमचे हातीं द्यावा ' अशी आट यांची होती. (त्यामुळे) गोळी वाजतां राहिली नाहीं. तोफांचा मार तिकडून व इकडून पूर्ववत प्रमाणें होतच होता. लोक छबिन्यास जातच होते. जुंज मात्र जालें नाहीं.

---

१. **खामाखाय** (फा.) = निश्चियाने, अवश्यमेव. २. **सलूख** (अ.) = स्नेहभाराची, मैत्रीची. ३. **मालत** (अ.) = जिंदगी, मालमत्ता. ४. **क्रोड**–कोटी. ५. **नक्त** = रोकड, रोख रक्कम.

५०. रोहिल्याने वाटाघाटीत खीळ घातली

बोली[१] दोन महिनें घातली. रोहिल्यास कळल्यावर शहापाशीं जाऊन म्हणों लागला कीं,

'तुमचे सोबतीनें आमचा खराबा बहुत जाला. काहीं बाकी राहिली नाहीं. एक वेळां मी जाऊन लढाई करीन, मग तुम्ही सख्यत्व करावें. तूर्त आपण या मनसब्यास रजावंत[२] नाहीं'

त्यावरून अबदालीनेंही काज पाडिलें.[३] रोहिल्याकडील वकील उठोन गेला.

५१. दिवसेंदिवस गिलचा बळावत चालिला

पुन्हा पूर्ववत् प्रमाणे जूंज होऊं लागलें. असें करितां लहान थोर जुंजें दोन महिनेंपर्यंत जालीं. पावणे तीन महिने मोर्च्यावरच होते. आणि भाऊसाहेब चांदणीवर येत. स्नान भोजन करून मोरच्यावर गेले म्हणजे ते[४] माघारे येत. ऐसें नित्य चालीप्रमाणें जाहलें.

वर्तमान वरचेवर श्रीमंतांकडे लिहून पाठवीत. बळवंतराव पडिल्यावर लहान लहान जुंजें वरचेवर होतच होतीं. परंतु दिवसेंदिवस गिलचा. बळावत चालिला. त्याचे लष्करांत सवंगाई[५] आपले लष्करांत महागाई दिवसेंदिवस होत चालली यास्तव हरएक प्रकारें सख्यत्व करून सांप्रत निघावें हीच मसलत.

५२. पुण्याशी पत्रव्यवहार

याजकरितां श्रीमंतांकडे पुण्यास पत्रें पाठविलीं की,

'आपले लष्करांत धारण फार महाग जहाली आहे. सरंजाम[६] कोणीकडून पोंचत नाहीं. यास्तव आब राखून सलूख[७] करून प्रस्तुत[८] निघावें कीं काय?'

त्याचीं उत्तरें श्रीमंतांनीं पाठविलीं कीं,

'तह कोणत्या प्रकारें, मुलुख कोठपर्यंत, आपणाकडे काय देतो व नक्त ऐवज[९] किती देतो हें लिहून पाठविणें. मनास आणून[१०] आज्ञा करणें ते केली जाईल.'

---

१. **बोली**=वाटाघाटी. २.**रजावन्त** (फा.) = कबूल. संतुष्ट, तयार. ३.**काज पाडिले** वाटाघाटी बंद केल्या.४. **ते** = विश्वासराव.५.**सवंगाई** = स्वस्ताई ६. **सरंजाम** (फा.) = साधनसामुग्री ७. **सलूख** (अ.) मैत्री, तह. ८. **प्रस्तुत** (सं.) = सध्या. ९. **नक्त ऐवज** (फा.) = रोख रक्कम. १०. **मनास येणे** = आवडणे; पसंत पडणे

५३. गोविंदपंतांस आज्ञा

यानंतर लष्करांत लोकांस रोजमुरा[१] नाहीं, खजिना कोणीकडून येऊं पावत नाहीं, यास्तव गोविंदपंत भाऊ बुंदेले यांस पत्रें पाठविलीं कीं,

> ' सरंजाम आम्हांकडे हरएक विचारें करून पोंचता तुम्ही करावा तें होत नाहीं. तरी गिलचाकडे अंतरवेदींतून रसद पोंचती, त्यास जागां जागां लोक घालून, वंद करून, सरंजाम न पोंह्चे तें करावें. [२] '

त्याजवरून गोविंदपंत त्या कामावर चार पांच हजार फौजेनिशीं अंतरवेदींत फिरत होते. तेव्हां गिलच्यानें बातमी राखून गोविंदपंताचे पारपत्यास लंगडा, नजीबखान पठाण दहा हजार फौज देऊन यमुना नदी उतरून अंतरवेदींत रवाना केलें. नदीपार त्यांणीं मुक्काम केला. तेव्हां इकडे वर्तमान कळल्यावर गोविंदपंतांचे कुमकेस जावयाकरितां नारो शंकर यांस पत्रें पाठविलीं.

५४. दिल्लीतील पथक्यांना आदेश

दिल्लीमध्यें नारो शंकर या समागमें शहरचे रखवालीस मीरखान पठाण व बाळोजी रोकडे देखील सातशें स्वारांनिशी होता. त्यास व आप्पाजीपंतांस हुजूर लष्कर नारायण बापूजी तेरा हजार, लखेणीं बोधणें[४] तीनशें, पर्वतराव कदम दीडशें व लक्ष्मणराव गावडे पन्नास, हिरोजी शेळके पन्नास अशीं पतके साडे अठराशेंव स्वार दिल्लीस रवाना केले. आणि त्यांस सांगितलें कीं,

५५. गोविंदपंतांचा शिरच्छेद

' गोविंदपंत अंतरवेदींत आहेत. त्याजवर गिलचानें फौज रवाना केली. त्यास तुम्हीं व नारो शंकर व दिल्लीतील लोक जाऊन कुमक करणे. लंगडा पठाण लुटून पस्त[५] ' म्हणोन रवाना केले.

---

१. **रोजमुरा**–वेतन, मुशाहिरा. २. **जाग जागां… तें करावें**–अब्दालीस अंतरवेदीतून रसद मिळते, ती तोडण्यासाठी जागजागी माणसे ठेऊन, अब्दालीचा रस्ता अडवून त्याला दाणा–वैरण पोचणार नाही, असे पाहावे, ३. **कुमक** = मदत. ४. **लखेजी बोधणे**–वाचनाची चूक. ' लखोजी बोधे' असे पाहिजे. ५. **पस्त** (फा.) = नाहीसा, साफ, उध्वस्त.

हें[1] दिल्लीस जाऊन पोंहचले, तों गिलचाकडील फौजेनें जाऊन गोविंदपंतांशी गांठ घातली. संध्याकाळचा चार घटका दिवस होता, तेव्हां जाऊन फौजेंत मिसळले. त्याची फौज भारी होती. यांणी कोणी हत्यारें धरलीं नाहींत. गोविंदपंतांनीं पळ काढिला. तीन वेळा घोडया-वरून पडिले. फिरून वरचेवर बसवीत. धीर पुरेनासा झाला. लोक चहूंकडे पळूं लागले. दिल्लीहून कुमक कांही पोंचली नाही. तें समयी गोविंदपंत सांपडले तेंथें शिरच्छेद केला. आणि सुजा डवला याजकडे शीर पाठविलें. फौज लुटावयास लागले. कित्येक लोक मारले व कित्येक (पळोन) नेले. घोडी बहुत पडिली. चारपांचशें घोडी घेऊन गेले. कितेक पळोन अंतरवेदीत गेले. कितेक देसचे लोक दिल्लीकडे पळत आले. दोन चार हजारपर्यंत दिल्लीस दाखल जहाले. सुजा डवला याज-कडेस शीर पाठविले होते. त्यांनीं श्रीमंतांकडे पाठविलें. श्रीमंतांस अपेशाचे श्रम जाले.[2] शिरातें दहन करविलें.[3]

५६. फिरोन माघारे आले नाहीत !

यानंतर कुरुक्षेत्राकडून आपणाकडील चारण येत होते. त्यांची बातमी राखून गिलचानें दोन हजार फौज पाठवून चारण लुटावयास सांगितले. ही बातमी कळल्यावर विठ्ठल शिवदेव यांजकडील हजार स्वार गरनळचावर पाठविले. कीं,

‘ चारण आला असला तरी त्याजला पुढें घालून लावून देणें. आणि तेथेंच गिलचाची बातमी राखून राहणें.’

त्याजवरून स्वार गरनळचावर जाऊन राहिले. कांहीं चारण रवाना केलें. पुन्हां गरनाळचास होते. त्या स्वारांस लिहिलें कीं,

‘ चारण जमा झाला असेल तितकाच घेऊन येथें यणें. तेंथें राहिल्यानें गोविंदपंतांची अवस्था होईल.’

परंतु ते फिरोन माघारे आले नाहींत.

---

१. हे = भाऊंनी पाठविलेले स्वार. २. **अपेशाचे श्रम**–गोविंदपंतांकडे सोपविलेली कामगिरी फसली याचे दुःख. गोविंदपंताची कामगिरी यशस्वी होण्यावर पुढील मह-त्वाच्या गोष्टी अवलंबून होत्या. ३. **दहन करविले** = मंत्राग्नि दिला.

५७. रुपयास शेरभर धान्य !

गिलचास वर्तमान कळलें की,

' यांचे लष्करांत चार शेरांची धारण जाली. जें चारण कुरुक्षेत्राकडून येतात त्यांचेवर दोन हजार फौज पाठविली आहे. परंतु तोलत नाहींत. गरनाळच्यावर बसवून चारण पुढें घालून आणितात. ' त्यास फौज पाठवून द्यावी म्हणोन आणिक दोन हजार फौज पाठविली.

पहिली दोन हजार (होतीच.) हे व ते एकत्र होऊन कांहीं चारण लुटून नेले. दाणे यावयाचे बंद जाले. तेणेंकरून लष्करांत महागाई बहुत जहाली. दर रुपयास १ शेर धान्य जालें, सर्व जिन्नस तीन दिवस (पुरतील) याप्रमाणें जालें. अन्नाविणें माणसें मरों लागलीं.

५८. तह ? छे । छे ।।

तेव्हां श्रीमंतांकडेस पुण्यास पत्रें पाठविलीं कीं,

' लष्करांत महर्गता बहुत जाली आहे. सरंजाम येऊन पोंहचत नाहीं. अद्यापि सलूख करून निघावे कीं काय ? तह : चमेलीपर्यंत मुलुख आम्हीं घ्यावा. व पुढें अटके[1]पर्यंत चवथाई[2] घ्यावी. गिलचानें निघोन आपले मुलकांत जावें. येणेंप्रमाणें करार केला आहे. आज्ञा होईल त्याप्रमाणें निश्चयांत आणूं. याचें उत्तर पाठवावें. '

श्रीमंतांनीं उत्तर पाठविलें कीं,

' दशहत खाऊन सलूख करावा ? त्यास दादासाहेबीं लाहुरापर्यंत कांहीं मुलुख काबीज करून आपलीं ठाणीं बसविलीं होती, तो मुलुख त्यास द्यावा आणि फक्त चवथाई घ्यावी ? येणें करून दादासाहेब तुम्हांस हंसतील. असें न करावें. गिलचास मारून लुटून पराभव करावा. अटकेपर्यंत मुलुख आपला करावा. सख्यत्व एकंदर करूं नये. त्यास नीट दिसेल तैसें करणें. खांसा स्वारी तयार होऊन कूच दरकूच तुमचे कुमकेस दाखल होत आहेत. चिंता न करावी. '

ऐसें लिहिल्यावर सल्याचा मनसुबा करण्याची गोष्ट तो राहिली !

---

१. **अटक** = सिंधू नदीच्या उत्तरेकडील प्रदेश. हिंदुस्थानची हद्द म्हणून अटक (मर्यादा). २. **चवथाई** = वसुलीचा चौथा हिस्सा.

५९. रावसाहेबांचे विनंतिपत्र : पेशवे निघाले

त्यानंतर भाऊसाहेबांस न कळवता रावसाहेबांनीं विनंतिपत्र लिहिलें कीं,

> ' गिलचांचा पेंच भारी पडला आहे, उलगडत नाहीं. आम्हांसारखे पुत्र आहेत, पुढेंही होतील, परंतु भाऊसारिखा बंधु मिळणार नाहीं. अशा प्रसंगीं खांशानशीं येऊन कुमक करावी. '

म्हणोन त्याचें उत्तर, ' आम्ही जलद येऊन पोंहोचतो ' असें पाठविलें. आणि पुण्याहून कूच करून पैठणावर गेले. लोक वरचेवर जमा करून दादासाहेब व आपण खांसे देखील हिंदुस्थानचे कुमकेस जावयाचा निश्चय करून पैठणास जाऊन दाखल जहाले. पुढे मजल दरमजल जाणार.

६०. अन्नासाठी दाही दिशा !

यानंतर पाणिपताकडील मजकूर : महागाई बहुत जाली. तेव्हा मसलत करून शिंदे, होळकर यांस सांगितलें कीं,

' तुम्ही खाशा फौजेनशी जाऊन चारण बहुत आणावे. गरनळचास लोक ठेविले आहेत. त्यांनीं लिहिले आहे कीं, मातवर फौज आल्याखेरीज चारण एकही येत नाहीं. अन्नामुळें लष्कर मेलें जाईल. '

म्हणोन त्याजवरून शिंदे, होळकर दहा हजार फौजेनशी चारण आणावयासी गेले.

हे वर्तमान गिलच्यास समजल्यावर नजीबखान रोहिला व सुजायत डवला पंधरा हजार फौजेनशी त्यांचे पाठीवर गेले. त्यांची यांची गाठ गरनाळचाचे मैदानांत पडली. तोंडास तोंड लागलें. चारण पन्नास हजार होता. तो सांभाळून पुढें घातला. आणि ते येत असतां रोहिला व सुजात डवला याणें गांठ घालून लढाई केली. चारण लावून देऊन त्यांशी जुंज दिल्हें. उधळून मुक्कामापर्यंत घातले, आणि चारण सांभाळून आणिले. त्यामुळे दीड शेर धारण जाली. धान्य मिळत होतें. पुढें ज्याचें नांव अन्न तें मिळेनासें जालें. अन्नामुळें घोडीं माणसें मरूं लागलीं.

६१. गलथानपणा

पुढें खजीना इकडून कांहीं येत होता. त्यास गिलचानें मनसुबा करून

दिल्लीचा मार्ग बंद करावा म्हणजे हायास[1] येतील, या विचारें पहिल्या मुक्कामींहून तळ सोडून दिल्लीकडे मुक्काम केला.

दिल्लीस खजीना इकडून स्वार आणावयास गेले होते. त्यांस गिलचा मार्गावर राहिला. हे ठाऊक नाहीं. हमेशा येत होते त्याप्रमाणें रात्रीचा कांहीं खजीना दिल्लीहून घेऊन येत होते. तों वाटेवर त्या लष्करांत पोंहचले. रात्र समय. कांहीं न कळे. यास भासलें कीं, आपले लष्कर ! म्हणोन घोडयांवरून उतरले. थंडीचे दिवस. त्यांचे लष्करांत गोवराचे आगटीजवळ जवळ जाऊन शेकत बसले. गुडगुडया ओढूं लागले. आपले आपले लष्करच्या गोष्टी बोलत शेकत बसले.

'गोट[2] कोणाचा ?' म्हणोन एका जणानें पुसले.

तो म्हणों लागला कीं, 'हे लष्कर गिलच्या पादशहाचें. तुम्ही कोण कोणाचे ? '

तेव्हां अवसानें[3] जाऊन धडपडून घोडयावर बसले आणि पळों लागले.

त्यांचे लष्करांत आवई[4] पडली कीं, 'छापा आला ! '

म्हणोन त्यांणी तोफेची सरबत्तीं दिल्ही.

आपले लोक सांभाळून हे आपले लष्करांत दाखल जाले.

६२. दिल्लीस जाण्याची मसलत

दुसरे दिवशीं सर्वत्र सरदारांस व पतक्यांस बोलावून मसलत केली कीं, 'गिलचाचें बळ दिवसेंदिवस बहुत जालें. आपलें लष्कर सडत चाललें, बहुत घोडीं मेलीं. मातबर खांसा घोडयामुळें पांयउतारां जाला. एक वेळां हा मुक्काम सोडून बाहेर मोकळे रहावें. दिल्लीचा राबता[5] सोडून दुसरीकडे जावें. पण झाडी मोठी मातबर. मार्ग नाहीं. तोफखाना निभावणार नाहीं. यास्तव दिल्लीच्याच रस्त्यानें जावयास मार्ग उत्तम. परंतु गिलचा वाटेवर राहिला आहे. जाऊं देणार नाहीं यास्तव बंदोबस्तीनें निघावें. यमुनातीरीं येऊन पांच कोशांवर जाऊन नदी पाठीशी

---

१. **हायास**–घायकुतीस, रंजीस. २. **गोट** = तळ, छावणी. ३. **अवसान**= (सं.) हिंमत, उत्साह, धीर. ४. **आवई** = बातमी, गप्प, भमका, कंडी. ५. **राबता**= येण्याजाण्याचा रस्ता.

घ्यावी. पुढे गिलचाचे तोंडावर तोफखाना द्यावा. दिल्ली उजवे बाजूस राखोन दिल्लीहून सरंजाम आणोन सारें लष्कर आबादान[1] करावें. हा मुक्काम सोडून यमुनातीरीं मुक्काम करावा.'

तेव्हां मल्हारजी होळकर बोलले जे,

'गिलचा मार्गावर असतां फाट[2] करून जावयास निभाव कसा होईल ?'

तेव्हां निश्चय केला कीं,

'कुल बुणगे सुद्धां जुंज देत, उडवीत, मार देत मारीत मारीत जावें. आणि मुक्काम केल्यावर चहुकडून सरंजामही येऊन पोंचेल.

लोक आबादान जालियावर पुढें गिलचांचे पारिपत्य[3] करू !' हा सिद्धान्त[4] केला.

६३. उदईक कूच करावे !

तेव्हां शिंदे, होळकर यांणीं सांगितलें कीं,

'निभाव जाला तर हा विचार उत्तम आहे. परंतु उद्यांच निघावें, ऐसें नाहीं. रविवारी कूच करून जाऊं.'

तेव्हां भाऊसाहेब बोलिले कीं,'

'आज मंगळवार आहे. रविवार सहा दिवस आहे, लष्करचे लोक अन्नावीण कितीक मरतील. गिलचाचे लष्करांत जातील. मग जाऊन सार्थक काय ? इतके दिवस लष्करचें लष्करांत धीर पुरत नाहीं ! तथापि उदईक कूच करावें मारावे किंवामरावें' हा सिद्धान्त करून समस्त सैन्यास ताकीद करून, 'कुल सर्वत्रांनीं स्वार होऊन लढाईस निघावे. आपले आपले बुणगे पाठीशीं घालून सांभाळून आणावें. तळावर कांहीं एक ठेवूं नये. जुंज करून पुढें दिल्लीच्या रोखें जाणें आहे. परंतु युद्धाच्या सामानानशी निघावें.'

---

१. **आबादान** (फा.) = सुरक्षित,संपन्न. २. **फाट** = हरकत, विरोध. ३. **पारिपत्य**= संहार, बंदोबस्त, शिक्षा. ४ **सिद्धान्त** (सं.) = निश्चित विचार,पक्का निर्णय.

ऐशी बळकट[1] समस्त सैन्यास ताकीद करूद करून प्रातःकाळी पौष-शु ।। ८ बुधवार स्वारी तयार केली. भालदार[2] चोपदार[3] सरकारांतून जागजागां सरदारांसि बोलावूं पाठविलें कीं, 'स्वार होऊन लवकर निशाणापाशी यावें.'

६४. तळ सोडून निघाले

पुढें तोफखाना इभ्रामखान गारदी, डावे बाजूस शिंदे–होळकर, उजवे बाजूस वरकड, कितेक पिछाडीस, बुणगे मध्यें, याप्रमाणें रचना करून गोलचा गोल चालत सहा घटका दिवसानंतर हत्तीवर देऊन नौबत चौघडा सुरूं केला. आणि भाराचे भार चालिले. त्या समयीं दिढा कोसावर जाऊन उभे राहिले. आणि तोफखाना मातबर तोफा निवड करून दिल्या. बाकी तोफा सभोंवता चालिल्या. तोफांचे मागें गारदी, त्यामागें सड्या फौजा, त्याचे मागें बुणगे, असा तळ सोडून दिढा कोशावर आले. छकडे व गाडे व कितेंक सरंजाम न चाले तो टाकला.

मोंगल आपले तळावर आवळून[4] तयार होऊन उभे राहिले.

भाऊसाहेबांनीं मसलत केली कीं,

'आपण नीट चालून मार्गानें जावें. गिलचा वाट देऊन एकीकडे जाला तरि लढाईचें प्रयोजन नाहीं. मार्ग मोकळा करीत नाहीं तरि मध्यें घोडीं घालावीं. मारामार करून उफळून[5] मार देत जावें.'

ऐसें मातबर सरदारांस सांगोन निशाणें सोडून चालिले.

६५. माघारे फिरले

तोंड लागलें प्रथम विठ्ठल शिवदेव, येशवंतराव व माणिकराव कापरे काहींसे वाढून पुढें गेले त्यांजवर. जुंज मांडिले तेव्हां ते कचरून माघारे तोफखान्यांत येऊन राहिले. तो दमाजी गायकवाड यांजवर गिलचानें येऊन कांहींशी मारामार केली. तेही माघारे फिरले !

---

१. **बळकट** = जोरदार, दृढ. २. **भालदार** – भाला घेऊन स्वारीत पुढे चालणारा, निरोप पोचविणारा. ३. **चोपदार** = हातात विशेष प्रकारची सरकारी अधिकारनिदर्शक काठी घेऊन अधिकाऱ्यापुढे चालणारा आणि निरोप पोचविणारा. ४. **आवळून** – एकत्रित येऊन. ५. **उफळून** – भडीमार करीत.

डावे बाजूकडे मुक्कामीं गोटाचे गोट उभे राहिले राहिले होते. त्याप्रमाणें पतकें (उभी) होतीं. त्याजवर खांसा अबदाली त्या जुंजावर डावेकडे होता. त्याणें जुंज भारी केलें ! (त्यामुळें) कुल आपणांकडील पतकें माघारीं फिरलीं. हलके बहुत जाले.[१]

६६. इभ्रामखानावर चाल

इभ्रामखान गारदी याजवर खांसा खुराणशहा व रोहिला याणें चालोन घेतलें. एक रंजक[२] उडाली. तिकडील लोक बहुतेक पडिले. हटला नाहीं. तसेच नेट धरून मारीत आले. इभ्रामखान गारदी याजवर चाल पडली. कुमक कोणी केली नाहीं. तथापि हुजरातचें लोक एकत्र येऊन संधान साधिलें. तोफा सुटत होत्या. लढाई मातबर एक प्रहर केली.

६७. रावसाहेबांचा मृत्यू

इकडे उजवे बाजून शिंदे, होळकर यांजवर सुजात डवला व गोसावी वगैरे यांणीं येऊन (घाव) घातलें. जुंज मातबर होऊं लागलें.

मध्यें भाऊसाहेब व कांहींसे लोक व रावसाहेब हे उभयतां घोडियावर सांभाळून होते. भाऊसाहेब ' परी ' घोडीवर, रावसाहेब ' दिलपाक ' घोड्यावर होते. चोहोंकडून लोक सांभाळून होते. जुंजाचें तोंड लावलें. मारामार होत होती. मातबर लोक पडूं लागले. इतकियांत रावसाहेब यांस छातीमध्ये गोळी लागोन ठार जाले.

हें भाऊसाहेब यांणीं पाहून अवसान सोडिलें.

बहुतेक (सारे) शोक करूं लागले. मुडदा उचलून अंबारीमध्यें घातला. आणि भाऊसाहेबांनीं निश्चय केला कीं,

' या उपरि गिलचा खांशानिशी मारीन ! '

ऐसें जाहलें आणि लोकास ताकीद करून जुंज लागलें.

' हाणा हाणा ' ऐसें मुखें बोलून भाऊसाहेब सर्वत्रांस ताकीद करूं लागले.

---

१. **हलकें होणें** = आत्मविश्वास गमावून बसणे, सैरभैर होणे. २. **रंजक** – तोफगोळ्यांच्या मारा.

६८. भाऊंचा पराक्रम

बरोबर समशेर बहादर होते. ते घेऊन पुढें जाऊन तीन वेळां मागें हटविलें.

त्यांजवर चहूंकडून गिलचानें मार तोफांचा, गोळ्यांचा व शरांचा केला. तेव्हां लोकांनीं हिंमत धरून भाऊसाहेबांबराबर सरसाऊन शिपायगिरी बहुत केली. रोहिला माघारां फिरविला. हल्ला करून मोड करून माघारां फिरविला.

गिलचा खांसा पळ काढून यमुनापार दाखल जाला.

शिपाईगिरी भाऊसाहेबांची म्हणावी तैशी जाली कीं,

ज्याचें नांव शिपाईगिरी !

विश्वासराव पडिले. (त्यामुळें) डावे बाजूचे लोक कचरून माघारे फिरले. अशामध्यें (प्रेत) सांभाळून रोहिला माघारां सारिला. अबदाली पळून नदीतीरीं गेला. लढाईची शर्त केली !

६९. गिलचे चाकरांचा प्रताप

विठ्ठल शिवदेव यांजकडेस पेशजी[1] गिलचे चाकर दोन हजार ठेविले. त्यांस इशारतीस भगवें फडकें दिल्हें होतें. तें डोईवर बांधून फिरत होते. तें समयीं विश्वासराव पडिले ही खबर लष्करांत बुणगियांत जाली. लष्कर गडबडलें होतेंच. गिलचे चाकर यांणीं भगवें फडकें टाकून दिल्हें आणि बुणगियांत आवई घातली कीं,

' लुटूं लागले ! '

(तें ऐकोन) बुणग्यानें पळ काढला !

बुणगें पळतें आहे हें पाहून विठ्ठल शिवदेव यांणींही पळ काढला ! !

आधीं राऊसाहेबांचे वर्तमान ऐकून दहशत खाल्लीच होती. बुणगें पळतें हें पाहून ते पळाले. डावी बाजू रिकामी होत चालली. रोहिला यांजकडील लोकांनीं लुटीची धुमाळी मांडली.

७०. इभ्रामखानाची शिपाईगिरी

इकडे जुंज भाऊसाहेबांकडे होतच होतें. उजवे बाजूस शिंदे होळकर यांकडे जूंज होतच आहे. मारामारी होतां होतां भारी खणाखणी

---

१. **पेशजी** (फा.) = काही दिवसांपूर्वी, मागे.

जाली. रावसाहेबांचें वर्तमान ऐकोन जनकोजी शिंदे व मुकुंदजी शिंदे यांणीं मोठी मर्दुमकी करून मारामारी करीत भाऊसाहेबांपाशीं आले. तों इभ्रामखान गारदी याजवर लूट पडली. त्यानें जिवाचा निधडा करून शिपाईगिरी म्हणावी तैशी केली. ज्याचें नांव शिपाईगिरी !

कितेक गारदी (खेतांत) आले[1] व कितेक ठार जाले.

हुजुरातीचे लोक जवळचे पळों लागले. तोफखाना बंद जाला.

(इभ्रामखानानें) जातीनिशीं तरवार सीमेपरती केली. जाऊन गिलचाचे लष्करांत मिसळला. दहा पांच ठार केले. भोंवता वेढा गिलचाचा पडला. आंगावर जखमा भारी पडिल्या, ऐसें असतां लढतच होता ! प्रयत्न न चाले तेव्हां हत्यारें राहिलीं. धरून नेला. तेव्हां हें वर्तमान श्रीमंतांस कळलें.

७१. भापकर पळाले, शिद्यांनी शर्थ केली !

मल्हारजी होळकर याचे बाजूवरही मातवर जुंज झालें. रेटत नाहींसें जालें तेव्हां तेही बाजू सोडून निघाले.

भाऊसाहेबांचे तोंडीं हेंच कीं, ' हाणा ऽऽ हाणा ! '

हेंच करीत असतां जातीनिशी मोठा हिय्या केला. बहुत जुंज मातबर केलें तें कोठवर ल्याहावें ?

सरकारचें मुत्सद्दी तमाम बिलकुल् एकीकडे पळों लागले.

सोनजी भापकर यांसि भाऊसाहेब बोलिले कीं,

' सोनजीबाबा, हा समय निघावयाचा नव्हे ! तुमचा भरंवसा बहुत धरला होता !! उभे रहावें. '

तेव्हां ते बोलले कीं,

' कुल् लोक पळतात त्यांजला माघारें फिरवितों. साहेबांस टाकून आम्ही कोठें जावें ? '

ऐसें म्हणोन लोक फिरवावयास म्हणोन जो गेला तो तिकडेच गेला !

तेव्हां मुकुंदजी शिंदे म्हणों लागले कीं,

---

१. **खेतांत येणे** = रणांगणात जखमी होऊन पडणे.

'महाराज, क्षात्र धर्माची शर्त जाली ! याजउपर निघावें हें उत्तम आहे.'

तेंव्हां भाऊसाहेब बोलले कीं,

'मुकुंदजीबाबा, आतां कोणीकडे जावें ? काय तोंड दाखवावें ? रावसाहेबांकडें पहावें.'

तेंव्हां मुकुंदजी शिंद यांणीं घोडियावरून उडी टाकली. जातीनें हत्यार करवलें तेथवर केलें. मातबर मराठधर्माची शर्थ करून ठार जाले !

७२. कोणी माघारा फिरला नाहीं

जरीपटक्याचे निशाणाजवळ अगोदर दाटी जाली होती. तेंव्हां हत्तीवरून उतरून (भाऊसाहेबांनीं) घोडियावर घातलें होतें. निशाण गुंडाळून (लोक) पळूं लागले. तेंव्हां भाऊसाहेबीं शहाजणें[1] वाजवावयास आज्ञा केली. 'फत्ते जाली, शहाजणें वाजतात, याजकरितां तरी लोक माघारे फिरतील,' या अर्थें शहाजणें वाजवूं लागले. परंतु ज्यांणीं पळ काढिला त्यांपैकीं कोणी माघारा फिरला नाहीं !

७३. भारती युद्धाची उपमा

भाऊसाहेब व जनकोजी शिंदे व शेंपन्नास लोक व रायाचे मुडद्याचा हत्ती इतकी बाकी राहिली. त्यांजभंवता वेढा भारी पडला. तेंव्हां युद्ध बहुत केलें. पूर्वीं भारथीं[2] अतिरथी महारथी[3] जुंज जालें. त्याप्रमाणें भाऊसाहेबींही लढाईची शर्थ केली. पुढें कांहीं इलाज चालेनासा जाला.

त्यानंतर भाऊसाहेब व जनकोजी शिंदे यांची गती काय जाली ती कोणीं पाहिली नाहीं !

रावसाहेबांचे मुडद्याचा हत्ती व भाऊसाहेबांची बसती घोडी ऐशीं सुजात डवला याजकडे गेलीं.

७४. जानू भिताडद्याची हिंमत

त्यानंतर सौ. पार्वतीबाई यांचे बंदोबस्तास विसाजी कृष्ण जोगदंड

---

१. **शहाजणे** (फा.) = मोठे नगारे. २. **भारथी** (सं.) = महाभारतात वर्णिलेले कौरव-पांडवांचे युद्ध. ३. **अतिरथी-महारथी** (सं.) = रथात बसून असंख्यात योद्ध्यांशी एकटा लढणारा योद्धा, मोठमोठे अजिंक्य योद्धे.

या समागमें पांचशें धनगर देऊन ठेवले होते. त्यास आज्ञा केली होती कीं, 'आम्ही जुंज करून पार होऊन निघालों तरि यास घेऊन दिल्लीचे रोखें निघोन यावें. आणि आम्ही पडलों असें वर्तमान ऐकिल्यावर यांस जिवें मारून तुम्हीं निघोन जावें.' असा निश्चय खास सांगून त्याजला रखवालीस ठेविलें होतें.

मोड जाला, लोक पळों लागले. ते समयीं विसाजी कृष्ण व लोक यांणीं आपले जीव वांचविले. कोणीकडे गेले हे कळेना !

जानू भिताडा खिसमतगार[1] एकटा राहिला. त्याणें हिंमत धरून आपले पाठीशीं बांधून तेथून बाहेर काढिले !

७५. पळापळ, लूट व कत्तल

त्यानंतर दुसरें वर्तमान :

जुंजांतून मातबर सरदार व लहान थोर कितेक लोक पळोन आले, ते पश्चिमेकडे जुन्या तळावर खंदकांत येऊन दाखल जाले कीं,

'भाऊसाहेबीं माघारे पळोन येऊन पूर्ववत्प्रमाणें तळ काढून रहातील ! या मागें नित्य जुंजांत जात असत, तेव्हां संध्याकाळीं माघारां फिरून येत, त्याप्रमाणें येतील !' म्हणून माघारे बुणग्यांसुद्धां येऊन खंदकांत दाखल जहाले.

तों तेथील फौज व बुणगेही पळतात ! तेव्हां तेथेंही धीर पुरेनासा जाला. मग तेथूनही वाट सांपडेल तिकडून पळत गेले !

ज्याचे घोड्यांत जीव होता तो खंदक पार होऊन पाणिपत शहरांत गेला. जिकडून ज्यास मार्ग दृष्टीस पडला तसे निघाले.

कितेक गाडे व छकडे व बायका खंदकांतून निघावयाचें जालें नाहीं ते तेथच्या तेथेंच राहिले. तो गिलच्याकडील लोकांनीं पाणिपत शहरचा बंदोबस्त करून खंदकांतील मालत[2] लुटूं लागले. कितेक बायका धरून नेल्या. कितेकांनीं जिवें मारिल्या. तीच गत पुरुषांस. कत्तल करून जिवें मारिले व धरूनही बहुत दस्त केले[3].

---

१. **खिसमतगार** (फा.) = सेवक, हुजऱ्या. २. **मालत** (अ.) = जिंदगी, मालमत्ता. ३. **दस्त करणे** (फा.) = जिवंत धरणे.

७६. धर्म सोडला त्याचे फळ मिळाले

प्रातःकाळते प्रहर दिवसानंतर जुंज लागलें तो तीन प्रहर ' हाणाऽ माराऽऽ हेंच जाले. पृथ्वीनें बहुत रक्त प्राशन केलें.

हिंदूमध्यें या प्रा ों[1] जुंज मागे जालें नाहीं व मोडही याप्रा ो होऊन कत्तल जाली नाहीं ! पुढेंही होणार नाहीसें दिसतें !

तथापि ईश्वराची करणी कीं पृथ्वींतील लोक नेऊन त्यास मारावयाचें केलें ! मराठे लोक निर्माण केले तेव्हांपासून. फौजा हटानें कधीं केल्या होत्या ?

आपल्या लष्करांत भोंवता खंदक खाणून कोण राहिलें होतें कीं काय ? उत्तम प्रकारें गांठ पडली तरि जुंज द्यावें नाहीं तरि पळोन जावें हा मराठधर्म पुरातन चालत आला आहे. तेणेंकरून पृथ्वी जिंकली होती !

तें सोडून अविंधी[2] धर्मांचा स्वीकार केला आणि लोक दरोबस्त व घोडी मारविलीं !

ईश्वरसत्ता ! उपाय काय ?

नानासाहेब व भाऊसाहेब ईश्वरी अवतार धरून या युगीं चरित्र केलें !

७७. विश्वासरावास मंत्राग्नी

त्या नंतर जुंज होतां होतां रात्र झाली.जुंज बंद जालें.हत्यारें राहिलीं. विश्वासराव यांचें मुडद्याचा हत्ती सुजात डवला याजकडे गेला होता. तेथें दौला याजकडील गोसावी शिपाई होता. त्याणें लष्करचे पळापैकीं तैलंग ब्राह्मण आणून रायाचे दहन करविलें. उत्तम प्रकारें गत करून[3] अस्थि वाराणशीस रवाना केल्या.

७८. सुजायत दौलाचे औदार्य

पाणिपतांतील लोक शहरांतून दुसरे दिवशी गांवचे दरवाजे बंद करून कुल् पळाचा बंद[4] धरून दहा पंधरा हजार पळ धरिला. खंदकांतील

---

१. प्रा ों = प्रमाणें. २. अविंधी = ज्याला भोक किंवा वेजे पाडले नाही, असे. मुसलमानांमध्ये कान टोचण्याचा संस्कार नसतो, म्हणून त्यांस ' अविंध ' म्हणतात. ३. **गत करणे** = रीतीप्रमाणे मंत्राग्नी देऊन धार्मिक विधी करणे. ४. **बंद** (फा.) = कैदी.

धरलें. तेव्हां ताकींद जाली कीं,

' माणसांस न मारावें. मालत घेऊन सोडून द्यावें.

त्याजवरून दुसरे दिवशीं यांणीं मारलें नाहीं.

बंद धरिला होता तो कुल् वीस हजारपर्यंत लष्करांत आणिला. दोन दिवसपर्यंत लष्करांत होता. त्यास सुजायत दौला यांणीं गिलच्याशीं तीन लक्ष रुपये खंडणी देऊन धर्मार्थ बंद सोडून दिला.

रणांतीलही शोध सुजायत दौला याणें करून मातबर सरदारांची वगैरे ओळख निघाली त्यांस नेऊन गत उत्तम प्रकारें केली.

७९. आयुष्य होते ते जगले !

त्यानंतर इकडील पळाचें वर्तमान:

तरि कितेक घोडियाचे सामर्थ्येंकरून दिल्लीचा रस्ता ज्यांस सांपडला ते पांच सात हजार निघोन गेले. त्यांस त्या मार्गें दांडगे[१] गांवचे भेटले. त्यांणीं मारामार करून कितेकांची घोडीं घेऊन सोडिलें व कितेक जीवें मारिले. त्यांमध्यें ज्यांचे घोड्यास जीव बराच होता ते पांच सातशें वांचून संध्याकाळीं चाळीस कोस दिल्लीस जाऊन दाखल जाले. कितेकांस दुसरे मार्ग सांपडलें ते भकोन[२] घोळांत पडले, भगवंतें वाट दिल्ही तिकडे गेले.

आयुष्य होते ते जगले आणि आले !

८०. पार्वतीबाईची अवस्था

यानंतर सौ पार्वतीबाई यांस जानू भिताडा खिसमतगार याणें पाठींशी बांधोन आणिलें. पिराजी राऊत पळत होता त्यांणीं पाहतांच पाठीची सोडून आपल्या घोडियावर पाठीमागें बांधोंन सहा कोशपर्यंत आणिली. पुढें त्याचा घोडा थकला. त्यानें उतरून ठेविली. पुन्हां जानू भिताडा खिसमतगार कोश अर्धकोश चालवितो तों बळकट घोड्याचा मातबर सरदार कोणीं त्याचे घोड्यावर बसवी. ऐसें करीत करीत तशा संकटानें दिल्ली आलीकडें तीन मजलावर मल्हारजी होळकर व कितेक सरदार व पागेचे बारगीर व स्वार शिलेदार पन्नास भेटले. त्यांमध्यें

१. **दांडगे** = पुंड, मवाली, ताकदीचे लोक. २. **भकणे** (हिं.) = भलत्याच मार्गाने धावत सुटणे, भ्रमात पडणे.

येऊन भेटली आणि मिळाली.

८१. दिल्लीची हकीकत

त्यानंतर दिल्लीकडील मजकूर :

तरि बुधवारीं अष्टमीचे दिवशीं तिसरा प्रहपर्यंत जुंज होऊन मोड जाला. तो गुरुवारीं प्रातःकाळीं कितेक पळत आले. तेथें कोशावर मीरखान ठोका व बाळोजी पगडे (दगडे ?) ऐसे सहासातशें किल्ल्यांत होते. बाकी हुजारातीचे पतके लक्ष्मणराव गावडे व हिरोजी शिर्के व लखोजी बोधे व बापू बाजीराव यांची पतके पर्वतराव कदम व गोविंद पंत बुन्देले यांच्या सूत्रें[२] पांचशें स्वारांनिशीं अशीं तीन सहस्र होतीं. हजार वाळवंटींत होते. त्यांस सर्वत्रांस पळाचें वर्तमान समजलें. परंतु तहकीकी[१] कीं,

' कदाचित भाऊसाहेब पळोन दिल्लींत आले आणि अगोदर पळाले ! असें झालें, येंणे तोंड दाखवावयास जागा नाहीं ' यास्तव धीर धरून रहाते जाले !

८२. बायकापोरे लुटू लागली

पेशजी लष्करचे उदमी कितेक बाहेर जाऊन राहिले होते त्यास त्या शहरांतील भिकारी यांणीं शोध करून लुटूं लागले व मारूं लागले. वाळवंटींत पतकें होतीं. गुरुवारीं तिसरा प्रहरपर्यंत धीर धरून होतीं. कांहीं खजीनाही सरकारचा होता, तो अगोदर काढून बाहेरींल पतके व आपण एकत्र होऊन निघाले असतें तरि निभाऊन येते. तें न जालें !

संध्याकाळीं गंगोबातात्या, होळकराचे दिवाण पळतच दिल्लीस आले. नारो शंकराकडे भोजन केलें. सविस्तर मजकूर सांगितला.

' याजउपर जसा मार्ग भगवंत देईल त्याप्रा तें निघोन पार व्हावें. नीट दिसत नाहीं. तुम्ही डोळे झाकून कां बसला ? '

---

१. **तहकीक** (अ.) = निश्चिती, खात्री. २. **यांच्या सूत्रें** – चुकीचे वाचन. ' यांचा पुत्र ' असे पाहिजे. गोविंदपंतांचे चिरंजीव ' बाळाजी गोविंद ' हे पाराजीपंत बाघाबरोबर खजिना घेऊन गेले होते. (६१ वा परिच्छेद पाहा). ते यावेळी दिल्लीस होते.

असें नारोशंकर यांस सांगितलें आणि ते स्वार होऊन गेले.

तेव्हां अवसानें गेलीं. खजीना काढावयास अनुकूल पडलें नाहीं. दिल्लीतील लोक व बायका देखील लष्करच्या लोकांस मारून लुटूं लागल्या. शहरांत धूम जाली. जिवानिशी मारामार करीत नारोशंकर वगैरे कुल् झाडून निघाले.

अगोदर वाळवंटींतील पतकें तीन निघालीं. तीं फराडियास जाऊन जीन न उतरतां दमसांड[1] केला. तों हीं रातोरात येऊन मिळालीं.

त्यानंतर नाना पुरंदरे व बाळोबातात्या व आणीक शेंपन्नास आले. तेही एकत्र होऊन तीन मजला आले. तो होळकर यांची व बायकांची गांठ पडली. तेथून मजलदरमजल अकरावे दिवशीं भिंडेस[2] दाखल जाले.

८३. भिक्षेस दहा दाणे, पैशाएवढा भाकरीचा तुकडा

इकडील वर्तमान :

कितीकांस दिल्लीचा मार्ग सांपडून दिल्लीस येऊन यांचे मागोमाग भिंडेवर आले. वाटेनें कितेक जिवें मारले, कितेक गेले. कितेक लुटून सोडून दिल्हे.

दिल्लीचा मार्ग सांपडला आणि जिकडे गेले. फिरत फिरत तीस-चाळीस हजारांस पांचपन्नास दांडगे मिळोन लुटून घोडीं हिरावून घेतात. मातबार माणूस अनाथ होऊन पायउतारा जाले. बहुतांस अन्न कोठे मिळेनासे झालें !

ऐसें जातां जातां जाटाचे मुलकांत आले. एक मातबर गांव होता. तेथें एका सावकारानें भिक्षेस खंडीभर उडीद वांटले, दर मनुष्यास दर दहा दाणे आले ! आणीक (एकानें) मण दोन मणाच्या भाकरी करून तुकडे वाटले. एक–एकास पैशाएवढा तुकडा आला ! !

अशी भिक्षा घातली ! !

८४. जाटाचे औदार्य

आंगावर वस्त्रें नाहींत. चुन्याचे भट्टीजवळ बसलें रहावें. ब्राह्मणांस तो अकरा दिवस अन्न नाहीं. पौष मास. थंडीचे दिवस, बहुत आपत्.[3]

---

१. **दमसांड** = विश्रांती. २. **भिंड** – ग्वाल्हेरच्या पूर्वेस ५३ मैलांवरचे ठिकाण. ३. **आपत** (सं.) किंवा **आफत** (अ.) = संकट, दुर्दैव.

मातबर सरदार, मनुष्यें दीनाप्रमाणें होऊन पंधरावे दिवशीं भरतपुरावर येऊन दाखल जाले. तेथें जाटाची बायको होती. तिणें धर्म बहुत केला. जागांजागां स्वार पाठवून मुलकांत ताकीद केली कीं,

' पळाचे लोक येतील त्यांस कोणी छळूं नये. '

भरतपुरास पावलियावर तीस चाळींस हजार माणसांस सर्वत्रांस आठा रोजांचें अन्न दिल्हें. ब्राह्मणांस निवडून नेऊन दूध, पेढे, मिठाई दिल्हीं. असे एक दिवस फराळास घालून दर ब्राह्मणास पांच रुपये नक्त व एक तिवटें[1] व एक रजई व एक एक धोत्र व आठा दिवसांचे अन्न शिधा[2] बहुत उत्तम प्रकारें देऊन शहरांत आराम व्हावयास (राहून) घेतले. शहरांत ताकीद केली कीं,

' ज्यास जसें अनकूळ पडेल तसें अन्न द्यावें. जेथें राहतील तेथें जागा द्यावी. कोणी छळूं नये ! '

अशी बहुतांस ताकीद करून मातबर कोणी भेटला त्यास घोडी बसावयास दिल्हीं. कोणास पालखी दिली.

या प्रमाणें सर्वत्रांचा सांभाळ केला. बहुत लोक जगले.

तेथून पुढें येतां फिरोन दांडगे यांणीं वस्त्रेंप्रावर्णें घेतलीं. उघडे बोडके झडत पडत भिंडेस दाखल जहाले. मातोश्रीबाई[3] व होळकर नाना पुरंदरे ऐसे होते. ते सर्वत्र जमा जाले. तेथें पंधरा मुक्कास जाले. पळाचे लोक आले, त्यास सर्वत्रांस पांच रुपये बाईनें दिल्हे.

नाना पुरंदरे यांणीं बातमी भाऊसाहेब यांचे शोधास पाठविले आणि कूच करून ग्वालेरीस आले.

८४. नानासाहेब पेशवे निघाले

यानंतर...

नानासाहेब पैठणास आले होते. तेथें आपलें लग्न केलें ! आणि दादासाहेब यांच्या समागमें कांहीं फौज देऊन निजामअल्ली याचे तळावर रवाना केलें. आपण दहा बारा हजार फौजेनिशीं कूच करून मजल दरमजल बेलापूर प्रांतांत उतरले. तेंथें राजश्री जानोजी भोंसले सामोरे येऊन भेटले. त्याचे बहुत प्रकारें समाधान करून हिंदुस्तानांत जावयास

---

१. **तिवट** = मुंडासे, पागोटे. २. **शिधा** – न शिजवलेली डाळ, तांदूळ, गूळ इ. स्वैपाकाची सामग्री. ३. **मातुश्रीबाई** – पार्वतीबाई, भाऊसाहेबांची बायको.

बरोबर घेतले. पांच सहा हजारांनशीं तेही सामील होऊन समागमें चालिले.

श्रीमंतांसमागमें बापूजी नाईक व गोपाळराव गोविंदराव व सदाशिव रामचंद्र व विठ्ठल विश्राम ब गंधाधर बापूजी व यमाजी शिवदेव व गोपाळदेव.

खांसा स्वारी पौष मासीं शूद्ध पक्षी तळेगांव प्रों आडगांव प्रांत वराड येथें दाखल जाली. तीन मुक्काम तेथें जाले. पुढें जावयाचा करार करून विध्याद्री पावेतों तेंथील गोंडाचा राजा आणून त्यासि वस्त्रें व पेंडे, तिवटें कडे वक्षीस देऊन समाधान करून चालिले. पार होऊन नर्मदेवर मुक्काम केला. तेथे बंदोबस्त फौजेचा करून पुढें मजल दर-मजल सुरंजेवर मुक्काम केला, जानोजी भोंसले व हुजरातींचीं पतकें, खेचीवाडीकर बेमान झाले होते त्यांचे पारपत्यास खेचीवाड्याच्या मुलकांत पाठविलें.

८५. बातमी ऐकून नानासाहेब माघारे फिरले

श्रीमंत फौजेसुद्धां मुक्कामावर होते. तेथें वर्तमान आलें. कितेक पत-कींचे लोक उघडे बोडके (आले)

श्रीमंतांनीं ऐकोन खेद बहुत केला. श्रीमंतांचा निश्चय पूर्ण कीं, ' आपण दिल्लीस जाऊन गिलचा मारून टाकावा ! '

असा विचार करून बंदोबस्त केला. त्यास सौ गोपिकाबाई यांणीं बहुत बोध विवेक करून माघारें फिरविलें. कूच करून मजल दरमजल नर्मदा उतरून ब्राह्मपुरास आले. इकडील ग्वालेरीहून मातोश्री पार्वती-बाई व नाना पुरंदरे वगैरे लोक येऊन श्रीमंतांस वर्तमान हिंदुस्थानचें सांगितले[१].

---

१. पुढील मजकूर बंद फाटल्याने अपुरा राहिलेला आहे. मात्र बखर जवळ जवळ पुरी झाली आहे. नानासाहेबांच्या मृत्यूची काय ती हकीकत राहिली आहे ! नानासाहेब ' भाऊ भाऊ ' म्हणून शोक करीत पुण्यास पर्वतीवर २३ जून १७६१ रोजी मृत्यू पावले.

★

स्पष्टीकरणार्थ टीपा

१

सदाशिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब (१७३०-१७६१) हाच या बखरीचा नायक. पहिल्या बाजीरावाचा धाकटा भाऊ चिमाजीअप्पा याचा हा एकुलता एक मुलगा. १७५० साली हा पेशव्यांचा दिवाण झाला.

विश्वासराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब (१७४२-१७६१) बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवा यांचा हा मोठा मुलगा. नानासाहेबांनंतर उद्याचा पेशवा म्हणून त्याची जडणघडण करण्यात येत होती. निजामावरील शिंदखेडच्या स्वारीत आणि उदगीरच्या लढाईत हा हजर होता. भाऊसाहेब दिल्ली पादाक्रांत करील व तेथे स्वतंत्र कारभार करील या भीतीने नानासाहेबांची पत्नी गोपिकाबाई हिने पायगुंता म्हणून आपल्या मुलास बरोबर घ्यावयास लाविले, अशी हकीकत भाऊसाहेबांच्या बखरीत आहे. भाऊसाहेबांनी म्हणूनच दिल्ली काबीज केल्यानंतर खास दरबार भरवून यास सर्वांकडून नजरा करविल्या.

सुरुसन - सुरूसन किंवा सुहूर सनाचा आरंभ हिजरी ७४४ (शके १२६५) मध्ये झाला. मात्र आरंभीचे वर्ष एक न धरता हिजरीइतकेच म्हणजे ७४४ हेच धरले. याचे शकात रूपांतर करावयाचे झाल्यास ज्येष्ठ ते फाल्गुन ५२१ व चैत्र ते वैशाख ५२२ वर्षे मिळवावी लागतात. याचे वर्ष सौरमानाचे असून वर्षाचा आरंभ मृगनक्षत्रावर होत असल्याने याला 'मृगसाल' असेही म्हणतात. महिने चंद्रमानाचे असल्याने दरवर्षी याचा एकाच सालात एकाच नावाचा महिना दोनदा (एकदा आरंभी व एकदा शेवटी) येतो. याचा प्रचार फक्त दक्षिणेत व तोही निजामशाही व आदिलशाही राजवटीत विशेष होता. हा अक्षरी लिहिण्याचा प्रघात होता. सुहूर सनावरून इसवी सन काढावयाचा झाल्यास त्याच्यात मृगापूर्वी ६०० व मृगानंतर ५९९ वर्षे मिळवून काढतात.

फसली सन- हिजरी सन शेतकऱ्यांना सोयीचा पडत नसे म्हणून इ. स. १५६३ मध्ये अकबर बादशहाने हा सुरू केला. दक्षिणेत १६३६ मध्ये तो शहाजीने आणला. याचा प्रारंभ मृगनक्षत्रापासून म्हणजे ५-६ जूनच्या सुमारास होतो. मृगापूर्वी ५९१ व मृगानंतर ५९० मिळवल्याने इसवी सन मिळतो.

२

निजामअल्ली- हैदराबादचा नवाब.

मुजाफरखान- हैदराबादच्या निजामाने बुशी नावाच्या फ्रेंच सैन्याधिकाऱ्याच्या देखरेखीखाली कवाईती फौजा व आधुनिक पद्धतीचा तोफखाना सिद्ध केला होता. या फौजेत मुजाफरखान नावाचा गारदी एक प्रमुख सरदार होता. १७५२ मध्ये पेशव्यांनी त्याला

निजामापासून फोडून आपल्याकडे नोकरीस ठेविला. कर्नाटकच्या स्वारीत पेशव्यांशी वेबनाव होऊन तो सावनूरच्या नबाबाकडे व तेथून पुन्हा निजामाकडे गेला. बुशीने त्याला थारा देऊ दिला नाही, म्हणून तो पुन्हा १७५८ मध्ये पेशव्याकडे आला. भाऊसाहेबांना तो अगदी नको होता, परंतु नानासाहेबांच्या आग्रहामुळे त्याला ठेवून घ्यावा लागला. भाऊसाहेबांनी त्याच्याकडे दुर्लक्ष करून निजामाच्या पदरी असलेल्या इभ्रामखान गारद्याला सन्मानाने बोलावून आणण्याची खटपट चालविलेली पाहून तो बिथरला आणि निजामाशी संधान बांधून त्याने भाऊंवर मारेकरी घातला. इभ्रामखान त्याच्या नात्यातलाच होता. हैदरखान हा मुजाफरखानाचा सहकारी होता.

३

मातुश्री गोपिकाबाई– (१७२८-८८) नानासाहेब पेशव्यांची पत्नी. विश्वासरावाची आई.

४

अक्रा जणांची डोचकी– मुजाफरखान, हैदरखान, मुजाफरखान याचा जावई आणि आणखी आठ जणांचा शिरच्छेद केल्याचे दिसते. (पेदः १ पृ. १२)

५

नगरचा किल्ला— हा निजामाच्या ताब्यात असून कविजंग नावाचा किल्लेदार तेथे होता. भाऊच्या दराऱ्यामुळे किल्ला सहज हस्तगत झाला. लकडे याजकडे किल्ल्याचे काम भाऊंनी सांगितले. २५ नोव्हें. १७५९ रोजी भाऊंनी किल्ल्यात मोठ्या इतमामाने प्रवेश केला.

६

श्रीमंत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे– (१७२१–६१) पहिल्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर १७४० मध्ये हा पेशवा झाला. शाहू छत्रपतींनी (१६८२–१७४९) मृत्यूपूर्वी पत्र लिहून याला सर्वाधिकार बहाल केले. त्यामुळे मराठी सत्तेचे सेनापतिपद व पेशवेपद दोन्ही यांच्याच हातात एकवटली व मराठी सत्तेचे मुखत्यारपद पेशव्यांना प्राप्त झाले.

कुलफौजा... पाठवावे–भाऊसाहेबांच्या विनंतीप्रमाणे दक्षिणेतील अनेक नामवंत सरदार त्यांच्या फौजांनिशी येऊन भाऊंना मिळाले. रघुनाथरावदादाही आले. फक्त नागपूरचे जानोजी व मुधोजी भोसले भाऊबंदकीमुळे आले नाहीत.

उदगीर– पुण्याच्या पूर्वेस दोनशे मैलांवर मांजरा गावाजवळचे निजामाच्या राज्यातले ठिकाण.

७

दादासाहेब–(१७३४–८३) थोरल्या बाजीरावाचे द्वितीय पुत्र, नानासाहेब पेशवे यांचे धाकटे बंधु रघनाथराव पेशवे.

८

इभ्रामखान गारदी– (पृ. १७६१) पांडेचरी येथे ' द ब्यूरी ' नावाच्या सरदाराच्या पालखीबरोबर धावणारा किरकोळ, काळा व तोंड देवीच्या वणांनी भरलेला हा मुलगा पोर्तुगीज व फ्रेंच पद्धतीच्या कवायती आत्मसात करून गारद्यांच्या पलटणीमध्ये महत्त्व पावला. उदगीरच्या लढाईच्यावेळी केशवराव पानसे यांच्या मध्यस्थीने भाऊंनी याला आपल्याकडे आणला.

पहिले जुंज– २० जाने. १७६० ला युद्धाला तोंड लागले. फेब्रुवारीला मराठ्यांना जय मिळून तह झाला.

१२

विठ्ठल सुंदर– निजामाचा दिवाण. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी एक शहाण

१४

गोपाळराव गोविंद– (१७२१–७१) आडनाव पटवर्धन. पेशवाईच्या साडेतीन रावांतला हा पहिला. कर्नाटकातील मोहिमांमध्ये हा आघाडीवर होता. उदगीर जिंकल्या-नंतर निजामावर लक्ष ठेवण्याची कामगिरी याच्यावर सोपविण्यात आली होती.

आंबे पडदूर– अहमदनगरच्या ईशान्येस १०० मैलांवरचे ठिकाण. येथे सर्व पेशवे मंडळींचा ७ ते १३ मार्च, १७६० असा एक आठवडा मुक्काम होता.

१५

जनकोजी शिंदे– (पृ. १७६१) थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दीत उदयास आलेल्य. राणोजी शिंदे (मृ.१७४५) याचा हा नातू. जयाजी शिंदे (मृ. १७५५) याचा मुलगा.

आबदल्ली गिलचा दुराणी–(१७२४–७२) इराण–अफगाणिस्तानचा बादशहा. नादिरशहाच्या सैन्यात सुरुवातीला नोकरीला होता. त्याच्या मृत्यूनंतर याने पराक्रमाने त्याचे राज्य बळकावले. त्याने हिंदुस्थानवर एकूण आठ स्वाऱ्या केल्या. ही १७५९ ची पाचवी स्वारी होय.

दत्ताजी शिंदे... ठार– दत्ताजी शिंदे हा राणोजीचा दुसरा मुलगा. बिजेसिंगाने मारेकरी घालून कपटाने जयाजीचा वध (१७५५) केल्यानंतर शिंद्याच्या सैन्याचे आधि-पत्य दत्ताजीकडे आले. नजीबखानाचा बंदोबस्त करण्यासाठी सप्टेंबर ते डिसेंबर १७५९ मध्ये गंगेकाठी शुक्रताल येथे चार महिने राहून त्याने शत्रूशी सामना दिला. या सामन्यात शिंद्यांची अपरिमित हानी झाली. नंतर डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात यमुनातीरी बुराडी घाटावर त्याने अहमदशहा अबदलीस दिल्लीस जाऊ न देण्यासाठी जिद्दीने झुंज दिली. या लढाईत तो शत्रूच्या हाती सापडला व त्याचा शिरच्छेद करण्यात आला. याच लढाईत त्याचा पुतण्या जनकोजी जखमी झाला आणि बायकामुलांसह त्याची

जखमी अवस्थेत प्रचंड पळापळ झाली. भाऊसाहेबांच्या बखरीमध्ये या सर्व प्रकरणाचे साद्यंत चित्र असून ते अतिशय वेधक आहे. ते मुळातूनच पाहण्यासारखे आहे.

१७

पूर्वी आपण तह केले... १७५३ ते ५५ च्या दरम्यान रघुनाथरावांच्या आधिपत्या-खाली उत्तर हिंदुस्थानची मोहीम निघाली होती. त्यावेळी अटकेपार झेंडा लावण्यात आला तरी ६० लक्ष रुपयांचे कर्ज झाले.

१९

मल्हारजी होळकर– (१६९३-१७६०) पुणे जिल्ह्यातील होळ गावचा. जातीन धनगर. थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दीत आपल्या पराक्रमाने हा उदयाला आला व मुत्सद्देगिरीने उत्तर हिंदुस्थानच्या राजकारणातील म्होरक्या बनला. राणोजी शिंदे व होळकर यांनी आपल्या पराक्रमाने रोहिल्यांचे बंड मोडून दिल्लीच्या बादशहाकडून तीन कोट रुपये व पंचवीस लक्षांचा मुलुख मिळविला. राणोजीच्या मृत्यूनंतर शिंदे-होळकरां-मध्ये वितुष्ट निर्माण झाले व त्यामुळे शुक्रताल–बुराडीच्या युद्धांत शिंद्यांना अब्दालीशी एकाकी झुंजावे लागले.

या प्रांतीचा भेद सापडेल... शिंदे-होळकरांनी अनेक प्रकारच्या स्वाऱ्यांत परस्पर मुलुख बळकाविला होता. वसूल मधल्यामधे दडपला होता. पेशव्यांच्या संमतीखेरीज अनेक राजकारणे केली होती व पैसा मधल्यामध्ये हाडपला होता. हा सर्व प्रकार उघड-कीस येईल ही त्यांची भीती.

२०

सुरजमल्ल जाट– (मृ. १७६३) भरतपूरचा क्षत्रिय राजा. रोहिल्यांचे बंड मोड-ण्याच्या कार्यात शिंदे होळकरांना याने साहाय्य केले. दिल्लीच्या बादशहाने याला आग्ऱ्याची सुभेदारी बहाल केली होती. हा शिकारीस गेला असता नजीबखानाने याला कपटाने ठार केले.

गाजुदीखान– (मृ. १८०० नंतर) असफशहा निजामउलमुल्क याचा नातू. संभाजी-राजास अटक करणाऱ्या मीर शहाबुद्दीन याला 'गाजुद्दीखान' ही पदवी औरंगजेबाने दिली (१६८९) त्याचा मुलगा असफशहा हा हैदराबादच्या निजामशाहीचा संस्थापक. त्याचा वडील मुलगा गाजुद्दीन तिसरा हा १७५२ पर्यंत दिल्लीस सुभेदार होता. तो मोठा गाजुद्दीखान त्याचा मुलगा. इमादउलमुल्क हा धाकटा गाजुदीखान. त्याचाच हा उल्लेख होय. हा १७५३ मध्ये दिल्लीच्या बादशहाचा वजीर झाला. ही वजिरी मिळविण्यासाठी त्याने मराठ्यांचे साहाय्य घेतले होते.

२१

बळवंतराव– बळवंतराव गणेश मेहेंदळे. पेशव्यांचा एक प्रमुख सरदार. याने दमाजी गायकवाडाचे बंड मोडले. उदगीरच्या स्वारीत हा होता. त्यापूर्वी कर्नाटकात त्याने यशस्वी

मोहिमा केल्या होत्या. पानपतवर हा मारला गेला (१७६०) हा नाना फडणीसाचा मामा होता. बळवंतरावाने जुलैच्या शेवटच्या आठवडयात किल्ला हस्तगत गेला. व आततायीपणाने तो गमावलाही. भाऊ स्वतः २८ जुलैला दिल्लीस गेले व १ ऑगस्टला किल्ला हस्तगत केला.

२४

सल्याची बोलणी गाजुदीखाने याचे विद्यमाने– किल्ला जिंकून गजुदीखान यास वजिरी द्यावयाची असे शिंदे होळकरांच्या कारभाऱ्यांनी गुप्तपणे पैसे खाऊन वचन दिले होते. त्यामुळे गाजुदीखान मध्ये पडला, व मध्यस्थी करू लागला. भाऊसाहेबांनी त्याला दुखवायचे नाही म्हणून त्याच्या मार्फत बोलणी केली व नंतर त्याला वजिरी द्यावयास साफ नाकार दिला. अयोध्येचा सरदार सुजाउद्दौला याला वजिरी देऊन त्याला आपल्या बाजूने वळविण्याचा भाऊने प्रयत्न चालविला होता. त्यामुळे वजीर गाजुदीखान बिथरला व रोजा असल्याने कुराण वाचविण्याचा बहाणा त्याला करावा लागला, सुरजमल्ल जाटही त्यामुळे बिथरून निघून गेला. भाऊने दोघांचीही पर्वा केली नाही.

२५

नारो शंकर– (मृ. १७७५) मूळ आडनाव दाजी. दिल्लीच्या बादशहाने ' राजेबहाद्दर ' हा किताब दिला. सुरुवातीला उदाजी पवाराकडे शिलेदार. मल्हाररावाने त्याला हेरून इंदूरचा सुभेदार नेमले. १७४२ नंतर १५ वर्षे तो झाशीचा सुभेदार होता. पेशव्यांनी त्याला आपल्याकडे बोलावून घेतले, परंतु दत्ताजी शिंद्यांच्या आग्रहास्तव त्याला शिंद्यांकडे पाठविले. शुक्रताल व बुराडी युद्धांत तो दत्ताजीबरोबर होता. पैसे वसूल करण्यात तो खमक्या होता म्हणून भाऊंनी त्याला दिल्लीचा कारभार सांगितला. अनेक मार्गांनी त्याने दिल्लीतील सरदारांजवळचा पैसा बाहेर काढला. मराठ्यांबद्दल दिल्लीतील लोकांचे मत त्यामुळे कलुषित झाले.

शहर आपले स्वाधीन– सुरजमल्ल जाटास दिल्लीची बक्षिगिरी आपणाकडे हवी होती. भाऊंनी ती मान्य केली नाही.

२६

दमाजी गायकवाड – (मृ. १७६८) गायकवाड घराण्याचा मूळ पुरुष दमाजी या नावाचाच होता. त्याचा पुतण्या पिलाजी याचा हा मुलगा. कोल्हापूरच्या ताराबाईच्या पक्षाचा म्हणून नानासाहेबांनी त्याच्यावर स्वारी करून त्याला १७५२ पर्यंत कैदेत ठेविले होते. १७५४ मध्ये पेशव्यांनी त्याला सोडले. भाऊंनी पानपतवर त्याला बरोबर नेला होता. होळकरामागून याने पानपतावर पळ काढला.

समशेर बहाद्दर – (१७३४–६१) पहिल्या बाजीरावापासून मस्तानीला झालेला मुलगा. पेशव्यांच्या फौजेत तो खासा सरदार होता. पानपतच्या लढाईत जबर जखमी होऊन थोड्या दिवसांत मरण पावला.

विठ्ठल शिवदेव – (मृ. १७६७) आडनाव विंचूरकर. शाहूमहाराजाकडे सुरुवातील शिलेदार. चिमाजीअप्पा, थोरले बाजीराव आणि रघुनाथरावदादा यांच्या मोहिमांत हा बरोबर होता.

२७

कुंजपुरा – दिल्लीपासून उत्तरेस ७८ मैलांवरील कर्नाल तहसीलमधील गाव. जवळच गढीबंद भुईकोट किल्ला. येथे अब्दालीने पुढील तरतुदीसाठी दाणागोटा व खजिना ठेवला होता. पूर्वी यमुना या गावाजवळून वाहत असे. नदीकाठच्या वृक्षवेलींवर पक्ष्यांचे असंख्य थवे उतरत, त्यावरून ' कुंजपुरा ' हे अर्थपूर्ण नाव पडले. यमुना नदी पार करण्याचा महत्त्वाचा टप्पा कुंजपुऱ्याजवळ होता. भाऊंने पैशाच्या निकडीने तातडीने कुंजपुऱ्यावर चढाई करून किल्ला व ठाणे हस्तगत केले. (१७ । १० । ६१) त्यामुळे अब्दालीला वेळेवर कुमक पाठविता न आल्याने मनगटे चावीत बसावे लागले.

२८

कुतुबशहा व शहामतखान – अब्दालीचे पठाण सरदार कुतुबशहा हा पठाणांचा धर्माधिकारी होता. शहामतखान हे चुकीच्या मोडीवाचनाचे रूप होत ते ' समदखान ' असे हवे. भाऊसाहेबांच्या बखरीत त्याला ' सैदखान कत्तलबाज ' असे म्हटले आहे. बुराडीच्या लढाईत जिवंत सापडलेल्या दत्ताजी शिंद्यांचा यांनी शिरच्छेद करून त्याचे मुंडके भाल्यास टोचून सैन्यातून मिरविले होते. त्याचे उट्टे म्हणून या दोघांचा शिरच्छेद करण्यात आला. कुतुबशहाची विटंबना अधिक केली, कारण हाती कुराण धरून धर्मोपदेश करणाऱ्याला अशा प्रकारची क्रूर कृती साजेशी नव्हती !

२९

कुरूक्षेत्रास–दर्शन – कुंजपुऱ्याहून १६ कोसांवर असलेल्या कुरूक्षेत्रावर जाऊन स्नानेदाने करण्यात मराठे दंग झाले. बरोबर बायकांमुले होती.

गिलच्यास यमुनेने वाट – २५ ऑक्टोबरला कोणत्याही परिस्थितीत यमुना उतरून मराठ्यांना गाठण्यासाठी अब्दालीने त्वरेने हालचाली केल्या. कर्नाल येथे तुफान प्रवाहातून उताराच्या जागा पाहून अब्दालीने फौज उतरविली. ' गळाभर पाणी आले ' असे कैफियतकाराने म्हटले आहेच. भाऊला ही वार्ता कुरुक्षेत्रावर कळली. परंतु उशीर झाला होता.

३०

पानपत–सोनपत – दिल्लीहून उत्तरेस अनुक्रमे ५४ व २६ मैल दूरची मैदाने. कुरूक्षेत्र दिल्लीपासून सुमारे १२५ मैल दूर असल्याने तेथून परत येताना मराठ्यांना पानपतवर अडकून पडावे लागले. ही सर्व ठिकाणे यमुनेच्या डाव्या बाजूस आहेत. अब्दाली उजव्या बाजूस होता. तो नदी उतरून अगोदर सोनपत व नंतर पानपत येथे मराठ्यांच्या

दिल्लीचा रस्ता रोखून उभा राहिला. ' लष्करानजीक तीन कोसांच्या अंतरावर अब्दालीचे सैन्य उभे राहिल्याचे ' कैफियतकाराने म्हटले आहे.

३३

सोनाजी भापकर – (मृ. १७६१) पुण्याजवळच्या लोणी गावचा पाटील. हुजुरातीतील एक ज्येष्ठ सरदार. याने व बळवंतरावाने जनकोजीस वेळीच कुमक केली नाही. पानिपतवरून हा पळाला परंतु शत्रूच्या तावडीत सापडून कामास आला.

शिंदे यांची शर्त – २२ नोव्हेंबर रोजी शिंद्यावर चालून आला. शिंद्यांनी त्याचा चांगलाच समाचार घेतला. सुजाउद्दौला मदतीला आला निसता तर नजीबखान त्याच दिवशी हाती लागला असता, असे ऐतिहासिक पत्रे (पानिरण पृ. १६, पेद २१ १९७) म्हणतात. कैफियत आणि भाऊ. बखर मात्र त्याचा ठपका बळवंतरावावर ठेवतात.

३४

नजीबखान रोहिला – (१७२८ – ७०) कंदाहारच्या आसलतखान नावाच्या गरीब पठाणाचा मुलगा नशीब काढण्यासाठी हिंदुस्थानात आला. महिना दोन-पाच रुपये पगारावर नोकरी करीत १७४८ मध्ये तो दुंदेखान रोहिल्याचा जावई व हजार फौजांचा सरदार झाला. १७५१ मध्ये दिल्लीच्या वजीरासाठी अयोध्येचा सुभेदार सफदरजंग व गाजीउद्दीन यांच्यामध्ये चुरस निर्माण जाली. नजीबखानच्या मदतीने या चुरशीत गाजीउद्दीनची सरशी झाली. यावेळी बादशाहाने याला पंचहजारी मनसब देऊन ' नजीबउदौला ' हा किताब दिला. पुढे हा गाजीउद्दीन व बादशहा यांच्याविरुद्ध उलटला. यानेच अब्दालीला निमंत्रण दिले व इतर सर्व मुसलमानांची एकजूट करून पानपत घडवून आणले.

सुजात डवला – (मृ. १७७५) सुजाउद्दौला हा अयोध्येचा सुभेदार सफदरजंग किंवा मनसूरअल्ली याचा मुलगा. सफदरजंग दिल्लीच्या बादशाहचा वजीर होता. पुढे त्याचे व बादशहाचे वाकडे आल्याने वजिरी सोडून अयोध्येकडे जावे लागले. मराठ्यांनी सफदरजंगास वेळोवेळी मदत केल्याने सुजाचे मराठ्यांशी सख्य होते. परंतु एकेकाळी शत्रू असलेल्या नजीबखानने याला मोठ्या हिकमतीने अब्दालीकडे वळविले. भाऊंनी दिल्ली काबीज केल्यानंतर याला पुन्हा वजिरीपदावर बसविण्याची खटपट केली. ती सफल झाली असती तर पानपतचा इतिहास वेगळा झाला असता. सुजाउद्दौला त्यामुळे नेहमीच द्विधा मनःस्थितीत होता. भाऊंनी जाटामार्फत वचन देऊन सुजाची भेटही घेतली होती. ' अफगाण हे हिंदुस्थानी लोक, मानमरातब व अब्रू यांचे शत्रु होत. हिंदुस्थानातील मुसलमानांना ते हिंदुपेक्षाही वाईट वागवतात. हिंदुस्थानात एकही सरदार इतमामात रहावा हे त्यांना खपत नाही. तुम्हीच एक (अफगाणेतर) मुसलमान शिल्लक आहात तुम्ही निःसंकोचपणाने आम्हाकडे यावे. उर्जित करून घ्यावे... (निदान) तुम्ही आपल्या

राज्यातच रहावे. अहमदशहाचे म्हणणे ऐकू नये.' असे भाऊंनी खूप सांगून पाहिले.त्याचा काही उपयोग झाला नाही. (राख १ : १८० फाप पृ १४५).

त्यांचे-आपले फौज–कैफियतकाराने दिलेल्या संख्येप्रमाणेच अस्सल कागदपत्रेही आकडा देतात. ' आमची फौजही त्यांच्या समानच आहे ' असे वाक्य खुद्द भाऊंच्या पत्रात आहे (पानिरण पृ. ५७) अस्सल कागदपत्रांवरून अब्दालीचे सैन्य काहीसे अधिक दिसते.

४४

बळवंतराव ठार–७ डिसे. १७६०.

४६

सुजात डवला याने कमती करून– नजीबखानाच्या आग्रहामुळे सुजाउद्दौला जरी अब्दालीकडे गेला तरी नजीबखानाच्या वाढत्या प्रस्थामुळे तो अस्वस्थ होता. अब्दालीने त्याला दिल्लीची वजिरी आणि बक्षिगिरी देण्याचे सुरुवातीला अमीष दाखविले होते, परंतु नंतर अब्दालीच्या बोलण्यात फरक दिसू लागला. सुजाला दोन्ही द्यावयाच्या नाहीत, बक्षिगिरी नजीबासच द्यावयाची व पादशाही बंदोबस्तही त्याच्याकडे सोपवायचा असा नजीबाचा आग्रह सुरू झाला. परिणामी सुजा बिथरला व त्याने नजीबाला या चकमकीच्या वेळी मदत केली नाही.

४७

बळवंतरावांची बायको... बहुत प्रकारे समाधान– बळवंतरावांचा मुलगा आप्पा हा बरोबर असून लहान होता. त्याच्यासाठी तिने सती जाऊ नये म्हणून भाऊने खूप प्रयत्न केले. रणांगणावर सती जाण्याचे मराठ्यांच्या इतिहासातले हे सर्वांत उज्ज्वल चित्र होय. बळवंतरावाच्या पत्नीचे नाव ' लक्ष्मीबाई '.

४८

सुजा ... तहाची बोलणी– अब्दालीचा व मराठ्यांचा तह व्हावा, असे सुजाला वाटत होते. दिल्लीपासून सुजामार्फत या वाटाघाटी चालू होत्या. या अटीमध्ये तीन महत्त्वाच्या गोष्टी होत्या. १) पहिली : पेशवे व अब्दालीची हद्द २) दुसरी : वजिरी व बक्षिगिरी कोणाकडे ३) तिसरी : दिल्लीच्या बादशाहीचा बंदोबस्त कोणाकडे. सुरुवातीच्या बोलण्यात नजीबखान सारखा विक्षेप आणीत होता. बक्षिगिरी व दिल्लीचा बंदोबस्त या गोष्टी त्याला त्याच्याकडे हव्या होत्या. भाऊंनी दिल्लीच्या बादशहाकडून (आलामगीर दुसरा) फर्मान आणवून दिल्लीचा बंदोबस्त पेशव्यांकडे असल्याचे अब्दालीच्या निदर्शनास आणून दिले. पठाण व इतर मुसलमान यांच्यातील अंतर्गत तणातणीने आणि शिंद्यांनी दोन चकमकीत नजीबखानानी केलेली फजिती पाहून वरील अटींवर अब्दाली वाटाघाटी करावयास तयार झाला. त्यासाठी सुजास मध्यस्थ केले. मराठ्यांनी आता, 'नजीबखान

आपल्या हवाली करावा' अशी आणखी एक निर्णायक अट घातली. इथेच सारे फिसकटले.

५०

बोली दोन महिने – दिल्ली-कुंजपुऱ्यापासूनच ही बोलणी चालू होती. त्यामुळे मोठे युद्ध न होता बारीक सारीक चकमकी होत राहिल्या होत्या. बळवंतरावांच्या निधनानंतर, नजीबखान ताब्यात द्यावयाचा, ही अट सोडून बाकीच्या अटींवर जोरात चर्चा सुरू झाल्या. मराठे सुरुवातीला जोरात होते. दोघांच्याही मनात एकदा समोरासमोर मोठे युद्ध व्हावे अशी खुमखुमी होती. परंतु दिल्लीचा रस्ता अडवल्याने अब्दालीचे पारडे बरेच जड होते. त्यामुळे मराठ्यांची कोंडी करून त्यांची उपासमार त्याला करता आली.

'ही तहाची बोलणी कालहरण करण्याकरिताच अब्दालीने सुरू केली असावी. तह करण्याचा त्याचाही मनोरथ नव्हता.' असे का. ना. साने यांना वाटते. (भाकै. पृ.१७) त्याला काही आधार दिसत नाही.

५२

श्रीमंतांकडे पुण्यास पत्रे– ही प्रश्नोत्तरे अगदी मोघम स्वरूपाची आहेत. बळवंतरावांच्या निधनानंतर पुण्यास पत्र पाठवून त्याचे उत्तर युद्धापूर्वी मिळणे शक्य नव्हते. यातील आशय मात्र भाऊ. बखरीच्या बरोबर उलटा आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. भाऊ–बखरीत पुढील मजकूर आहे.

'दिवसेंदिवस धान्य महाग होऊं लागलें. वैरण मिळेनासी जाहाली. घोड्याची शक्ति राहिली. ते समयीं भाऊसाहेब यांस परम कष्ट भासलें कीं, आता निभावणी होणें कठीण आणि देशांतून कुमक व्हावयाची नाहीं आणि मी नानासाहेब यांसी प्रतिज्ञापूर्वक निघून आलों असतां कुमक करा म्हणावे तर उचित नाहीं.' असे जाणोन स्वस्थ राहिले.' (भाव. पृ. १२२)

५३

लंगडा नजीबखान पठाण– भाऊ बखरीत, आमदखान लंगडा व नजीबखान रोहिला याचा सासरा दुंदेखान रोहिला असे आहे. तेच बरोबर दिसते. (भाव. पृ. १२४)

गोविंदपंतांस पत्रे– अब्दालीची रसद बंद करण्यासाठी भाऊने गोविंदपंतांस पत्रावर पत्रे पाठविली. (राज. १।२४४, ५०, ६०, ६४) परंतु गोविंदपंताने अतोनात कुचराई केली. शेवटी निर्वाणीची पत्रे गेल्यावर त्याने काही हालचाल करावयास सुरुवात केली. रडतराऊला घोड्यावर बसविण्यासारखाच हा प्रकार होता. 'पानिपतच्या मोहिमेचे अपयश जर कोणाच्या माथी मारावयाचे असेल तर त्या शिक्षेला गोविंदपंत बुंदेले हाच सर्वथैव पात्र आहे' असे राजवाड्यांनी म्हटले आहे (ऐप्र. पृ. ८५)

५५

गोविंदपंतांचा शिरच्छेद– १७ डिसेंबर रोजी दिल्लीहून गाजीउद्दीननगराकडे जात असता अताईखान नावाच्या पठाण सरदाराने त्याला गाठून त्याचा शिरच्छेद केला. (राज– १।२७२) २१ डिसेंबरला त्याचे शीर अब्दालीने भाऊकडे पाठविले.

श्रीमंतांस अपेशाचे श्रम जाले– हे दुःख गोविंदपंतांच्या केवळ मृत्यूचे नाही. गोविंदपंत जिवंत होता तोपर्यंत अब्दालीला काही एक शह होता. त्यांच्या मृत्यूमुळे हा शह थंडावला आणि मराठयांना अंतरवेदीतून रसद मिळण्याची आशाही संपुष्टात आली. पानिपतच्या पराभवाची ही एक प्रकारे अशुभ नांदीच होती ! गोविंदपंतांच्या मृत्यूपासून पानिपतच्या यशाचे पारडे अब्दालीकडे झुकले.

५९

रावसाहेबांचे पत्र– गोविंदपंत बुंदेल्यांच्या निधनानंतर भाऊसाहेब चिंतामग्न झाले. त्यांनी पुण्यास पत्रे पाठवावयाचे सोडून दिले. ' जिकडें कामास जावें, तिकडे मेळवावें. खावें. रड ल्याहावी उत्तम नाही. ' ही वृत्ती त्यांची पूर्वीपासूनच होती आता मदतीचे सारे दोर कापले गेल्यानंतर विश्वासरावाने गुप्तपणे आपल्या वडिलांस वरीलप्रमाणे पत्रे पाठविली.

६१

खजिना .. थंडीचे दिवस– ही हकीकत पाराजीपंत बाव व बुंदेले यांचे पुत्र यांच्याबद्दलची आहे. कैफियतकाराने त्यांच्या नावाचा उल्लेख केला नाही. या कार्यात पैसा घेऊन पाराजीपंतांना दिल्लीस परत यावे लागले. (राज. १।२८४) मराठयांना दिल्लीहून मदत करण्याच्या कार्याची ही शोकांतिका झाली. आता मदतीचे सारे दोर पूर्णपणे तुटून गेले.

६६–६७

युद्ध, रावसाहेबांचा मृत्यू– १४ जानेवारी १७६१.

७३

भाऊसाहेब व जनकोजी शिंदे यांची गती– पानिपतच्या लढाईत या दोघांना वीरमरण आले, परंतु सारे सैन्य पळून गेल्यानंतर शेवटी लढता लढता त्यांना मृत्यू आल्यामुळे शेवटी त्यांचे काय झाले. या संबंधाने अनेक प्रकारच्या अफवा उठल्या. अनेकांना ते पळून कुठेतरी आश्रयाला गेले असावेत असे वाटले. सुजाउद्दौलाला १६ जानेवारीला भाऊसाहेबांचे प्रेत सापडले व त्याने आपल्याकडील हिंदू लोकांकरवी भाऊ व विश्वासराव यांना शास्त्रोक्त पध्दतीने अग्निसंस्कार केल्याची हकीकत काशीराज देतो. (काब १०४–०५).

७४

विसाजी कृष्ण जोगदंड– होळकरांच्या फौजेतील सरदार. भाऊंनी लढाईत बरे-वाईट झाल्यास आपली पत्नी पार्वतीबाईस घेऊन निघून जाण्याबद्दल मल्हाररावास सांगितले होते. मल्हाररांवाच्या या माणसाने त्याही बाबतीत कुचराई केली.

जानू भिंताडा– पुरंधर तालुक्यातील भिवंडी गावचा वतनदार चौगुला. पेशव्यांच्या दिमतीला होता. भाऊंनी त्यालाही पार्वतीबाईची कामगिरी सांगितली होती. तो अन्नाला जागला. त्याबद्दल त्याला १००० रुपयांचे बक्षीस देण्यात आले. (पेद. २–पृ–१७१).

७७

विश्वासरावास मंत्राग्नी– कैफियतकार भाऊसाहेबांच्या मंत्राग्नीबद्दल काही सांगत नाही. त्यावरून काशीराजाने स्वतःचे महत्त्व वाढविण्यासाठी काल्पनिक हकीकत दिली असावी, असे दिसते.

८०

बळकट घोड्याचा मातबर सरदार– हा वीरसिंगराव बारवकर या नावाचा होता. आपल्या पत्नीलाही यानेच सांभाळून आणली असल्याचा उल्लेख नाना फडणीसांनी केला आहे. (पानिरण पत्र–९)

८२

नाना पुरंदरे– त्रिंबक सदाशिव पुरंदरे हा पेशव्यांचा माजी दिवाण अंबाजीपंत पुरंदरे यांचा पुतण्या. भाऊसाहेबांचा स्नेही होता.

८४

नानासाहेबांचे लग्न– नानासाहेब पेशव्यांनी पैठणचे सावकार नारोबा नाईक वाखरे यांच्या मुलीशी १८ डिसें. १७६० रोजी लग्न केले.

८५

तेथे वर्तमान आले– पानिपतहून १९ जानेवारीला निघालेली सावकारी जासूद पेशव्यांना बऱ्हाणपूरला २४ जानेवारीला भेटला. त्याच्याजवळच्या सांकेतिक पत्रात लिहिले होते की, 'दोन मोतीं गळत. दसबीस अश्रफत. रुपयोंकी गणती नहीं.' दिल्लीच्या वकिलाचे सविस्तर पत्र ३ फेब्रुवारीला मिळाले. हीच त्यांना मिळालेली पहिली अधिकृत बातमी.

★

संदर्भ-साहित्य

(कंसात संक्षेप)

भाऊसाहेबांची कैफियत– संपा. का. ना. साने, १८८७ (भाक).

भाऊसाहेबांची बखर– संपा. भीमराव कुलकर्णी, आ. २ १९६९ (भाब).

पाणिपतची बखर– संपा. र.वि. हेरवाडकर, १९६६.

पानिपत १७६१–त्र्यं. शं. शेजवलकर, १९६१. (पानि).

पानिपतचा रणसंग्राम– संपा. लिमये, सोहोनी, जोशी, १९६५ (पानिरण)

पानिपतचा संग्राम– भाग १– संपा. फाटक-पगडी, १९६१(पासं).

ऐतिहासिक प्रस्तावना– वि. का. राजवाडे, १९२८ (ऐप्र).

पेशवे दफ्तर– खंड १, २, २१, २७ (पेद).

मराठ्यांच्या इतिहासाची साधने– खंड १, २, ६, १३, संपा. राजवाडे (राज)

Marathas and Panipat— Hari Ram Gupta.

Fall of the Mughal Empire, Vol II– जदुनाथ सरकार, १९३४.

(**तळटीपांतील संक्षेप– सं.** = संस्कृत. **फा.** = फार्शी **अ.**=अरबी, **हिं.**= हिंदुस्थानी)

• • •

मुद्रणशुद्धी

पृष्ठ १६ वर खालीलप्रमाणे मजकूर (ओळी १९, २०) आहे :

‘ पत्र पावतांच स्वार होऊन येणें
आम्हीही कुंजपुऱ्यास पोंचतों. ’

हा (वरील) मजकूर खालील प्रकारे पाहिजे.

‘ पत्र पावतांच स्वार होऊन येणें. ’
आम्हीही कुंजपुऱ्यास पोचलों.

तसेच पृ. २९ वर (शेवटची) ओळ, **‘ लंगडा पठाण लुटून पस्त करणें ’** असा हवा.

या महत्त्वाच्या मुद्रणशुद्धीशिवाय खालील गौण शुद्धीची नोंद हवी.

पृष्ठ	**ओळ क्र.**	**अशुद्ध**	**शुद्ध**
४	१८	फौजबदी	फौजबदी
४	२७	शिबदी	शिबंदी
६	१०	उभयंता	उभयतां
७	१४	सांडणीस्वरास	सांडणीस्वारांस
९	१६	गिलल्यानें	गिलच्यानें
११	१	मुलुखगिरीख	“ मुलुखगिरीस
१७	१	करितीं	करितों
२३	६	चालो (न)	चालो(न)
२४	३	ज्याजवर	‘ ज्याजवर
२६	८	गिशाणें	निशाणें
२६	११	जुँज	जुंज
२९	पृष्ठ शीर्षक	भाऊसाहेबची	भाऊसाहेबांची

पानिपतविषयक महत्त्वाच्या मराठी बखरींमध्ये भाऊसाहेबांची कैफियत 'आकाराने' छोटी असली तरी गुणवत्तेने अव्वल दर्जाची आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांना ती पूर्णपणे विश्वसनीय वाटते, तर शेजवलकरांनी, तिची विश्वासार्हता अस्सल पत्रांवरून सिद्ध होते व तिच्यातील माहितीही अचूक असल्याची, ग्वाही दिली आहे.

भाऊसाहेबांवरच आपले सारे लक्ष केंद्रित करून पानिपतविषयक घडामोडींचा विस्तृत पट अगदी थोडक्यात ती साकार करते. अलंकरणरहित अशा मध्ययुगीन मराठ-मोळ्या भाषाशैलीचा कैफियत हा एक उत्तम नमुना आहे. पुष्कळ मजकूर थोडक्यात स्पष्ट सांगण्याची कैफियतीची शैली वाखणण्यासारखी आहे, असे रियासतकार सरदेसाई यांनी म्हटले आहे.

मराठी बखर वाङ्मयात अनन्यसाधारण ठरलेली 'भाऊसाहेबांची बखर'ही या कैफियतीचीच कलात्मक अशी वाढीव प्रतिकृती होय यासंबंधी आता दुमत राहिलेले नाही.

ऐतिहासिक आणि वाङ्मयीन अशा दोन्ही दृष्टींनी साऱ्या बखर वाङ्मयात आगळी ठरणाऱ्या या सार्थनामा बखरीची ही आवृत्ती ९४ वर्षांनंतर प्रसिद्ध होत आहे.